सोलापूर तरुण भारत
आसमंत



**अजितदादा आणि मी असे आम्ही दोघे मंत्रिमंडळ बैठकीत एकत्र होतो. पाठोपाठ मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीची बैठक माझ्या कक्षात झाली; तेथेही दादा माझ्यासोबत होते. महाराष्ट्रात पायाभूत सुविधांवर अन्य राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक खर्च होतो, यावर दादांनी प्रश्न उपस्थित केला. प्रकल्प लांबू नयेत, यासाठी आम्ही दोघांनीही आसूड उठविले. सार्वजनिक बांधकाम खात्याने सरकारचे ७६४ कोटी कसे वाचविले, याची माहितीही देण्यात आली. दादांना आनंद झाला. सदोदित तिजोरीची काळजी करणारा अर्थमंत्री म्हणून मी निश्चिंत असायचो. 'अशाच गोड बातम्या प्रत्येक बैठकीत देत जा,' अशी कोपरखळीही त्यांनी मारली. पण, अशा बातम्या ऐकण्यासाठी पुढच्याच दिवसापासून आपण नसू, हे मात्र त्यांनी सांगितले नाही.**

# दादा, तुम्ही वेळ चुकवली!

श्रध्दांजली
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

ही बैठक झाल्यानंतर पुन्हा पाऊण तास आम्ही माझ्या दालनात गप्पा मारत बसलो होतो. नियती निष्ठूर असते, आपले काही चालत नाही. दादा, तुम्ही आजवर कधीही वेळ चुकवली नव्हती, या वेळी मात्र चुकवलीत. दादा, ही खंत कायम राहील, तुम्ही अकाली 'एक्झिट' घेतली. बुधवारी सकाळी बारामतीजवळ विमान अपघात झाल्याची बातमी कानावर आली, तेव्हाही इतके काही विपरीत घडेल, असे वाटले नव्हते. डॉक्टर जोवर काही सांगत नाहीत, तोवर कोणत्याही बातमीवर विश्वास ठेवायला मन धजावत नव्हते. सुप्रियाताईंशी बोलणे होत होते. पण अखेर ती वाईट बातमी आलीच. माझा जवळचा, दमदार आणि दिलदार मित्र मी गमावला. ही पोकळी कधीही भरून न निघणारी आहे. कधीच विस्मरणात जाणार नाही, असा धक्का देणारा हा प्रसंग आहे.

दादा हे कायम माझे मित्र होते. खूप जवळून असे काम आम्ही २०१९ पासून केले असले तरी त्याही पूर्वी विकासाच्या किंवा राज्यहिताच्या विषयांवर आम्ही एकमेकांसोबत होतो. दूरगामी व्हिजन असलेले नेते फार कमी असतात. दादा हे त्यापैकी एक. शब्दाला जागणारा नेता, मित्र कसा असतो, हे मी अत्यंत जवळून दादांबाबत अनुभवले. कितीही संकट आले तरी शब्दाला किंमत असते आणि प्रसंगी ती मोजायचीही असते, हे दादांकडून शिकण्यासारखे आहे. काही इनिंग आम्ही नव्याने सुरू केल्या होत्या. ही इनिंग प्रदीर्घ चालेल, असे वाटत असतानाच दादांनी अकाली एक्झिट घेतली. २०१४ नंतर त्यांच्या तोंडी कायम माझे नाव 'सीएम साहेब' असे असायचे. २०१९ मध्ये ते उपमुख्यमंत्री झाले आणि मी विरोधी पक्षनेता. पण, सभागृहात बोलताना ते हमखास मला 'सीएम साहेब' म्हणायचे. मग हळूच जीभ चावून 'देवेंद्रजी' म्हणायचे.

आमची मैत्री राजकारणापलीकडची होती. अवांतर विषयांवर बोलण्याची मैफल दादा सोबत असले की घडायची. आम्ही कितीदा रात्री उशिरापर्यंत गप्पा करीत बसायचो. पण, त्यातही कामाच्या विषयांची त्यांची यादी तयार असायची. कोणत्या विषयांवर बोलायचे आहे, याचा कागद हाती असायचा. धीरगंभीर विषयांवर बोलून झाले की दादांचे व्यक्तिमत्त्व खुलायचे. मग त्यांच्यातील कुणाची आणि कशाचीही पर्वा न करणारे उतुंग आणि दिलखुलास दादा व्यक्त व्हायचे. त्यांच्यातील भावनाप्रधान दादा फार कमी लोकांनी पाहिले. पण, मला तेही दादा अनुभवता आले. कारण, आम्ही फार छोट्या कालखंडात पराक्रमच तेवढे केले. राजकारणात अनेकदा माणसे वरकरणी पाहिली जातात; त्यांचे व्यक्तिमत्त्व पाहिले जात नाही. पण, कामाचा प्रचंड आवाका आणि ठायी असलेला अनुभव या अर्थाने दादा एक अतिशय मोठे नेतृत्व.

सकाळी सात वाजता दिवस सुरू करणारे दादा थांबत नसत. सरकारमध्ये असताना अनेकदा कठोर निर्णय घ्यावे लागतात. ते क्षणिक अप्रिय वाटत असले तरी दीर्घकालीन जनहिताचे असतात. अशा वेळी राजकीय कौशल्य पणाला लागत असते. व्यवस्थापन कौशल्यात जोखीम आणि हिम्मत दोन्ही ठेवावी लागते. असे निर्णय घेण्यातही दादा अग्रेसर असत. त्यामुळे त्यांच्यापुढे एखादी फाईल गेली किंवा विषय गेला तर दोनच उत्तरे ऐकू यायची. एकतर होकार किंवा नकार. 'पाहतो... करतो' ही शैली दादांना मान्यच नव्हती. या शैलीने लोक त्या क्षणी दुखावतातही. पण, ती दीर्घकाळासाठी जोडली जातात. सभागृहात उत्तरे देतानासुद्धा गुळगुळीत नाहीत, तर ठामपणे उत्तरे देताना ते दिसायचे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सभागृह सुरू होण्यापूर्वी दादा सभागृहात यायचे; मग ते मुंबई असो की नागपूर. सभागृहातील नवीन सदस्यांना शिस्त आणि नियम शिकवण्यातही त्यांचा नेहमी पुढाकार असायचा. मंत्रिमंडळ बैठकीत येण्यापूर्वी प्रत्येक प्रस्तावाचा अभ्यास करून ते आलेले असत. १८-२० विषय असले तरी नेमक्या कोणत्या विषयात कोणता मुद्दा उपस्थित करायचा, हे त्यांना ठाऊक असे.



आमच्यात काही समान गोष्टी होत्या. काम घेऊन येणारा आपल्या पक्षाचा की दुसर्याचा, याचा विचार दादांनी कधीच केला नाही. नेत्याने सतत जनतेत राहायचे असते, हेही पथ्य दादांनी आयुष्यभर पाळले. २४ बाय सात कामात व्यग्रता हेच सूत्र दादांनी कायम पाळले. २८ जानेवारी रोजीही ते आपल्या सभांसाठी भल्या पहाटे निघाले होते. दादा आणि मला दोघांनाही क्रिकेट सामना बघण्याची आवड. कोणताही सामना असला की मधूनच आम्ही दोघेही 'स्कोर' काय झाला, याची माहिती घेत असायचो. गाणी हादेखील आमचा समान आवडता छंद. त्यातच दादांचा 'सेन्स ऑफ ह्यूमर' अफलातून. कितीही गंभीर विषय असू द्या, ते थेट गमतीत बोलून समोरच्याची विकेट बेमालूमपणे घ्यायचे.

बांधकामाची गुणवत्ता या विषयात दादांना फार रस. प्रत्येक सरकारी बांधकामावर त्यांची कडक नजर असायची. अनेकदा सकाळी सहा वाजता त्यांनी बांधकामाची पाहणी केली आहे. जराही चूक सापडली, तर समोरच्याची ऐंशीतैशी करण्यास ते मागेपुढे पाहत नसत. त्यामुळेच त्यांच्या देखरेखीत झालेल्या सरकारी इमारती खाजगीलाही लाजवतील, अशा झालेल्या आहेत. बारामती मेडिकल कॉलेजची वीट न् वीट त्यांनी स्वतःच्या देखरेखीत ठेवली. नियतीने त्याच मेडिकल कॉलेजमध्ये त्यांचे पार्थिव आणले, ही पण एक विटंबनाच. मनात आज अनेक वेदना आहेत.

दादांना दूध प्यायला खूप आवडायचे. आमच्या हेलिकॉप्टरमध्ये सुगंधी दूध, ताक, कोल्ड्रिंक असायचे. पण, दादा नेहमी दुधाला पसंती देत. 'मी रोज हळद टाकून दूध घेतो,' असे ते आवर्जून सांगायचे सुद्धा. एकदा आम्ही विमानप्रवासात होतो. विषय रंगत गेले. मग विषय माझ्या आजवर झालेल्या विमान, हेलिकॉप्टर अपघातांपर्यंत येऊन पोहोचला.

मी एकेक प्रसंग रंगवून सांगू लागलो. दादा गमतीने पायलटला म्हणाले, 'अरे बाबा, जवळ कुठली धावपट्टी दिसते का पाहा, मला खाली उतरव आणि मग पुन्हा उड्डाण करा.' मी दादांना सांगितले की, 'माझा ट्रॅक रेकॉर्ड आहे, माझे अपघात खूप झाले. पण, काळजी करू नका, मी विमानात असलो, की काही इजा होत नाही.' त्याच दादांना विमान अपघाताने आपल्यातून हिरावून न्यावे, ही शोकांतिकाच. जमिनीशी घट्ट नाळ जुळलेला माझा अत्यंत जवळचा सहकारी मी गमावला. हे माझे वैयक्तिक नुकसान तर आहेच; पण महाराष्ट्राचेही मोठे नुकसान आहे. दमदार आणि दिलदार मित्र मी गमावला आहे. 'दादा, आजवर तुम्ही कधीही वेळ चुकवली नव्हती... यावेळी मात्र चुकवलीत.'

# करारातून भारताच्या करारीपणाची चुणूक

लक्ष्यवेध
प्रतिनिधी

भारत-युरोप 'मुक्त व्यापार करारा'ची घोषणा ही अर्थव्यवस्थेच्या पानावरची एक ठळक बातमी नाही, तर तो भारताच्या जागतिक वाटचालीतील एक अनन्यसाधारण असा महत्त्वाचा टप्पा आहे. जागतिक अर्थव्यवस्था अनिश्चिततेच्या भोवऱ्यात सापडलेली असताना, व्यापारयुद्धे पुन्हा-पुन्हा उफाळून येत असताना आणि भू-राजकारण हे व्यापाराचे नियम ठरवू लागले असताना, युरोपसारखा महासंघ भारताशी 'मुक्त व्यापार करार' करतो; याचा अर्थ दूरगामी असाच असून, हा करार आकड्यांपेक्षा दूरगामी संदेश देणारा अधिक आहे. भारत-युरोप संबंधांचा इतिहास पाहिला, तर तो आधुनिक राजनैतिक काळापुरता मर्यादित नाही. खुष्कीचा मार्ग, समुद्री व्यापारी वाटा, मसाल्यांचा प्रवास, कापड आणि हस्तकलेची देवाणघेवाण, या साऱ्यांतून भारत आणि युरोपचे नाते शतकानुशतकांचे. मात्र, औद्योगिक क्रांतीनंतर आणि वसाहतवादी काळात या नात्यात समतोल-संतुलन राहिले नाही. व्यापार सुरू राहिला; पण सत्ता एका बाजूला केंद्रित झाली. स्वातंत्र्यानंतर भारताने राजकीय स्वायत्तता मिळवली असली, तरी आर्थिक आणि व्यापारी आत्मविश्वास उभारण्यासाठी अनेक दशके जावी लागली. शीतयुद्धाच्या काळात भारत आणि युरोपचे प्राधान्यक्रम वेगवेगळे होते. त्यामुळे दोघांमधील संबंध हे औपचारिकच राहिले, त्यात धोरणात्मक संबंध नावाला होते.

हे चित्र बदलायला सुरुवात झाली, ती जागतिकीकरणानंतर. मात्र, खऱ्या अर्थाने भारत-युरोप संबंधांना नवी दिशा मिळाली, ती गेल्या दहा-बारा वर्षांत. भारताने स्वतःला विकसनशील देश म्हणून नव्हे, तर जागतिक पुरवठा साखळीतला अपरिहार्य घटक म्हणून स्वतःची ओळख प्रस्थापित केली. उत्पादन क्षमता, जगातील सर्वात मोठी देशांतर्गत बाजारपेठ, युवा लोकसंख्या आणि धोरणात्मक स्थैर्य या साऱ्यांचा मेळ भारताने जगासमोर नेमकेपणाने ठेवला. आज युरोपियन महासंघ हा भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. उभयपक्षी व्यापार १३६ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचला आहे. भारताच्या एकूण व्यापारात युरोपचा वाटा ११ टक्क्यांहून अधिक आहे. उलटपक्षी, युरोपच्या एकूण व्यापारात भारताचा वाटा अजूनही तुलनेने कमी आहे. हा विरोधाभासच या 'मुक्त व्यापार करारा'चे महत्त्व अधोरेखित करतो. भारतासाठी युरोप हा आधीच मोठा भागीदार आहे. युरोपसाठी भारत अजूनही वाढीच्या संधींचे दार आहे. म्हणजेच, या करारातून दोन्ही बाजूंना

**भारत आणि युरोपीय महासंघातील 'मुक्त व्यापार करार' हा केवळ व्यापारापुरताच मर्यादित नाही, तर तो जगाला एक स्पष्ट संदेश देणारा ठरला आहे. जागतिक अर्थव्यवस्था अनिश्चिततेचा सामना करत असताना आणि व्यापारयुद्धांचा भडका कायम असताना, अमेरिकेच्या नाकावर टिच्चून झालेला हा करार म्हणूनच सर्वार्थाने महत्त्वाचा असाच!**



वेगवेगळ्या कारणांसाठी फायदा होणार आहे.

गेल्या दशकात भारत-युरोप वस्तू व्यापारात जवळपास ९० टक्क्यांची वाढ झाली आहे. सेवा क्षेत्रातील व्यापारही झपाट्याने वाढून ६० अब्ज युरोंच्या आसपास पोहोचला आहे. युरोपकडून भारतात येणारी थेट परकीय गुंतवणूक सातत्याने वाढत असून, ती १४० अब्ज युरोपेक्षा अधिक झाली आहे. भारतात कार्यरत असलेल्या हजारो युरोपियन कंपन्या केवळ नफा कमावण्यासाठी आलेल्या नाहीत, त्या दीर्घकालीन गुंतवणुकीच्या दृष्टिकोनातून येथे उभ्या आहेत. उत्पादन, संशोधन, सेवा, पायाभूत सुविधा अशा अनेक क्षेत्रांत त्यांचा ठसा आहे. या पार्श्वभूमीवर 'मुक्त व्यापार करारा'तील तरतुदी भारतासाठी काय अर्थ घेऊन येतात, हे समजून घेणे महत्त्वाचे ठरते. रत्ने आणि दागिने, वस्त्रे, प्लास्टिक उत्पादने, अभियांत्रिकी वस्तूंवरील आयातशुल्क शून्यावर येणे ही साधी गोष्ट नाही. भारताचा दागिन्यांचा उद्योग पारंपरिक कौशल्यावर उभा आहे; पण गेल्या काही वर्षांत त्यात डिझाईन, तंत्रज्ञान आणि ब्रॅण्डिंगचा नवा अध्याय सुरू झाला आहे. युरोपसारख्या उच्च मूल्याच्या बाजारपेठेत थेट, शुल्कमुक्त प्रवेश मिळणे म्हणजे या उद्योगाला जागतिक ओळख मिळण्याची संधी आहे. त्याचा थेट परिणाम रोजगारावर होणार आहे. हा रोजगार केवळ महानगरांपुरता मर्यादित राहणार नाही, कारागिरीवर आधारित लघू-उद्योगांनाही त्याचा लाभ होणार आहे.

वस्त्रोद्योगाच्या बाबतीतही तसेच आहे. भारताचा वस्त्रोद्योग हा रोजगारनिर्मितीचा मोठा स्तंभ. स्पर्धात्मक दर, मोठी उत्पादन क्षमता आणि आता युरोपियन बाजारपेठेतील शुल्कमुक्त प्रवेश या तिन्हींचा संगम झाल्यास या क्षेत्राला नवी चालना मिळू शकते. प्लास्टिक, अभियांत्रिकी वस्तू, यंत्रसामग्री या क्षेत्रांनाही हा करार विस्ताराची संधी देतो. भारताला केवळ कच्चा माल पुरवणारा देश न ठेवता, मूल्यवर्धित उत्पादनांचा पुरवठादार बनवण्याच्या दिशेने हा करार मदत करतो. मात्र, हा करार केवळ निर्यातदारांच्या फायद्यापुरता मर्यादित नाही. त्याचा परिणाम पायाभूत सुविधा, लॉजिस्टिस आणि पुरवठा साखळीवर होणार आहे. व्यापार वाढतो; तेव्हा बंदरे, रस्ते, रेल्वे, गोदामे यांची गरज वाढते. त्यामुळे अप्रत्यक्षपणे पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक वाढते. भारत-मध्यपूर्व-युरोप आर्थिक कॉरिडोरसारख्या संकल्पना याच विचारातून पुढे येतात. प्राचीन व्यापारी मार्गांची आठवण करून देणारी ही मांडणी भविष्यातील व्यापार आणि ऊर्जा वाहतुकीचे नवे समीकरण उभे करू शकते. चीनकेंद्रित पुरवठा साखळीला पर्याय शोधण्याचा युरोपचा प्रयत्न आणि भारताची भौगोलिक व आर्थिक क्षमता या दोन्हींचा संगम येथे दिसतो.

इंग्लंडनंतर थेट युरोपशी 'मुक्त व्यापार करार' करणे आणि त्याच वेळी अमेरिकेशी चर्चा सुरू ठेवणे, ही भारताच्या व्यापारनीतीची स्पष्ट दिशा दर्शवते. भारत कोणत्याही एका गटावर अवलंबून राहू इच्छित नाही. तो बहुपदरी, बहुदिशात्मक संबंध उभे करत आहे. अमेरिका-युरोप संबंध ग्रीनलॅण्डसारख्या मुद्द्यांवरून ताणलेले असताना युरोपने भारताशी करार करणे, हा केवळ आर्थिक निर्णय नाही; तो राजकीय संदेशही आहे. भारत हा स्थिर, विश्वासार्ह आणि दीर्घकालीन भागीदार आहे, हे युरोपने अप्रत्यक्षपणे मान्य केले आहे. या कराराने साधलेली वेळही तितकीच महत्त्वाची.

प्रजासत्ताक दिनाच्या समारंभाला युरोपियन महासंघ आणि युरोपियन कौन्सिलच्या अध्यक्षांना आमंत्रित करणे आणि त्यानंतर लगेचच व्यापार कराराची घोषणा करणे, हा निव्वळ शिष्टाचार नाही. हा संदेश आहे की, भारत लोकशाही मूल्यांचा सन्मान करतो; पण त्याचवेळी आर्थिक हितसंबंधांबाबत कोणताही संकोच बाळगत नाही. राजनैतिक प्रतीकात्मकता आणि आर्थिक वास्तव यांची सांगड घालण्यात भारताने यश मिळवले आहे.

भारत-युरोप सहकार्य व्यापारापुरते मर्यादित नाही. संरक्षण आणि सुरक्षा, हरितऊर्जा, पर्यावरण, विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांतही सहकार्य वाढत आहे. अंतराळ संशोधनातील सहकार्य, डेटा हाताळणी, नेव्हिगेशन यांसारख्या बाबी भारताच्या तांत्रिक क्षमतेला नवी उंची देतात. हरितऊर्जेच्या क्षेत्रात युरोपचा अनुभव आणि भारताची गरज यांचा मेळ भविष्यात निर्णायक ठरू शकतो. हवामान-बदलाच्या आव्हानासमोर उभ्या असलेल्या जगात भारत-युरोप सहकार्याला विशेष महत्त्व आहे. मानवी दुवेही या नात्याचा महत्त्वाचा आधार आहेत. जवळपास दहा लाख भारतीय युरोपमध्ये राहतात. विद्यार्थी, संशोधक, व्यावसायिक, कुशल कामगार या साऱ्यांनी भारत-युरोप संबंधांना सामाजिक अधिष्ठान दिले आहे. शिक्षण, संशोधन आणि कौशल्य विकासाच्या क्षेत्रात सहकार्य वाढल्यास त्याचा दीर्घकालीन फायदा भारतालाच होणार आहे. अर्थात, कोणताही 'मुक्त व्यापार करार' म्हणजे सर्व प्रश्नांचे उत्तर नसते. देशांतर्गत उद्योगांना स्पर्धेसाठी तयार ठेवणे, लघू व मध्यम उद्योगांचे हित जपणे, पर्यावरणीय आणि कामगार मानकांचे पालन करणे ही आव्हाने कायम राहणार आहेत. मुक्त व्यापार म्हणजे खुली स्पर्धा आणि खुल्या स्पर्धेत टिकण्यासाठी धोरणात्मक तयारी आवश्यक असते.

मात्र, आजचा भारत हा संधी घाबरून सोडून देणारा भारत राहिलेला नाही. आत्मविश्वास, बाजारपेठेचा आकार आणि धोरणात्मक स्पष्टता अशा बाबतीत तो वेगळ्या पातळीवर आहे. भारत-युरोप मुक्त व्यापार कराराकडे केवळ आयात-निर्यातीच्या आकड्यांतून पाहणे अपुरे ठरेल. हा करार भारताच्या जागतिक प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. 'मुक्त व्यापार करार' ही निव्वळ कागदावर केलेली स्वाक्षरी नसते; तर ती देशाच्या आर्थिक दिशेचा आरसा असते. भारताने ही दिशा स्पष्टपणे निवडली आहे. युरोपशी झालेला हा करार त्या आत्मविश्वासाचा ठोस पुरावाच!

# आरक्षणाचा ताजा अध्याय

**देशात आरक्षणात आरक्षण हा नवा मुद्दा गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. आरक्षणाचा फायदा घेणारे काही समाजघटक समाजातील अन्य लोकांना आरक्षणाच्या फायद्यापासून वंचित ठेवतात. श्रीमंत, राजकारणी आणि अधिकारी कुटुंबातील व्यक्तींनी तरी किमान आरक्षणाचा फायदा घेऊ नये, असे सार्वत्रिक मत आहे. सर्वोच्च न्यायालयाने त्याबाबत आता पुढचे पाऊल उचलले असले, तरी निर्णय सरकारने घ्यायचा आहे.**




समाजभान

डॉ. शुभांगी पारकर


देशात सध्या आरक्षणाबाबत वाद सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच केंद्र आणि राज्य सरकारांना नोटीस बजावून अनुसूचित जाती- जमातींमध्ये 'क्रिमीलेअर' लागू करण्याबाबत मत मागितले आहे. आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय, इतर मागासवर्गीयांसाठी 'क्रिमीलेअर' लागू असताना या दोन समाजघटकांना का लागू नाही, असा प्रश्न उपस्थित होत होता. त्याबाबत भाजपाचे नेते आणि वकील अश्विनी उपाध्याय यांनी याचिका दाखल केली आहे. त्यांचा युक्तिवाद आहे की, सरकारी नोकऱ्या किंवा संवैधानिक पदांवर असलेल्या एससी/एसटी व्यक्तींना आरक्षणाच्या कक्षेतून वगळले पाहिजे.

आर्थिक स्थितीचा युक्तिवाद हा एससी/एसटी आरक्षणासाठी बराच काळ आधार मानला पाहिजे. इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षणासाठी अशी व्यवस्था आधीच अस्तित्वात आहे. या मुद्यावर सर्वोच्च न्यायालयाची भूमिकादेखील लक्षणीयरीत्या बदलली आहे. भारतीय संविधानाच्या कलम १५(४) आणि १६(४) अंतर्गत एससी/एसटी आरक्षण दिले जाते. या कलमांनुसार राज्याला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीयांसाठी शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये विशेष तरतुदी (जसे की आरक्षण) करण्याची परवानगी मिळते. या वर्गांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेणे आणि समान संधी प्रदान करणे, हा यामागील उद्देश आहे. हे पहिल्या घटनादुरुस्ती (१९५१) द्वारे जोडले गेले.

यापैकी कलम १५(४) शिक्षणातील आरक्षणाशी संबंधित आहे आणि १६(४) सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षणाशी संबंधित आहे. आरक्षणाचा मुद्दा आला की, त्यावर टोकाची मते व्यक्त होतात. मात्र, न्यायालयाचे मत समजून घ्यायला हवे. आरक्षण हे आर्थिक आधारावर असावे, जातीच्या आधारावर नसावे असे मानणारा मोठा वर्ग आहे.

उच्चरवात तो म्हणणे मांडत असतो. आरक्षणाचा समर्थक दुसरा वर्ग राज्यघटनेने आम्हाला आरक्षण दिले आहे आणि तो आमचा हक्क आहे, असे म्हणणे मांडत असतो. सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती बदलत असल्याने आता आरक्षणाच्या सवलती मागणारे समाजघटक वाढले आहेत. आरक्षणाची स्थिती रेल्वेच्या डब्यातील प्रवाशांसारखी असते. रेल्वेच्या डब्यात शिरण्यासाठी फलाटावरील प्रवासी धडपडत असतात.

डब्यातील प्रवासी मात्र फलाटावरील प्रवाशांना आत येऊ देण्यास तयार नसतात. डब्यात अगोदरच गर्दी असतानाची ही स्थिती आहे. फलाटावरील व्यक्ती रेल्वेच्या डब्यात शिरल्या की आतल्या होऊन जातात आणि पुढच्या स्टेशनवर बाहेरच्या प्रवाशांना आत येऊ देत नाहीत.

आरक्षणाची अवस्था तशीच आहे. आरक्षणाचा फायदा अगोदरच घेणारे लोक आपल्याच समाजघटकांना त्याचा फायदा मिळू देत नाहीत, तर दुसऱ्या समाजघटकांनी आरक्षणाची मागणी केली, तर त्याला विरोध केला जातो. आरक्षण आर्थिक निकषावर हवे, अशी मागणी करणाऱ्यांच्या दोन गोष्टी लक्षात येत नाहीत. एक तर घटनाकारांनी आरक्षणाचा निर्णय घेतला, तेव्हा ज्या समाजघटकांना आरक्षण दिले, ते आर्थिकदृष्ट्या दुर्बल होते आणि आरक्षण हा काही गरिबी निर्मूलनाचा मार्ग नव्हे.

सामाजिक मागासलेपण दूर करणे आणि समान संधी देणे हा आरक्षणाचा उद्देश होता. अनुसूचित जाती आणि जमातींना त्यांच्या आर्थिक स्थितीवर नव्हे, तर ऐतिहासिक सामाजिक वंचिततेवर आधारित आरक्षण देण्यात आले. अनुसूचित जाती आणि जमातींविरुद्ध भेदभाव हा आर्थिक घटकांवर आधारित नसून जातीय ओळखीवर आधारित आहे.

अनुसूचित जाती आणि जमातींच्या आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयाचे मत वेळोवेळी बदलत राहिले आहे. इंदिरा साहनी विरुद्ध भारतीय संघराज्य खटल्यातील १९९२ मधील निर्णय आरक्षणावरील निर्णायक निवाडा मानला जातो. या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायाधीशांच्या खंडपीठाने ओबीसी आरक्षणाची वैधता कायम ठेवली. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने इतर मागासवर्गीय (ओबीसी) वर्गाच्या आरक्षणात 'क्रिमीलेअर' लागू करण्याचे आदेश दिले; परंतु 'क्रिमीलेअर'मधून एससी-एसटी आरक्षण वगळले. न्यायालयाने युक्तिवाद केला की, एससी-एसटी वंचिततेचे मूळ कारण सामाजिक भेदभाव आहे, आर्थिक स्थिती नाही. त्यानंतर २००६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने एम. नागराज विरुद्ध भारतीय संघ खटल्यात अनुसूचित जाती आणि जमातींसाठी पदोन्नतीमध्ये आरक्षणाला परवानगी दिली.

न्यायालयाने पदोन्नतीमध्ये 'क्रिमीलेअर' आरक्षणाची मागणी फेटाळून लावली. या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने असेही म्हटले आहे की, अनुसूचित जाती-जमाती आरक्षणाचा उद्देश सामाजिक मागासलेपणा भरून काढणे आहे. गेल्या सात दशकांपासून, राजकीय पक्ष आणि नेत्यांनी जनतेचे मानसशास्त्र विकृत केले आहे.

प्रत्येकजण आरक्षणाला त्यांच्या समस्यांचे निराकरण म्हणून पाहतो. एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात किती लोकांना आरक्षणाचा फायदा होईल, याचा कोणीही विचार करत नाही. सामाजिक न्यायासाठी आरक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही का, आपण नेहमीच आरक्षणासाठी लढणार का हे बघितले जात नाही. कधी कधी दिसते की, राजकीय पक्ष जनतेला आरक्षणात गुंतवून स्वार्थी हेतू साध्य करत आहेत.

ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो म्हणाले होते की, चांगले नेते जनतेला अमर्याद संसाधनांकडे घेऊन जातात, तर वाईट नेते जनतेला मर्यादित संसाधनांकडे घेऊन जातात. मर्यादित संसाधने जनतेमध्ये संघर्ष आणि द्वेष निर्माण करतात. आरक्षण हे असे साधन आहे, जिथे पर्याय मर्यादित असतात आणि इच्छुक भरपूर असतात. दुसरीकडे स्वयंरोजगार हे अमर्याद क्षेत्र आहे. तरुणांना त्याकडे प्रेरित करणे हा एका चांगल्या नेत्याचा गुण असतो. सामान्य वर्गातील तरुणांना समजत नाही की, त्यांना पूर्वीच्या शोषणकारी व्यवस्थेचे परिणाम भोगावे लागत आहेत. त्यात त्यांची कोणतीही भूमिका नव्हती. मुस्लिम समुदायातील ८५ टक्के लोक पसमंदा मुस्लिम आहेत. ते धर्मांतरित दलित, शोषित आणि मागासलेले हिंदू आहेत. त्यांना आरक्षणाचे फायदे मिळत नाहीत. दलित आणि मागासवर्गीयांमध्येही असे अनेक उपवर्ग आहेत, ज्यांना आरक्षणाचे कोणतेही फायदे मिळालेले नाहीत. आपण त्यांचीही काळजी करू नये का? या पृष्ठभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय 'जात'ऐवजी 'वर्ग' हा आरक्षणाचा आधार बनवण्याच्या कल्पनेला पुढे नेण्यास मदत करेल. यामुळे केवळ जातीच्या राजकारणावर हल्ला होणार नाही, तर जात हा वर्गआधारित सामाजिक रचनेचा पाया बनेल.

समाजातील प्रत्येकाला प्रगती करण्याची आणि पुढील वर्गात जाण्याची संधी मिळेल. आरक्षण धोरण बदलणे हा एक गुंतागुंतीचा आणि संवेदनशील मुद्दा आहे. जाती-आधारित आणि आर्थिक-आधारित आरक्षणाचे फायदे आणि तोटे आहेत. या मुद्यावर सखोल चर्चा करणे आणि सामाजिक न्याय आणि आर्थिक समानता सुनिश्चित करणारे संतुलित धोरण तयार करणे आवश्यक आहे. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात आरक्षण धोरणाचे उद्दिष्ट समाजातील सर्व घटकांना, मग ते जातीवर आधारित असो किंवा आर्थिक स्थितीवर आधारित असो; समान संधी प्रदान करणे हे असले पाहिजे. तथापि, या बदलामागील राजकीय हितसंबंध आणि सामाजिक विभाजनाचे धोके दुर्लक्षित करता येणार नाहीत. हा मुद्दा केवळ आरक्षण धोरण बदलू शकत नाही, तर भारतीय समाजाच्या रचनेवरदेखील परिणाम करू शकतो.

सारांश म्हणजे समाजातील सर्व घटकांना देशाच्या संसाधनांमध्ये आणि राजकारणात समान वाटा मिळावा याची खात्री करणे. सर्वोच्च न्यायालयाने जातीमध्ये पोटजातीच्या आरक्षणाचा विषय मांडला होता. तो सरकार आणि दलित नेत्यांनीही नाकारला.

वास्तविक आरक्षणाचे फायदे घेणाऱ्यांच्या पुढच्या पिढीने ते नाकारून आपल्याच उपेक्षित बांधवासाठी फायदा मिळवून दिल्यास आरक्षणाचा फायदा घेऊन सर्व लोक समान पातळीवर येऊ शकतील.

---


सुखात्म

डॉ. अविनाश मोहरील


# आयसीयूच्या बाहेरचा बेंच

मोठाच अपघात होता तो. नकळत घडलेला परंतु तिचे सारे जीवन ढवळून काढणारा. सायंकाळी नवरा घरी आल्यावर त्याला सांगायची कामे तिने कागदावर लिहून ठेवली होती. सारी कामे कागदावर लिहून ठेवायची तिच्या बाबांनी लावलेली सवय कधी कधी हास्याचा व टिंगलीचा विषय ठरायची. परंतु गोष्टी विसरायला नको म्हणून ती देखील कुणाचीही तमा न बाळगता कामे लिहिलेल्या चिठ्ठ्या सोबत बाळगायची. त्या दिवशी नवऱ्याला जरा जास्तच उशीर झाला म्हणून मनातली शंका खरी ठरली.

बाजूचे काका सांगत आले की, हरीशला कार्यालयातून येताना मोठा अपघात झाला. त्याच्या गाडीला एका भरधाव वाहनाने धडक दिली व त्याला जखमी अवस्थेत एका मोठ्या रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये भरती केलेय व तिला ताबडतोब तिकडे जायला हवे. आता जरावेळाने आपल्या पतीसोबत बाहेर जायच्या तयारीत असलेल्या तिला होती त्या स्थितीमध्ये धावत निघावे लागले. मनात नाही नाही त्या शंका येत होत्या, प्रत्यक्ष त्याला बघत नाही तोपर्यंत जीव थाऱ्यावर नव्हता. डोळ्यातून अश्रू वाहत होते पण सारे लक्ष मात्र दवाखान्याकडे. त्या दिवशी तो रस्ताही जरा लांबच वाटत होता. धावतच ती वरच्या मजल्यावर पोहोचली. तेथे त्याचे काही मित्र होते ज्यांनी तिला सांगितले की, ऑपरेशन करीत आहेत. नंतर काही दिवस आयसीयूमध्ये ठेवावे लागेल. आतापर्यंत धावधाव करणारी ती त्या आयसीयूच्या समोरच्या बाकावर बसली. पायातले त्राणच निघून गेले होते तिच्या. कुणीतरी पाणी दिले प्यायला म्हणून अधाशासारखी पाणी प्यायली व स्तब्ध बसून राहिली. काही वेळाने डॉक्टर आले व त्यांनी ऑपरेशन नीट झाल्याचे सांगितले. परंतु काही दिवस बेशुद्धावस्था राहील व त्यानंतरही काळजी खूप जास्त घ्यावी लागेल अशी सूचना त्यांनी केली.




सुरुवातीचा तो धावपळीचा प्रहर आटोपला. पतीला वेगवेगळ्या नळ्या लावलेल्या स्थितीत ती बघून आली. परमेश्वराचे आभार मानले तिने मनोमन की त्याचे प्राण वाचविले. धावपळ करणारी मंडळी हळूहळू पांगायला लागली. स्वाभाविकच होते. त्यांच्या एकंदर बोलण्यावरूनच तिला जाणवू लागले होते की त्या सर्वांना आता जायचे आहे. सर्वांनी वेळेवर खूप धावपळ केली होती व त्यामुळे सर्वांचे तिने आभार मानले. सासूबाई देखील म्हणाल्या की, आम्ही घरचे सगळे सांभाळून घेऊ. पोरीची काळजी करू नको. तिची शाळा वगैरे सारे आम्ही बघून घेऊ. तू दवाखाना बघ. तिला बरे वाटले. दवाखान्यात थांबणे हीच तिची देखील प्राथमिकता होती. एकंदरीत सर्वांनीच पुढील काही दिवसांकरिता दवाखान्याची संपूर्ण जबाबदारी अलगद तिच्या खांद्यावर टाकली. रात्री दहा वाजता सारे निघून गेल्यावर ती एकटीच उरली. सकाळपासून वेगवेगळ्या मन:स्थितींमधून जात जात आता मात्र तिला थकवा आला होता. थंड पाणी तिने तोंडावर मारले. त्रास होतो थंडीमुळे तरीही त्या दिवशी मात्र त्या पाण्याच्या स्पर्शामुळे तिला खरोखरीच छान वाटले. एकाच दिवसात पार थकून गेली होती ती.

आरशात स्वतःला बघून जरा चेहेरा नीट केला व मग ती त्या आयसीयूच्या बाहेरच्या बेंचवर येऊन बसली. आतमधील वेगवेगळ्या पेशंटचा एक एक नातेवाईक तेथे बसलेला होता. पेशंट तर आतमध्ये औषधोपचार घेत होते परंतु त्यांची अहोरात्र काळजी करणारे काही लोक त्या बाहेरच्या बेंचवर बसले होते. त्यामध्ये ही देखील सामील झाली. एक मोठा प्रवास होता तिच्या नशिबी त्या बेंचवर बसण्याचा. तिला ते ठावूक नव्हते. जराशी भुकेची जाणीव झाली म्हणून तिने सासूबाईंनी आणलेले पराठे खाण्याचा प्रयत्न केला. परंतु दवाखान्यातील एका वेगळ्या प्रकारच्या वासामुळे तिला काहीच खाता आले नाही. दोन घास खाऊन तिने डबा पुन्हा बंद करून ठेवून दिला.

दिवसभराच्या थकव्यानंतर आणि शरीरासोबत मनही थकले असल्याने तिला झोप लागली. रात्री दोन वाजता अचानक नर्स तिच्या पतीचे नाव घेत बाहेर आली. झोपेतूनच खाडकन दचकून ही जागी झाली. धस्स झाले तिच्या मनात. कापऱ्या आवाजात तिने विचारले, काय झाले? नर्स म्हणली, ही दोन इंजेक्शन्स ताबडतोब घेऊन या खालच्या डिस्पेन्सरीतून. काहीही न सांगता ती नर्स त्या आयसीयूच्या दरवाज्याआड गुडप झाली. काहीतरी नक्कीच प्रॉब्लेम आहे असे तिला वाटले. धावतच चार जिने उतरून ती डिस्पेन्सरीत गेली. तेथून इंजेक्शन्स आणले व नंतर त्या नर्सला दिले. किलकिल्या केलेल्या दारातून ते देताना तिने धडधडत्या मनाने तिला विचारले की, काय झाले? त्या नर्सने तितक्याच प्रोफेशनली तिला सांगितले, सकाळी डॉक्टर सांगतील, तुम्ही झोपा. काही लागल्यास मी तुम्हाला उठवते. दार धाडकन बंद झाले. परत मनात नाही नाही ते विचार घेत ती परत त्या बेंचवर जाऊन बसली. डोळ्यातून पाणी वाहू लागले होते. काही सुचत नव्हते. त्याक्षणी तरी ती केवळ एकटी होती.

पदराचे टोक तोंडात दाबून हुंदका दडविण्याचा प्रयत्न तिने केला. तिचे तरी वय फार नव्हते. अशा प्रकारचा कसलाही अनुभव तिला नव्हता. त्या क्षणी जवळच्या कुणाच्यातरी कुशीत शिरून रडावे वाटत होते तिला. कसेतरी तिने स्वतःला सांभाळले. तेवढ्यात एक वयोवृद्ध हात तिच्या खांद्यावर पडला. दचकून तिने बघितले तर एक आजोबा तिच्या बाजूने बसले होते. रडू नकोस पोरी. सारे ठीक होईल, आता तुला याची सवय करावी लागेल. मी देखील तुझ्यासारखाच या बेंचवरचा प्रवासी आहे. माझी पत्नी येथे भरती आहे. गेल्या पाच दिवसांपासून मी देखील दिवसरात्र या बेंचवर बसलेला असतो. सवय कर, धीर धर. आजोबांच्या त्या प्रेमळ व सहानुभुतीच्या शब्दांनी तिला अजून रडूच कोसळले. त्यापुढे आजोबा काही बोलले नाही. त्यांनी तिला रडू दिले. कारण उद्या सकाळपासून तिच्या बाबतीत काय सुरू होणार हे त्यांना ठावूक होते. पहाचे चारच्या सुमारास तिचा डोळा लागला.

पहाट झाली आणि पहिले भेटकरी, काका हजर झाले. काळजीपोटी ते तिच्या नवऱ्याला बघायला आले होते. आल्याबरोबर त्यांनी तिच्यावर प्रश्नांचा भडिमार सुरू केला. कसे झाले, काय झाले, असे कसे झाले, मला का लगेच कळविले नाही, मी असताना या दवाखान्यात का आणले, दुसरीकडे माझ्या ओळखीचे डॉक्टर आहेत, येथे पैसे फार जास्त घेतात, तुम्ही लोक आम्हाला जवळचे मानत नाही असे बहुविध प्रश्न त्यांनी विचारून तिला भंडावून सोडले. जमेल तशी उत्तरे देऊन तिने तो किल्ला लढवला. अपघातानंतर आता काही मदत हवी का या एका प्रश्नाला सोडून त्यांनी सर्व प्रश्न विचारले व नंतर मला याच भागातल्या एका ऑफिसला जायचेय असे म्हणून ते गेले. यानंतर भेटकऱ्यांनी उच्छाद मांडला. प्रत्येकाला पेशंटला भेटायचे होते, सूचना करायच्या होत्या, हिच्याकडून सगळी कथा ऐकायची होती व स्वतःच्या ज्ञानानुसार काहीतरी नवे सुचवून जायचे होते. हा सर्व प्रकार पुढील दहा ते बारा दिवस सुरू होता. या दरम्यान नर्सचे बोलावणे, तिला चार जिने उतरून जाऊन डिस्पेन्सरीतून औषधी आणून देणे, तब्येतीबद्दल डॉक्टरांनी सांगितलेले काहीही न कळता तब्येत सुधारते आहे ही आशा टिकवून ठेवणे व त्या आयसीयू समोरील बेंचवर बसून जमेल तशी झोप घेणे व आपली ताकद टिकवून ठेवणे हे तिने जवळपास वीस दिवस केले.

(पान ६ वर)

---


संस्कारांच्या देशा

रमा गोळवलकर


# नामकरण - २

बाळाच्या नावामागे वर्णानुसार पदान्त असावं. उदाहरणार्थ नाव जरी विष्णू असलं तरी ब्राह्मण वर्णाचा तो विष्णुशर्मा किंवा विष्णुदेव, क्षत्रिय तो विष्णुवर्मा किंवा विष्णुराज, वैश्य असेल तर विष्णुगुप्त किंवा विष्णुदत्त आणि शूद्र असेल तर विष्णुदास. हा नियम पुरुष नावांच्या बाबतीत दिलेला आहे. तोच स्त्री नावांविषयी असावा. कारण भारताच्या सर्वाधिक सामर्थ्यशाली म्हणून गणल्या गेलेल्या राजवंशांपैकी एक गुप्तराजवंश. हे आधी वैश्य वर्णाचे होते, हे त्यांच्या गुप्त या पदान्तावरून स्पष्ट होते. त्यापैकी 'शकारि विक्रमादित्य' चंद्रगुप्ताची कन्या प्रभावतीचा विवाह विदर्भाच्या वाकाटक राजवंशाच्या रुद्रसेनाशी झाला होता. तिचे सर्व शिलालेख आणि ताम्रपट हे 'प्रभावतीगुप्ता' या नावानं देण्यात आले आहे. परंतु विवाहानंतर स्त्रीला पतीचा वर्ण आणि गोत्र मिळत असल्यामुळे तिच्या नावात पदान्त लावत नसावेत, असं अनुमान आहे.




नामकरणप्रसंगी करण्याच्या होमाला आवाहन करण्यात येणाऱ्या अग्निदेवतेचं नाव 'पार्थिव' आहे. बाळ/ळी ज्या पृथ्वीवर वावरणार तिच्याशी संबंधित तो 'पार्थिव अग्नी.' या मृत्युलोकात नवजाताचं नाव अग्नीच्या तेजाप्रमाणे तळपावं हा त्यामागचा हेतू. पुन्हा एकदा उजळणी करू या, म्हणजे आपल्या पूर्वजांच्या कल्पकतेची खात्रीच पटेल. गर्भाधान विधीत असतो वायूशी संबंधित 'मारुत' अग्नी. शरीरातून काहीही बाहेर टाकायचं असल्यास अपान वायूची मुख्य भूमिका असते. पुरुषाचे शुक्राणू अव्यंग, सुदृढ आणि निरोगी अवस्थेत शरीराच्या बाहेर पडणे सहज शक्य व्हावं म्हणून मारुत अग्नी. तर, गर्भाशयाची क्षेत्रशुद्धी व्हावी म्हणून करण्यात येणाऱ्या पुंसवन विधीत 'पावमान' म्हणजे शुद्ध, पवित्र करणाऱ्या अग्नीचं आवाहन करण्यात येतं.

सीमंतोन्नयन विधीत गर्भवती आणि गर्भ दोघांचं मंगल व्हावं म्हणून मंगल नावाचा अग्नी आणि जातकर्माच्या वेळी नवजात बालकाची बलवृद्धी व्हावी म्हणून 'प्रबल' नावाचा अग्नी प्रज्वलित करण्यात येतो. हे सारं इथे पुन्हा पुन्हा सांगण्याचं कारण म्हणजे सनातनी म्हणून जन्म घेण्यातलं मर्म आपल्याला उमजावं. अनुकूल ग्रह नक्षत्रांच्या मेळात, विशिष्ट हेतूनं आमंत्रित केलेला विशिष्ट नावाचा अग्नी आणि त्या त्या प्रसंगी उच्चारायचे वैशिष्ट्यपूर्ण मंत्र, करण्यात आलेले विशिष्ट उपचार आणि विधी यांचा एकत्रित परिणाम म्हणजे एका सनातनी व्यक्तीचा जन्म असतो. म्हणून त्या व्यक्तीचं नावदेखील विशेषण असतं. त्याला अर्थ असतो. त्याचा संबंध त्याच्या जन्मवेळेला आकाशात असलेल्या ग्रह नक्षत्रांशी, सूर्य आणि चंद्रातील अंशांशी (तिथी)आणि पृथ्वीवरच्या त्याच्या जन्मस्थानाशी जोडून त्याचं वैश्विकत्व सिद्ध करण्यात येतं. या नामकरण संस्कारातला सर्वात महत्त्वाचा विधी हे नवजाताला नाव देणं हा असला, तरी अन्य कोणत्याही संस्कृतीत आढळत नाही, अशी एक प्रथा सनातन धर्मात आहे. 'भूमिपूजन, सूर्यदर्शन, आचार्य तथा लोकदर्शन.'

पृथ्वीचा आधार आणि सूर्याचा प्रकाश, तेज, ऊर्जा या दोन मूलभूत तत्त्वांचा तसंच ज्या लोकांमध्ये त्याचा वावर असणार आहे त्या आप्तस्वकीयांचा समावेश बाळाच्या जीवनात करण्यात येता. तसंच पूर्वी प्रत्येक कुलाचे कुलपुरोहित असत. तेच मुलांना प्राथमिक शिक्षण देत. त्यामुळे बाळा/ळीला त्यांच्या मांडीवर देण्यात येतं आणि ते बाळाच्या कानात म्हणतात **'शुद्धोऽसि बुद्धोऽसि निरंजनोऽसि, संसारमाया परिवर्जितोऽसि। संसारमायां त्यज मोहनिद्रां, त्वां सद्गुरुः शिक्षयतीति सूत्रम् ।।'** (तू शुद्ध आहेस, बुद्ध आहेस, निरंजन (निष्कलंक/ निर्दोष) आहेस, संसारमायेपासून मुक्त आहेस.

संसारमायेच्या मोहनिद्रेचा त्याग कर हेच सूत्र तुझे सद्गुरू तुला शिकवतात.) या सगळ्यानंतर बाळाच्या कमरेला एक मेखला (करदोडा) बांधण्यात येते. मातापित्याच्या सांपत्तिक परिस्थितीनुसार कापसाची दोरी, रेशमी धाग्याची, चांदीची किंवा सोन्याची मेखला बाळाच्या कंबरेवर बांधली जाते. संस्कृत भाषेत या अवस्थेला 'कटिबद्ध' म्हणतात ('त्वदीयाय कार्याय बद्धा कटीयं') त्यापासूनच सर्व भारतीय भाषांत 'कंबर कसून कामाला लागणे' हा शब्द प्रयोग आलेला आहे. या एका वाक्यात ती व्यक्ती आळस झटकून सर्वार्थानं सिद्ध झाली आहे, हे स्पष्ट होतं. यामुळे बाळाचा आळस दूर होऊन त्याला सतत स्फुरण मिळावं आणि ऊर्जावान वाटावं. ती/तो सहनशील, अनुशासित आणि कर्तव्यतत्पर व्हावी/वा, हा त्यामागचा उद्देश्य आहे. कितीही प्रतिभा आणि प्रज्ञा असली तरी ती आळसात, व्यसनात किंवा दुर्वर्तनात वाया न घालवता तिचा सदुपयोग समाजासाठी पर्यायानं राष्ट्रासाठी करावा म्हणून बाळाला करदोडा बांधतात. बाळासह बाळाच्या आई- वडिलांनादेखील आपण बाळाला जन्म नेमका कशासाठी दिलेला आहे याचं सतत भान राहावं म्हणून हे कटिबंधन असतं. कटिसूत्राचा वापर कटिवस्त्र सावरण्यासाठी होतोच; शिवाय निरीक्षणांती लक्षात आलेलं आहे त्याचे आरोग्यविषयक लाभही आहेत असंही. करदोड्याचा स्पर्श कंबरेच्या आसपास असलेल्या मर्मस्थानां ना होत असतो. यामुळे जननेंद्रियाचं विशेषत: पुरुष जननेंद्रियांचं स्वास्थ्य चांगलं राहतं. प्रजननाशी संबंधित समस्या उद्‌भवत नाहीत. कंबरदुखीच्या संभावना कमी होतात. हर्नियासारख्या विकाराचा नायनाट होतो. बाल श्रीकृष्णाचं वर्णन करताना भागवतकार त्यानं जठरपट्ट बांधलेला आहे, असं करतात. यात आणखी एक बिंदू जुनेजाणते जोडतात. माणसाच्या शरीराचा सर्वात मोठा घेर कंबर आणि पोट मिळून होतो. त्याच्या भोवती बांधलेला रेशमाचा मजबूत धागा बिकट प्रसंगी कामी येतो. उदाहरणार्थ पूर्वी जेव्हा सर्वत्र साप विंचूसारख्या विषारी दंश करणाऱ्या प्राण्यांचा सुळसुळाट होता. हा चावा बहुतेक वेळा हात किंवा पायाच्या बोटाला घेतला जातो. दंश झालेल्या जागेतून विष इतर शरीरात पसरू नये म्हणून रक्तप्रवाह रोखण्यासाठी घट्ट बांधण्यासाठी हा करदोडाच वापरण्यात येतो. नामकरण विधीत बांधलेला करदोडा जीर्ण झाला तर बदलून अगदी मृत्यूपर्यंत वापरण्याची ही प्रथा भारताच्या सर्वच प्रांतात समाजाच्या सगळ्याच घटकात आढळते.

श्रीविष्णूच्या आयुधांपैकी खड्गाचं नाव आहे नंदक आणि खेटक म्हणजे ढालीचं नाव आहे 'मेखला.' ही ढालच दुष्ट- खलांच्या प्रहारापासून सर्व सुष्टांचं संरक्षण करण्यासाठी वापरली जाते. बाळाचा हा 'मेखला' कटिबंधदेखील सर्वप्रकारच्या नकारात्मक आणि खलदृष्टीपासून बाळाचं संरक्षण करेल ही भावना त्या मागे असते.

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

# खाणकामाविरोधात का एकवटले मासेमार?





**मासेमारी करून उपजीविका करणे हेच मासेमार समाजाचे दैनंदिन जीवन. त्यांनी फारसे कौशल्य शिक्षण घेतलेले नसते. त्यामुळे समुद्राशी कुणी खेळायला लागल्यास त्यांना सहन होत नाही. रोजीरोटीवर गंडांतर येत असेल, तर कोणत्याही सुधारणांना ते प्राणपणाने विरोध करतात. अशाच प्रकारे केरळमधील थांगसेरी गावातील मासेमारांनी उभा केलेला संघर्ष आता देशपातळीवर चर्चेचा विषय बनला आहे.**

खाणकामामुळे आमची मासेमारी कमी झाली, तर आम्ही कसे जगू? केरळमधील थांगसेरी गावातील मासेमार टागोर लेटलस यांनी विचारलेला हा प्रश्नचिंताजनक आहे. केंद्र सरकारच्या 'ऑफशोअर मायनिंग'ला परवानगी देण्याच्या निर्णयाचा निषेध करणाऱ्या कोल्लम जिल्ह्यातील किनारी गावांमधील अनेक मासेमारांपैकी तो एक आहे. नोव्हेंबर २०२४ मध्ये कोळसा आणि खाण मंत्र्यांनी गुजरात, अंदमान आणि निकोबार बेटे आणि केरळच्या किनारी भागात खनिज पट्ट्यांचा लिलाव करण्याची घोषणा केली. त्याचे उद्दिष्ट चुनखडी, पॉलिमेटॅलिक नोड्यूल आणि वाळू उत्खनन करणे हा आहे. यामुळे 'ऑफशोअर मायनिंग'मध्ये भारताचा प्रवेश झाला.

कोल्लममधील मासेमार 'ऑफशोअर' वाळू उत्खननाविरोधात सतत आंदोलने करत आहेत. कोल्लम बंदरावर दिवसरात्र निदर्शने करण्यात आली. त्यासाठी शेकडो मासेमार उपस्थित होते. पाण्यानंतर वाळू हे जगातील सर्वांत जास्त वापरले जाणारे नैसर्गिक संसाधन आहे. घर बांधण्यासाठी अंदाजे २०० टन वाळू लागते, तर एक किलोमीटर महामार्ग बांधण्यासाठी ३० हजार टन वाळू लागते. भारतातील वाळूचे मुख्य स्रोत पूरप्रवण जमीन, किनारी क्षेत्रे आहेत. तथापि, सरकार ऑफशोअर वाळूला बांधकाम क्षेत्रासाठी शाश्वत स्रोत मानते. ११ जानेवारी २०२५ रोजी खाण मंत्रालयाने जारी केलेल्या दस्तावेजानुसार यामुळे देशाला जमिनीवरील स्रोतांवरील अवलंबित्व कमी करण्यास मदत होईल. ऑफशोअर वाळू उत्खननासाठी ड्रेजिंग जहाजे आवश्यक आहेत. ती समुद्रतळातून गाळ काढतात आणि किनाऱ्यावर वाहून नेतात. ही जहाजे सक्शन ड्रेज असू शकतात. ती समुद्राच्या पृष्ठभागावर मोठे कंटेनर ओढतात. तथापि, या खाणकामामुळे सागरी जीव आणि त्यांच्या अधिवासांना आधार देणारा गाळ काढावा. यामुळे स्थानिक प्रजाती नष्ट होण्याची आणि रचनेत बदल होण्याची शक्यता आहे.

'ट्रेंड्स इन इकॉलॉजी अँण्ड इव्हॅल्यूशन' या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या २०२२ च्या अभ्यासानुसार गाळ साचल्याने वाळूची वादळे निर्माण होतात. ती इतर भागांत पसरू शकतात. हे पाणी गढूळ करते आणि जीवांना गुदमरवू शकते. ही वादळे पाण्याची गुणवत्ता खराब करू शकतात आणि गाळातून हानिकारक पदार्थ सोडू शकतात. शिवाय, ही प्रक्रिया आवाज, प्रकाश आणि कंपनांसह सागरी जीवाला त्रास देते. कोल्लम हा वाळूचा एक मोठा प्रदेश आहे. त्यात सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण जास्त आहे. ते सागरी जीवांसाठी एक चांगले खाद्यस्थान आहे आणि एक आदर्श मासेमारीचे ठिकाण आहे. ते कोळंबीसह अनेक तळाशी राहणाऱ्या प्रजातींसाठी प्रजनन भूमी म्हणूनदेखील काम करते. कोल्लम किनाऱ्यावर प्रवाळ प्रजातींची सर्वाधिक विविधता आहे. कोल्लमला मोठ्या प्रमाणात मासेमारांची वसाहत आहे. केरळ मासेमारी सांख्यिकी २०२२ नुसार कोल्लममध्ये २७ सागरी मासेमारी गावे आहेत. त्यात २७ हजार ४७० सक्रिय मासेमार आणि १७ हजार ८३१ सहायक कामगार राहतात. येथील एकूण वार्षिक मासेमारी उत्पादन एक लाख ११ हजार ३१० टन आहे. त्याचे मूल्य दोन हजार २१५ कोटी ८३ लाख रुपये आहे. हे राज्याच्या एकूण मासेमारी उत्पादन मूल्याच्या जवळपास २० टक्के आहे. हे या प्रदेशाचे महत्त्व दर्शवते. या प्रदेशात ऑफशोअर वाळू उत्खननासाठी ओळखले जाणारे तीन खाणपट्टे किनाऱ्यापासून २७ ते ३३ किलोमीटर अंतरावर आहेत. ते २४२ चौरस किलोमीटर क्षेत्र व्यापतात आणि ३०२.४ दशलक्ष टन वाळू साठवतात. येथेच मासेमार मासेमारी करतात. मासेमार खोल समुद्रात २५ ते ४० किलोमीटर अंतरावर मासेमारीसाठी जातात. ऑफशोअर खाणकामाचा आणखी एक संभाव्य परिणाम म्हणजे मासे पकडण्याचे प्रमाण कमी होण्याव्यतिरिक्त किनारपट्टीची धूप वाढणे. २०१२ मध्ये केरळ राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने सांगितले की, कोल्लम हे धूपासाठी अत्यंत संवेदनशील आहे. ते समुद्राच्या भिंती आणि ग्रोइनसारख्या कृत्रिम मार्गांनी अंशतः संरक्षित केले गेले असले, तरी आता परिस्थिती बदलत आहे. 'लाटा अधिक तीव्र झाल्या आहेत आणि त्या आता आजूबाजूच्या मासेमारांच्या घरांचे नुकसान करीत आहेत,' असे मांडक्कलगावातील कंबरे भागात राहणारी ५० वर्षीय लैला म्हणते. तिच्या घराला भेगा पडल्या आहेत. कोल्लमजवळील किनारी वाळू उत्खननाच्या संभाव्य परिणामांबद्दल केरळ विद्यापीठाने २०२५ मध्ये दिलेल्या अहवालानुसार खाणकामामुळे वाळूच्या प्रवाहाचे स्वरूप बदलू शकते. त्यामुळे किनारपट्टी आणखी अस्थिर होऊ शकते आणि जवळच्या वस्त्यांना धोका निर्माण होऊ शकतो, असा इशारा देण्यात आला आहे. कोल्लमच्या अष्टमुडी तलावातून समुद्रात मोठ्या प्रमाणात गाळ वाहून येतो. याचा अर्थ असा, की वाळू उत्खननासाठी राखीव असलेला परिसरदेखील मोठ्या प्रमाणात गाळाने भरला आहे. या भागात मोठ्या प्रमाणात गाळ साचेल. तो उथळ पाण्यात जाईल आणि किनाऱ्याजवळ मासेमारी करणाऱ्या पारंपरिक मासेमारांवर परिणाम होईल, असा इशारा या अहवालात देण्यात आला आहे. गढूळ पाण्यामुळे वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ च्या अनुसूची १ अंतर्गत संरक्षित असलेल्या प्रवाळ खडकांचे निश्चितच नुकसान होईल. हे ठिकाण प्रस्तावित खाण स्थळांपासून अंदाजे पाच किलोमीटर अंतरावर आहे. अभ्यासकांनी किनारी समुदायांवर 'ऑफशोअर मायनिंग'चा परिणाम देखील नोंदवला आहे. 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ ह्युमॅनिटीज एज्युकेशन अँण्ड सोशल सायन्सेस' मध्ये प्रकाशित झालेल्या २०२४ च्या अभ्यासात इंडोनेशियातील बावेन बेटावर 'ऑफशोअर मायनिंग'चा परिणाम मूल्यांकन करण्यात आला. त्यात आढळून आले आहे, की 'ऑफशोअर मायनिंग'मुळे मासे पकडणे कमी झाले असून समुद्राच्या पाण्याची गुणवत्ता खालावली आहे. पर्यटनाचे आकर्षण कमी झाले असून समुद्रकिनाऱ्यावरील प्रदूषण वाढले आहे. पर्यावरणवादी समुदाय आणि खाणकामाशी संबंधित पक्षांमधील सामाजिक संघर्षाच्या घटनांचेही दस्तावेजीकरण या अभ्यासात करण्यात आले आहे. प्रशासकीय अधिकारी ब्रिटन, स्वीडन, इंडोनेशिया, नामिबिया आणि दक्षिण आफ्रिकासारख्या देशांमध्ये असे प्रकार प्रचलित असल्याचे सांगून 'ऑफशोअर मायनिंग'चे समर्थन करतात. माजी केंद्रीय खाण मंत्री प्रल्हाद जोशी यांनी ३ ऑगस्ट २०२३ रोजी 'ऑफशोअर एरियाज मिनरल (डेव्हलपमेंट अँड रेग्युलेशन) ॲक्ट २००२' (ओएएमडीआर ॲक्ट) मध्ये सुधारणा करताना संसदेत दिलेल्या भाषणात म्हटले होते, की देश आधीच किनारी भागात खाणकाम करत आहे. तिथे मासेमारीदेखील होते आणि लोक अजूनही तिथे राहतात. किनारी भागातील खनिज संसाधनांचे नियमन करण्यासाठी हा कायदा २००२ मध्ये करण्यात आला आणि २०१० मध्ये तो लागू झाला. भारताचे किनारी क्षेत्र विशेष आर्थिक क्षेत्रापर्यंत विस्तारित आहे. तिथे भारत संसाधनांचा शोध घेऊ शकतो. २०२३ च्या दुरुस्तीमुळे सरकारला किनारी भागात ऑपरेटिंग अधिकारांचे पारदर्शक लिलाव करण्याची परवानगी मिळते. केंद्रीय खाण मंत्रालय खनिज उत्पादनावर अधिभार आकारून निधी उभारण्यासाठी 'ऑफशोअर एरिया मिनरल ट्रस्ट'देखील तयार करेल. या निधीचा वापर संशोधन, प्रशासन आणि परिसंस्था किंवा लोकांवर खाणकामाचा कोणताही प्रतिकूल परिणाम कमी करण्यासाठी केला जाईल. खरे आव्हान नियमांचे निरीक्षण आणि अंमलबजावणी हे असेल, असे एका खाणतज्ज्ञाने सांगितले. पृष्ठभागावरील खाणकामाचा आपल्या देशाचा 'ट्रॅक रेकॉर्ड' खराब आहे. किनारी क्षेत्रे गतिमान वातावरणात असल्यामुळे सतत नैसर्गिक बदल होतात. त्यामुळे देखरेख करणे आणखी कठीण होईल, असा इशारा ते देतात. या पृष्ठभूमीवर मासेमारांनी सुरू केलेले आंदोलन किती महत्त्वाचे आहे, हे लक्षात येते. (लेखक पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)



## दिसे हा श्रीरंग । विटेवरी ।।

वृंदावनी खेळ । खेळतो श्रीरंग।।
उधळीतो रंग । चैतन्याचे ।।१।।

वाजता मुरली । मुग्ध झाली धरा ।।
शांत होय वारा । क्षणभर ।।२।।

खोड्याही तुझ्या रे । वेड लावी जीवा ।।
ऐसा तू केशवा । मन मोही ।।३।।

गोप गोपिकांचा । तूच प्राण सखा ।।
तरी आगळा का । विरागी तू ।।४।।

मनाचे तरंगी । एक झाला रंग ।।
दिसे हा श्रीरंग । वीटेवरी ।।५।।

**प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)**
९४०३०२९१७८

## जगण्याचा मज सूर गवसला

रोज तोच दिनक्रम, रोजचेच काम
कंटाळला जीव, आरामही हराम
अस्वस्थ चित्त नि मनाची कुरकुर
अवचित गवसला, मज जगण्याचा सूर ।।धृ।।
वाचता वाचता, सहज सुचल्या काव्यपंक्ती चार
आवडल्या घरच्यांना, मन आनंदले फार
गुरू कृपेचा प्रसाद लाभला, नाचला मन मयूर
अवचित गवसला मज जगण्याचा सूर ।।१।।
लिहू लागले उत्साहाने, गद्य पद्य पंक्ती
घरंगळले लेखणींतूनी, सुरेख शब्दमौक्तिक अंती
झंकारले, निनादले असे हे शब्दनूपुर
अवचित गवसला मज जगण्याचा सूर ।।२।।
वेगवेगळ्या समूहांनी मजवरी केले लेखन संस्कार
चुका सुधारूनी, अभिप्राय देऊनी मज दिधला आधार
कंटाळवाणे जीवन मजपासूनी पळाले दूर दूर
अवचित गवसला मज जगण्याचा सूर ।।३।।
लेख लिहिण्याचा मज लागला हो छंद
कवितेतूनी उधळले भाव भावनांचे गंध मंद
स्वनिर्मितीच्या स्वानंदात डुंबले मी पुरेपूर
अवचित गवसला मज जगण्याचा सूर ।।४।।

**मंजिरी अनसिंगकर**

---

कोणे एके काळी

स्वाती काळे (कोलारकर)

# अस्य श्रीरामरक्षास्तोत्रमंत्रस्य...

हल्लीच्या झगमगाटी दुनियेमध्ये सायंकाळची दिवेलागणीची वेळ कधी होते कळतच नाही. आमच्या लहानपणी गाईवासरांच्या गळ्यातील घुंगरांचे परतीचे आवाज ऐकले की आम्हा लहान मुलांची पांगापांग होई आणि गाभाऱ्यातील ज्योतीत शुभंकरोतीचे स्वर अलगद दाटून येत. त्यानंतर रामरक्षेचे पठन सगळ्यांनी मिळून करायचे.

**श्रीगणेशायनमः। अस्य श्रीरामरक्षास्तोत्रमंत्रस्य बुधकौशिक ऋषिः।।** हे बुधकौशिक ऋषी दररोज संध्याकाळी आम्हाला भेटायचे. त्यांच्यामुळेच राम रक्षेबद्दल कुतूहल निर्माण झाले आणि रामरक्षेशी घट्ट मैत्री झाली. रामरक्षा हा मंत्र आहे. त्यामुळे मंत्राचे ऋषी अर्थातच बुधकौशिक ऋषी आहेत. मंत्राचे ऋषी मंत्राचे कर्ते नसतात. ते मंत्राचे द्रष्टे किंवा श्रोते असतात. त्यामुळे रामरक्षा कोणी लिहिली हा प्रश्न मनात येणे स्वाभाविक आहे. महर्षी वाल्मीकिंचे शंभर कोटी श्लोकी रामायण देव, मानव आणि दानव सर्वांनाच पाहिजे होते. सगळ्यांमध्ये चढाओढ सुरू झाली. सुर, असुर, मानव सर्वजण भगवान शंकरांना भेटले. आता वाटणी कशी करायची! शंभर ही समसंख्या आहे. तिघांमध्ये विभागून एक श्लोक उरलाच. सगळे श्लोक अनुष्टुप छंदात होते. म्हणजेच त्या उरलेल्या श्लोकातही बत्तीस अक्षरे होती.

भगवान शंकरांनी बत्तीस अक्षरांची तीन भागांत समान वाटणी करण्याचे ठरवले. एवढे सगळे केल्यावरही शेवटी दोन अक्षरे उरलीच. भगवान हवालदिल झाले आणि म्हणाले, ''आता ही दोन अक्षरे मी वाटत नाही. स्वतःच ठेवून घेतो.'' एवढे बोलून ते ध्यानमग्न झाले. भगवान शंकर म्हणजे वैराग्याचे प्रतीक. त्यांनी दोन अक्षरे ठेवून घेतली म्हणजे नक्कीच काहीतरी खास आहे त्या दोन अक्षरांमध्ये. सगळ्यांनाच त्या दोन अक्षरांचे अत्यंत कुतूहल वाटू लागले. ध्यानस्थ भगवान डोळे उघडण्याची सर्वजण वाट पाहू लागले. खूप काळ लोटला. आता मात्र सर्व जण अस्वस्थ झाले. सगळे एकामागून एक कंटाळून उठून जाऊ लागले. अपवाद फक्त एका ऋषींचा होता. ते ताटकळत थांबले होते. त्यांचे डोळे मिटत होते. पण मोठ्या धीराने ते थांबले होते. तेवढ्यात अचानक भगवान शंकरांनी डोळे उघडले. समोर बुधकौशिक ऋषी वाट पाहात बसले होते.

भगवान शंकरांना ते मूर्तिमंत धीराचे प्रतीक वाटले. आपला वरदहस्त त्यांच्या मस्तकावर ठेवून त्यांनी आशीर्वादरूपात स्वप्नदृष्टांत म्हणजेच रक्षाकवच दिले. जेव्हा दुसऱ्या दिवशी बुधकौशिक ऋषींनी डोळे उघडले तेव्हा त्यांना स्वप्नावस्थेतील प्रत्येक क्षण आठवत होता. ते आनंदाने नाचू लागले. त्यांनी ताबडतोब प्रत्येक क्षण लिहून काढला. हीच आपली रामरक्षा! रामरक्षेच्या पंधराव्या अध्यायात म्हटले आहे,




**आदिष्टवान् यथा स्वप्ने रामरक्षामिमां हरः। तथा लिखितवान् प्रातः प्रबुद्धो बुधकौशिकः।**

रामरक्षा शंकरांनी स्वप्नात बुद्धकौशिकाला ऐकविली व ती त्याने सकाळी उठल्यावर लिहून काढली. भगवान शंकरांनी स्वप्नदृष्टांतात दिलेला रक्षाकवच मंत्र आहे म्हणून त्यास 'रामरक्षा' म्हणतात. विविध अवयवांच्या रक्षणासाठी हा रामरक्षा मंत्र आहे. नखापासून शिखेपर्यंत सारे अवयव राममंत्राने अभिमंत्रित केले तर त्याला 'रामरक्षा सिद्ध करणे' किंवा 'रक्षाकवच धारण करणे' म्हणतात. रामरक्षा धारण करण्याच्या किंवा सिद्ध करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. असे म्हणतात की एकशे एकवीस दिवस विशिष्ट जागेवर आणि विशिष्ट वेळेवर बसून रामरक्षा म्हटली तर रामरक्षा सिद्ध होते. शारदीय किंवा चैत्र नवरात्रात रोज तेरा वेळा रामरक्षेचे पठन केले तर रामरक्षा सिद्ध करता येते.

रामरक्षेतील 'आपदांअपहर्तारम् ... ' हा श्लोक जर एक लक्ष वेळा म्हटला तर सर्व ऋणांपासून मुक्ती मिळते. रामरक्षा म्हटल्याने भूतबाधा होत नाही असेही म्हणतात. असाही विश्वास आहे की उजव्या हातात भस्म घेऊन ही रामरक्षा म्हटली तर भस्म रामरक्षामंत्राने मंतरले जाते. त्याला राम रक्षेचा अंगाराही म्हणतात. लहानपणी आम्हाला कोणाची अचानक भीती वाटली तर आजी राम रक्षामंत्र म्हणणे सुरू करायची. नियमाने रामरक्षा म्हणणाऱ्याला दीर्घ आयुष्य, आरोग्य आणि विद्या लाभते असे ती सांगायची. हे बुधकौशिक ऋषी कोण असावेत?

बुधकौशिकाबद्दल चित्राव संपादित प्राचीन चरित्रकोशात नोंद आहे की ,एक ब्रह्मर्षी ज्याने राम रक्षा स्तोत्र लिहिले आहे. भारतीय संस्कृतिकोशात बुधकौशिक अशी नोंदही नाही. त्यामुळे बुध म्हणजे शहाणा असे विशेषण आणि कौशिक म्हणजे ऋषींचे गोत्र असावे. वाल्मीकि रामायणात एका कौशिक ऋषींचा उल्लेख येतो.

रामाचे अभिनंदन करण्याकरिता आलेल्या महर्षींमध्ये कौशिक ऋषीदेखील होते. पण बहुतांशी विद्वानांच्या मतानुसार बुद्धकौशिक ऋषी म्हणजे विश्वामित्र असावेत. कारण विश्वामित्र आणि रामाचा संबंध आलेला होता. पद्मपुराणातील सर्वांत जुन्या रामरक्षेचा ऋषी विश्वामित्रच आहे. तसेच आनंदरामायणामध्येही शंकर भगवान सांगतात की, त्यांनी ही रामरक्षा विश्वामित्राला सांगितलेली होती. त्यामुळे बुधकौशिक ऋषी म्हणजे विश्वामित्रच असतील याबद्दल शंका यायला नको. प्राचीन वाङ्मयामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी रामरक्षेचे दैवी रोपटे आपल्या ऋषिमुनींनी लावले आहे. सध्या अडतीस संस्कृत श्लोक असणारी राम रक्षा आपण म्हणतो. आपल्या प्रचलित रामरक्षेचे मूळ स्वरूप आनंदरामायणात आणि पद्मपुराणात आहे. आनंदरामायण साधारण पंधराव्या शतकातले आहे. त्यामुळे त्यानंतरची सध्या आपण म्हणतो ती प्रचलित रामरक्षा आहे. प्रचलित रामरक्षेपेक्षा आनंदरामायणातली आणि पद्मपुराणातली रामरक्षा थोडी वेगळी आहे.

पद्मपुराणातील रामरक्षा फक्त बारा श्लोकांची आहे. पद्मपुराण महादेवांनी पार्वतीला सांगितले. पद्मपुराणातील उत्तरखंडाच्या बहात्तराव्या अध्यायात विष्णुसहस्रनाम आहे. त्यानंतर महादेवांना पार्वती विचारते की, ''देवा, जर हे विष्णुसहस्रनाम मला रोज पूर्णपणे म्हणता आले नाही तर यासारखेच फळ देणारे कोणते नाम आहे?'' तेव्हा महादेव म्हणतात, ''रामाचे नाव घे. ते विष्णुसहस्रनामाच्या बरोबरीचे आहे.'' यानंतर ७४ व्या अध्यायात बारा श्लोकांचे रामरक्षा स्तोत्र आहे. अगोदर सांगितल्याप्रमाण या स्तोत्राचा ऋषी विश्वामित्र, श्रीराम ही देवता आणि छंद अनुष्टुप आहे. आपल्या शरीराच्या विशिष्ट अवयवांचे रक्षण श्रीरामाने करावे अशी प्रार्थना त्यात दिलेली आहे आणि अवयवांच्या नावाबरोबर विश्वरक्षक, विश्वसूत्रधधृक, विश्वात्मा, विश्वनायक, दत्तविजय, विश्वसृक, केशव अशी रामनामे दिली आहेत.

आनंदरामायणामध्ये सारकांड, यात्राकांड, विलासकांड, जन्मकांड, विवाहकांड, राज्यकांड, मनोहरकांड व पूर्णकांड आहेत. भगवान शंकर पार्वतीला आनंदकांड सांगतात. आनंदरामायणाच्या जन्मकांडातील चौथ्या सर्गात सीतेला कुश नावाचा पुत्र झाला असा उल्लेख आहे. याच सर्गाच्या सत्तावनाव्या श्लोकात सांगितले आहे की, वाल्मीकिंनी रामरक्षेच्या माध्यमातून सीतापुत्र कुशाला सुरक्षित केले. यावरून हेदेखील सूचित होते की रामरक्षा बालकांना शांती देणारे सुरक्षा कवच आहे. आनंदरामायण, पद्मपुराणातील रामरक्षा व प्रचलित (सध्याच्या) रामरक्षेचा आत्मा सारखाच आहे पण श्लोकसंख्या व रचना थोडी वेगळी आहे. प्रचलित रामरक्षेचा मूलस्रोत पद्मपुराणातून आलेला आहे. प्रचलित रामरक्षेत चौथ्या श्लोकापासून ते नवव्या श्लोकापर्यंत अवयव रक्षणासाठी प्रार्थना आहे आणि रामचंद्राने जणू प्रार्थना ऐकून आपल्याभोवती सुरक्षाकवच तयार केलेले आहे असे वाटते.

प्रत्येक अवयवाबरोबर रामाच्या एका विशिष्ट नावाचे स्मरण केले गेले आहे आणि या नामोच्चारणामुळे आपल्याला संपूर्ण रामायण वाचल्याचा आनंद मिळतो. उदाहरण द्यायचे झाले तर

१) राघव : रघुवंशात रामाचा जन्म झाला. २) दशरथात्मज व ३) कौसल्येय : दशरथ व कौसल्या यांचा सुपुत्र. ४) विश्वामित्रप्रिय : विश्वामित्र व राम दोघांचे एकमेकांवर प्रेम होते. ५) मखत्राता : यज्ञयागाचे राक्षसांपासून रक्षण करणारा. ६) सौमित्री वत्सल : राम व लक्ष्मण यांचे एकमेकांवरचे अपार प्रेम. ७) विद्यानिधि : विश्वामित्राने रामाला काही विद्या दिल्या, ८) भरतवंदित : भरताला रामाबद्दल असलेला आदर. ९) दिव्यायुध : युद्धापूर्वी रामाला दिव्य आयुधे प्राप्त झाली. १०) भग्नेशकार्मुकः धनुष्य मोडणारा. ११) सीतापतीः सीतेबरोबर विवाह. १२) जामदग्नजित्: सीतेशी विवाह करून परत येताना रामाने परशुरामाचे गर्वहरण केले. १३) खरध्वंसी : खर नावाच्या राक्षसाचा वध. १४) जांबवदाश्रयः जांबवनाशी मैत्री. १५) सुग्रीवेशः सीतेच्या शोधार्थ सुग्रीवाशी मैत्री. १६) हनुमत्प्रभू : सुग्रीवाचा मंत्री हनुमान रामाचा सेवक झाला. १७) रघुत्तमः रघुवंशातील श्रेष्ठ. १८) रक्षःकुलविनाशकृत् : राक्षसांचा समूह मारणारा. १९) सेतुकृत्: समुद्रावर सेतू बांधणारा. २०) दशमुखान्तकः :दशमुखी रावणाचा पराभव. २१) बिभीषणश्रीद : बिभीषणाला लंकेचे राज्य देणारा. रामरक्षा कवचाला भेदून कोणीही शत्रू आपल्याला नेस्तनाबूत करू शकत नाही. रामरक्षेची फलश्रुती एतारामबलोपेता... या दहाव्या श्लोकात आहे. पण अकरावा श्लोक खऱ्या अर्थाने रामरक्षेला सर्वोच्च पातळीवर नेऊन ठेवतो.

**पातालभूतलव्योम चारिणच्छद्मचारिणः।**
**न दृष्टुमपि शक्तास्ते रक्षितं रामनामभिः।।**

पाताळ, भूमी आणि सर्वत्र विहार करणारे छद्मचरण (खोटे पाय असलेले यात अमिबासारखे सूक्ष्म जीवजंतूही येतात), खोटे सोंग घेणारे राक्षससुद्धा ज्यांनी रामरक्षेचे कवच धारण केले आहे त्यांना काहीही करू शकत नाही. एवढ्या प्राचीन काळी 'छद्मचरण' हा शब्द वापरला गेला आहे.

खोट्या पायांच्या जीवजंतूंच्या अस्तित्वाची जाणीव त्या काळातही होती आणि रामरक्षा मोठ्या राक्षसांपासून संरक्षण करेलच परंतु या खोट्या पायांच्या सूक्ष्म जीवजंतूंपासूनही आपल्याला संरक्षण मिळेल अशी स्पष्ट ग्वाही आपल्याला प्रचलित रामरक्षेत मिळते. आणि प्राचीन काळच्या राक्षसांपासून तर हल्लीच्या कोरोनापर्यंत आपल्याला रामरक्षेने सुरक्षाकवच दिले आहे याबद्दल कृतज्ञता दाटून येते.

रामो राजमणिः सदा विजयते... हा छत्तिसावा श्लोक रामरक्षेचा मुकुटमणी आहे. यात 'राम' शब्दाच्या सर्व विभक्ती आहेत. आणि 'र' पासूनचे सर्व कठीण शब्दही या श्लोकात आहेत. या श्लोकापासून आपण ध्यानमय अवस्थेत शिरू लागतो. आपल्यात आणि श्रीरामांमध्ये अंतर उरत नाही. परब्रह्माचा तो अनाहत नाद आता चहूबाजूंनी घुमू लागतो. असे म्हणतात की गर्भवती स्त्रीने हा श्लोक सातत्याने म्हटला तर मूल बोबडे बोलत नाही. सत्ययुगातील अध्यात्मसंस्कृतीची ही मर्मबंधातली ठेव आजही कलियुगात आपले अखंड रक्षण करते आहे, ही प्रभू रामचंद्रांचीच कृपा.

# प्रत्येकाला हवाहवासा वाटावा असा 'वानोळा'

साहित्य शिक्षण

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

**आपले गावखेडे सोडून मुंबई या महानगरीमध्ये असो की, इतर कोणत्याही शहरात स्थिरस्थावर झाल्यावर कुण्या एखाद्या शून्य प्रहरी सर्व व्यापाचे ओझे भिरकावून देऊन मागे वळून पाहिले तर गावातल्या मातीच्या कणांची आणि क्षणांची आठवण मनात रुंजी घालू लागते. या सर्व आठवणी फक्त आपल्या एकट्याच्या मनात जन्मघेत नसून गाव खेड्यातून शहरी जीवनात रुळलेल्या प्रत्येकाच्या मनात जन्मून त्या जागेवरच थिजल्या आहेत. किमान आपण आपल्या पुरते तरी त्यांना शब्द रूपाने सजीव करूया... अशा जाणीवेतून प्रा. नरेंद्र पाठक यांनी आपल्या आठवणीचा ओथंबलेला 'वानोळा' ललित रूपात सादर केला आहे. हे ललित लेख म्हणजे लेखकाची गावावरची, माणसावरची टिपणे आहेत.**

नरेंद्र पाठक मूळचे खानदेशातील असल्यामुळे खानदेशातील सामाजिक आणि सांस्कृतिक आलेखाचे पडसाद त्यांच्या लिखाणात जाणवतात, मात्र असे असले तरी प्रादेशिकतेच्या पलीकडे कोणत्याही भागातून आलेल्या आणि कोणत्याही खेड्यातून आलेल्या माणसाच्या भावनांचे गाठोडे त्यांनी वानोळाच्या माध्यमातून उघड केले आहे. वानोळा म्हणजे गाव खेड्यातील मातीत रुजून आलेली नैसर्गिक नव्हाळी, जी कोणत्याही मोबदल्याशिवाय आपल्या प्रेमातील माणसासोबत वाटली जाते, प्रेमाने दिली घेतली जाते. ही अलवार तरलता नरेंद्र पाठक यांनी १४ लेखाच्या माध्यमातून सोबत वाटण्याचा प्रयत्न केला आहे.

कधी आठवणी दाटतात या लेखामध्ये नरेंद्र पाठक स्टँडच्या कोपर्यावर स्टोव्हला पंप मारत चहा उकळवणाऱ्या पांडूचे व्यक्तिचित्रण उभे करतात आणि हाच लेख वाचत असताना विहिरीवर खडखडणारा रहाट आणि त्या रहाटाला कायमस्वरूपी बांधलेली दोरी आणि बादली आपल्या डोळ्यासमोर उभी राहते. आपल्या लहानपणी आपण ज्या मंदिरात जात होतो, त्याचे देवस्थान झाले मात्र ते आता देवाचे स्थान आहे असे जाणवत नाही असे जेंव्हा लेखक सांगतात तेंव्हा अंगावर शहारा आल्याशिवाय राहत नाही. पाहता- पाहता मंदिरे आणि श्रद्धास्थाने देखील व्यापारीकरणाकडे कसे झुकले? हे सांगण्यासाठी फार मोठी कादंबरी लिहिण्याची गरज आहे असे मला लेखकाने लिहिलेल वरील वाक्य वाचल्यावर वाटत नाही.

कदाचित हीच ललित लेखाची परिणामकारक खोली असते जी नरेंद्र पाठक यांना सहजगम्य आहे. माणूस कितीही मोठा झाला तरी गावी गेल्यावर शाळेला भेटण्याची ओढ प्रत्येकाला असते, शाळा म्हणजे दुसरी आईच. असे वर्णन करत लेखक वाचकांच्या काळजाला हात घालतात. त्यांनी शाळेचे केलेले वर्णन आणि शिक्षकांच्या आठवणी यातून निर्माण होणारी भावनिक गुंतागुंत फार संवेदी ठरते. निजरूप दाखवाहो...या लेखात पंढरपूरच्या वारीची ७०० वर्षाची परंपरा आणि सखाराममहाराज गादी परंपरेतील विश्वनाथ बुवा यांच्या धाकट्या मुलाच्या म्हणजे नरेंद्र महाराजांच्या आठवणी लेखकाने लिहिल्या आहेत.


आजच्या काळात जवळपास संपुष्टात आलेला पत्र व्यवहार लेखकाच्या काळात संदेश वहनाचे फार महत्त्वाचे साधन होता. मध्यमवर्गीय कुटुंबात पत्र कार्ड फार महत्त्वाचे समजले जात असे. त्या पत्रव्यवहारातील संवाद, एकमेकांच्या पत्रातून निर्माण होणारा आत्मविश्वास, मिळणाऱ्या प्रेरणा हे सगळे पत्र संस्कार ह्या लेखात आले आहे. त्यात त्यांना आलेल्या दोन पत्रांची छायाचित्रे आणि पत्र नावाची एकच सुंदर स्फुट कविता या लेखाची उंची आणखी वाढवते.

सुधास पत्र आणि सुधाचे पत्र हा असाच एक सुंदर लेख लेखकाने याच ललित संग्रहामध्ये दिलेला आहे, भावनांची ओथंबलेली ओल आपल्याला या लेखात जाणवल्याशिवाय राहत नाही.

बाळ कोल्हटकर राष्ट्राला आपल्या प्रतिभेने आणि वाणीने भारावून टाकणारे व्यक्तिमत्व. त्यांचा सहवास लेखकाला काळाचौकी येथील एका कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक असताना लाभला. त्या विलक्षण प्रसंगाची लेखकाच्या मनावर खोलवर पडलेली छाप लेखकाने जशीच्या तशी शब्दांकित केली आहे. देखणी ती पाऊले या लेखात दिल्ली येथील विज्ञान भवनात राष्ट्रपतींच्या हस्ते लेखकाला मिळालेल्या राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराच्या सोहळ्याचे जिवंत वर्णन आणि त्या पुरस्काराच्या संदर्भाने स्टेट बँकेतील नोकरी किंवा आयुर्विमा महामंडळातील नोकरी सोडून शिक्षक होताना १९८४-८५ मध्ये शिक्षकी पेशात येण्याचा जो निर्णय त्यांनी घेतला होता त्याची आठवण, अश्या व्यामिश्र आठवणींचा कल्लोळ लेखकाने मांडला आहे.

बँकेच्या नोकरीत कदाचित पैसा जास्त मिळाला असता, मात्र शिक्षकाच्या नोकरीत समाधान जास्त मिळाले ही भावना लेखकाने या ठिकाणी जास्त गडद केली आहे. हे लेखकाच्या शिक्षणावरील प्रेमाचे आणि ध्यासाचे प्रतीक आहे. स्वतः राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित असलेल्या नरेंद्र पाठकांना भागवत गुरुजी आठवतात, शिक्षक हा केवळ वर्गाच्या चार भिंती आणि शाळेपुरता मर्यादित नसतो. समाजातील सर्व थरातील मंडळींशी त्याचा सरळ संपर्क होत असल्याने त्याला गाव मास्तरच म्हटले जात असे, लेखकाच्या या वाक्यातून मास्तर हा शब्द किती आदरार्थी आहे हे लक्षात येतं.

लेखकाने जसे सत्य प्रसंग ताकदीने उभे केले




आहेत तितक्याच प्रभावीपणे साखर झोपसारख्या लेखातील स्वप्नरंजन सादर करण्याचे कौशल्य ही त्यांच्या लेखणीत आहे.

ललित लेखनाची खरे तर हीच गंमत असते, ललित लेखक स्वप्न, सत्य, वास्तव आणि कल्पना रंजन यांची अशी काही मांडणी करत असतात की वाचकाला आणखी आणखी गुंतत जावे वाटते. फार पूर्वी सुदाम्याचे पोहे या निवडक कोल्हटकर यांच्या लेख संग्रहातून झोप नावाचा एक विनोदी निबंध वाचला होता तो अजूनही स्मरणात आहे. त्यानंतर झोपेवर कोणी काय लिहिले आणि ते किती लक्षात राहिले? मला सांगता येणार नाही मात्र नरेंद्र पाठक यांनी सांगितलेली झोप, ही खऱ्या अर्थाने साखर झोप आहे, ती गोड आठवणीसह कायमस्मरणात राहील इतकी स्मरणीय आहे असे मी खात्रीने सांगू शकतो. वाडा हा असाच एक आठवणींच गाठोड उलगडणारा वानोळा मधील लेख.

एका काळी कुणाच्याही घरी पाहुणे आले की ते पाहुणे सगळ्या वाड्याचे होऊन जायचे, कंदीलाच्या प्रकाशात जेवण्याचा अनुभव आनंददायी असायचा, अशा वाक्यातून लेखक आपल्या गतकाळातील सोनेरी क्षणांची आठवण करत असताना बिनाका गीतमाला रेडिओ, झिम्मा फुगडी, रामरक्षा, गाण्याच्या भेंड्या अशा अनेक आठवांची तार छेडत जातात. रेडिओचा काळ गेल्यावर सिनेमा हा सुद्धा माणसाच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक झाला होता. साधारणता तालुका ठिकाणी असलेल्या चित्रपटाच्या थिएटरमध्ये सिनेमा पाहण्याच्या अनेक आठवणी आपल्या सर्वांच्याच मनात अजूनही ताज्या आहेत, नरेंद्र पाठक हे त्याला अपवाद नाहीत, सिनेमा या लेखामध्ये त्यांनी अगदी कॉलेजला दांडी मारून घरी न सांगता सिनेमा पाहण्याचे धाडसाचे दिवस ते टोलेजंग मॉलमधील सिनेमागृहात चित्रपट पाहण्याचा अनुभव यांचा तुलनात्मक दृष्टिकोन त्या पद्धतीने व्यक्त केला आहे त्यातून लेखकाच्या संवेदनशीलतेची छाया अधिक गडद होत जाते. इडली ते ऑर्किडपर्यंतचा प्रवास साकार करणारी विठ्ठल कामत यांचे उदाहरण देत सुरू झालेला घाममाहात्म्य हा कष्टकरी जीवनाचे मोल आणि महत्त्व सांगणारा लेख, लोकलच्या डब्यातील प्रवाशांच्या घामाचा, कामगारांच्या घामाचा, शेतकऱ्यांच्या घामाचा, खेळाडूच्या घामाचा वेगवेगळ्या संदर्भात येत या घामातील भेदभावही आर्थिक रूपाने कसा प्रकट होतो ते अगदी परखडपणे सांगतात. रिकाम्या जागा भरा हा आपल्या परीक्षा पद्धतीतील एक महत्त्वाचा प्रश्न.

परीक्षेमधील रिकाम्या जागा आपण आपल्या स्मरणाच्या जोरावर नक्की भरतो. मात्र आपल्या जीवनातील अनेक राहून गेलेल्या रिकाम्या जागा कधीही कशा भरल्या जात नाहीत? त्या भरायच्या असल्या तर काय करावे लागते? अशा मुद्द्यांवर खोलवर चर्चा लेखकाने आपल्या या संग्रहामध्ये केली आहे. भेटीत तुष्टता मोठी... या लेखांमध्ये अगदी छोटे खाणी भेट प्रसंग हळूहळू कसे वार्यावर विरत जातात किंवा त्या छोट्या-मोठ्या आठवणींचे कवडसे जीवन असं कसे व्यापून उरतात ते सांगितले आहे. वानोळा हा शीर्षक लेख आपल्याला आपल्या भूतकाळात नक्की घेऊन जातो. जे जे वानोळा म्हणून यायचं ते सकस असायचं.

नितळ स्वच्छ निर्भेळ कारण मानवी नातेसंबंधही तसेच निर्भेळ व नितळ असायचे, वानोळा म्हणजे भावना श्रद्धा परंपरा प्रेमनिरपेक्षता, अशा वाक्यामधून लेखकाने आजच्या यांत्रिक युगात समोर जात असताना आपण आपल्या आयुष्यातील किती मोठा खजिना मागे सोडून दिला आहे. याची जाणीव आपल्याला करून दिली आहे. वानोळा ही एक प्रत्येकाला हवीहवीशी वाटणारी परचुंडी आहे, जी उघडून चाखल्याशिवाय तिच्यातील गोडवा कळत नाही, मात्र एकदा आस्वाद जिभेपासून मेंदूपर्यंत पोहोचला की ती असीमचव दीर्घकाळपर्यंत आपल्या हृदयाच्या कप्प्यामध्ये साठवली जाते अगदी नरेंद्र पाठक यांनी शब्द रुपाने आपल्यापर्यंत पोहोचवलेल्या वानोळ्या सारखी...!

---

**रविवारची सकाळ नेहमीसारखीच निवांत होती; पण जयंतराव मात्र काहीसे अस्वस्थ होते. त्यांनी आपल्या मोबाईलवर एक व्हिडिओ पाहिला होता, ज्यामध्ये एका प्रसिद्ध नेत्याने कधीही न बोललेली विधाने त्याच्या तोंडी दिसत होती. ते पाहूनच त्यांना प्रश्न पडला की, आपण जे डोळ्यांनी पाहतोय आणि कानांनी ऐकतोय, ते खरंच खरं आहे का?**



# उपाय 'डीपफेक'च्या काळातील आत्मरक्षणाचे...

वेधक

डॉ. कुलदीप देशपांडे

**जयंतराव:** आदित्य, हा व्हिडिओ बघ. यात हे नेते असं कसं बोलू शकतात? मला खात्री आहे की, ते असं कधीच बोलणार नाहीत; पण व्हिडिओत तर त्यांचाच चेहरा आणि आवाज दिसतोय, हे काय प्रकरण आहे?

आदित्य : आजोबा, तुम्ही आता जे पाहिलं, त्यालाच 'डीपफेक' म्हणतात. 'एआय'च्या या प्रगत युगात, आता एखाद्याचा चेहरा आणि आवाज चोरून हुबेहूब बनावट व्हिडिओ बनवणं शक्य झालं आहे. हे तंत्रज्ञान जितकं थक्क करणारं आहे, तितकंच ते अत्यंत धोकादायकही आहे. आज आपण 'माहितीच्या युगा'कडून 'चुकीच्या माहितीच्या युगा'कडे जात आहोत की, काय अशी भीती वाटू लागली आहे. 'डीपफेक' म्हणजे नक्की काय? (तंत्रज्ञानाचा पडद्यामागचा खेळ)

**जयंतराव :** पण, हे नक्की काम कसं करतं? कुणीतरी बसून चित्रपट बनवतो, तसं हे एडिटिंग आहे का?

**आदित्य :** नाही आजोबा, हे तंत्रज्ञान साध्या एडिटिंगच्या खूप पुढे आहे. याच्यामागे 'जनरेटिव्ह अॅडव्हर्सल नेटवर्क्स' अर्थात, 'जीएएन' नावाचं एक प्रगत 'एआय' मॉडेल असतं. सोप्या भाषेत सांगायचं, तर यात दोन 'एआय' यंत्रणा एकमेकांशी स्पर्धा करतात. एक यंत्रणा खोट्या प्रतिमेची निर्मिती करते. अर्थात, जनरेटर आणि दुसरी यंत्रणा ती प्रतिमा खरी आहे की, खोटी हे तपासते अर्थात, 'डिस्क्रिमिनेटर'. ही स्पर्धा लाखोवेळा चालते. जोपर्यंत तपासणारी यंत्रणा 'ही प्रतिमा १०० टक्के खरी आहे' असं म्हणत नाही, तोपर्यंत 'एआय' त्यामध्ये सुधारणा करत राहतो. म्हणजेच, थोडक्यात खोटे व्हिडिओ बनवणार्यांकडून एवढी तयारी करून घेतली जाते की, ते कोणाला खोटे वाटूच नयेत. 'एआय'ला एखाद्या व्यक्तीचे हजारो फोटो आणि तासन्तास ऑडिओ रेकॉर्डिंग दिले की, तो त्या व्यक्तीच्या चेहर्याचे स्नायू, ओठांची हालचाल, डोळ्यांच्या पापण्यांची लय आणि आवाजातील चढ-उतार पूर्णपणे शिकतो. त्यानंतर, आपण कोणत्याही दुसर्या व्यक्तीचा व्हिडिओ वापरून त्यावर या व्यक्तीचा चेहरा 'सुपरइम्पोज' करू शकतो. 'डीपफेक'चे विघातक प्रकार; केवळ मनोरंजनासाठी नाही! आदित्यने जयंतरावांना 'डीपफेक'च्या वाढत्या व्याप्तीबद्दल सविस्तर माहिती दिली

**व्हॉईस लोनिंग:** केवळ ३० सेकंदांचा तुमचा आवाज ऐकून 'एआय' हुबेहूब तुमच्यासारखं बोलू शकतो. आजकाल 'बँक फ्रॉड'मध्ये याचा सर्रास वापर होतो आहे. 'मी संकटात असून, तातडीने पैसे पाठवा,' असा तुमच्या मुलाच्या आवाजातील फोन तुम्हाला येऊ शकतो, जो प्रत्यक्षात 'एआय'ने केलेला असतो.

**फेक न्यूज आणि राजकीय अस्थिरता :** निवडणुकांच्या काळात एखाद्या उमेदवाराचा खोटा व्हिडिओ फिरवून मतदारांचे मत प्रभावित केले जाऊ शकते. यामुळे समाजात दंगली किंवा अविश्वासाचे वातावरण निर्माण होण्याचा धोका वाढतो.

**आर्थिक फसवणूक:** कंपन्यांच्या उच्चपदस्थ अधिकार्यांचे आवाज किंवा व्हिडिओ वापरून कर्मचार्यांना पैशांची अफरातफर करायला लावण्याचे प्रकारही जगभरात घडले आहेत.

**वैयक्तिक बदनामी:** सामान्य स्त्रिया किंवा महाविद्यालयीन मुलींचे फोटो सोशल मीडियावरून चोरून त्यांचे अश्लील 'डीपफेक' बनवण्याचे गुन्हे अत्यंत वेगाने वाढत आहेत. ही एक मोठी सामाजिक समस्या बनली आहे. 'खरे' आणि 'खोटे' कसे ओळखायचे?

**जयंतराव :** बापरे! म्हणजे आता व्हिडिओ कॉलवरही विश्वास ठेवायचा नाही का? हे ओळखायचं कसं?

**आदित्य :** आजोबा, 'एआय' कितीही हुशार झाला, तरी तो निसर्गाची १०० टक्के नक्कल करू शकत नाही. 'डीपफेक' ओळखण्यासाठी या काही तांत्रिक खुणा लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

**१. पापण्यांची नैसर्गिक हालचाल :** 'एआय'निर्मित व्हिडिओमध्ये अनेकदा व्यक्ती डोळ्यांच्या पापण्या नैसर्गिकरित्या लवत नाही. जर पापण्या लवल्या, तरी त्यांची गती खूप वेगवान असते किंवा खूप संथ.

**२. सावल्या आणि प्रकाश:** व्हिडिओमध्ये ज्या बाजूने प्रकाश येतो आहे, त्याच बाजूला चेहऱ्यावर सावल्या आहेत का, हे एकदा तपासा. अनेकदा 'एआय' चेहऱ्यावरचा प्रकाश आणि पार्श्वभूमीचा प्रकाश यांचा ताळमेळ बसवू शकत नाही.

**३. चेहऱ्याच्या कडा :** जर तुम्ही नीट पाहिलं, तर व्यक्तीचा चेहरा जिथे संपतो, तिथे व्हिडिओ किंचितसा 'ब्लर' किंवा अस्पष्ट दिसतो. मान तिरकी केल्यावरही चेहरा हलताना दिसतो.

**४. दागिने आणि चष्मा :** 'एआय'ला चष्म्यावरचे परावर्तन किंवा कानातले डुल यांच्या हालचाली साधणे, अजूनही कठीण आहे. चष्मा घातलेल्या व्यक्तीच्या डोळ्यांजवळ त्रुटी दिसतात.

**५. शब्दांची फेक :** बोललेला शब्द आणि ओठांची हालचाल यात सूक्ष्म असा फरक असतो. तसेच आवाजात मानवी भावनांची नैसर्गिक लय, श्वासाचा आवाज किंवा शब्दांमधील नैसर्गिक विराम आढळत नाहीत. 'डीपफेक'पासून नुकसान टाळण्यासाठी आपण काय करू शकतो?

**आदित्य :** आजोबा, तंत्रज्ञानापेक्षा आपली सतर्कता हेच मोठं संरक्षण आहे. आपण या चार पायर्या पाळल्या पाहिजेत.

**डिजिटल फुटप्रिंट कमी करा:** समाजमाध्यमांवर आपले हाय-डेफिनिशन फोटो आणि व्हिडिओ 'पब्लिक' ठेवू नका. तुमच्या एका फोटोवरूनही 'एआय' काम सुरू करू शकतो.

**कुटुंबाचा 'सिक्रेट कोड' :** जर तुम्हाला संशयास्पद फोन आला, तर त्या व्यक्तीला तुमच्या कुटुंबात ठरलेला एक गुप्त शब्द विचारा. तो शब्द माहीत नसेल, तर समजा तो 'व्हॉईस लोन' आहे.

**अनोळखी लिंक आणि बग:** बघा, तुम्ही या व्हिडिओत आहात का? किंवा तुमचा चेहरा म्हातारपणी कसा दिसेल? अशा लिंकपासून लांब राहा. त्याद्वारे तुमचा बायोमेट्रिक डेटा चोरला जाऊ शकतो.

**थ्री-स्टेप व्हेरिफिकेशन:** कोणताही आर्थिकव्यवहार करण्यापूर्वी केवळ फोनवर विश्वास न ठेवता, दुसऱ्या मार्गाने खात्री करा. 'एआय' आणि कायद्याची ढाल.

**जयंतराव :** पण, यासाठी सरकार काही करत नाहीये का? हे तर उघड गुन्हे आहेत.

**आदित्य :** हो आजोबा, जगभरात आता यावर कायदे बनू लागले आहेत. युरोपियन युनियनच्या 'एआय' कायद्यात 'डीपफेक'वर स्पष्ट लेबल्स लावणे बंधनकारक केले आहे. भारतातही 'माहिती तंत्रज्ञान कायदा' अंतर्गत 'डीपफेक' बनवणे आणि पसरवणे हा गुन्हा आहे. पण, तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे की, कायद्यापेक्षा आपली वैयक्तिक जागरूकता महत्त्वाची झाली आहे. कंपन्या आता 'वॉटरमार्किंग' तंत्रज्ञान आणत आहेत, त्यामुळे 'एआय'ने बनवलेला कोणताही फोटो किंवा व्हिडिओ लगेच ओळखता येईल.

(पान ६ वर)

---

# EU FT करार एक नवा अध्याय - २

**युरोपने सुरक्षा अर्थव्यवस्था आणि लोकशाही सुरक्षित करायला हवी. याचा खूप मोठा गहन अर्थ आहे. युरोप सुरक्षेसाठी नाटो च्या माध्यमातून अमेरिकेवर अवलंबून आहे. प्रेसिडेंट ट्रम्प यांनी नाटो आणि एकूणच बाबतीत युरोपची अब्रू, गेल्यावर्षी सत्ता हाती घेतल्यापासून, अनेकदा चव्हाट्यावर मांडली आहे. त्यांनी कित्येकवेळा, नाटोच्या सर्व सदस्यांचं, आपापल्या हिश्याची रक्कम न भरणं आणि सर्व गोष्टींसाठी अमेरिकेला पैंसे खर्च करायला लावणं, यावर अत्यंत हीन पातळीवर जाऊन, जाहिररित्या शेलक्या कमेंट्स केल्या आहेत. त्याचप्रमाणे अमेरिकेला नाटोमध्ये राहण्यात फार रुची नाही. किंबहुना नाटोचा अमेरिकेवर भार आहे. अशी अनेक जाहीर वक्तव्ये करून, नाटो सदस्यांचा पाणउतारा केला आहे. हे सर्व करण्यामागे एक मानसिक गेम प्लॅन ट्रम्प यांचा आहे.**

परराष्ट्रकारण

प्रसन्न आठवले
भ्र. ९०४९३५३८०९

जेव्हा एखाद्याला तुम्ही सतत, उपकारांची जाणीव करून देत गेलात, तेंव्हा ती व्यक्ती मानसिकदृष्ट्या, न्यूनगंडात राहते. परिणामी आपण जे व जसे मागू त्याप्रमाणे ती व्यक्ती ऐकत जाते. ग्रीनलँड बाबत डेन्मार्कवर दबाव आणण्याचा प्रयत्न ट्रम्प पहिल्या दिवसापासून करत आहेत. त्यासाठी नाटोला आपण करत असलेल्या लष्करी मदतीचा उल्लेख करत राहणं. त्यामुळे युरोप आधीच त्रस्त आणि नाराज आहे. म्हणून जर एण ऋढ- वशरश्र झालं तर आर्थिक संबंधांमुळे, युरोप भारत आणि विशेष करून भारताच्या, अमेरिका विरोधात सुरू असलेल्या खटपटीमध्ये, मोलाची भूमिका बजावू शकेल. यात अजून एक मेख अशी आहे की, जर ट्रम्प यांनी दर्पोक्ती केल्याप्रमाणे ग्रीनलँड घेण्याचा प्रयत्न केला, तर नाटो संपुष्टात येईल. तशी गर्भित धमकी, फ्रान्स आणि डेन्मार्कच्या अध्यक्षांनी दिली आहे. तशी तरतूद नाटोच्या कलम ५ मध्ये आहे. ज्याद्वारे नाटोच्या एका सदस्यांवर हल्ला, संपूर्ण नाटोवर हल्ला असं मानण्यात येईल. त्यामुळे नाटो अश्या पेचात सापडेल की करार तोडण्यावाचून गत्यंतर नसेल. असो.

मोदींचे आर्थिक नीतीचे, संबंधांचे हे प्रयत्न, नजिकच्या नाही तरी, पुढील काळात युरोपला अमेरिकेपासून तोडून, इंडो पॅसिफिक खंडाच्या प्रयत्नांना जोडून घेईल. त्यासाठीच उर्सुला यांनी म्हटलं आहे त्याला खूप गहन अर्थ आहे की, आर्थिक आणि संरक्षण या दोन बाबतीत युरोपने अमेरिका आणि चीनवर अवलंबित्व कमी केलं पाहिजे. त्याचप्रमाणे स्वतःची लोकशाही व्यवस्था मजबूत आणि सुरक्षित करणे आवश्यक आहे. याचा दुसरा सरळ सरळ अर्थ हा आहे की, आज युरोपातील अनेक देशांमध्ये अमेरिकेचे सैनिकी तळ आहेत. जे एकप्रकारे युरोपीय राष्ट्रांच्या लोकशाहीत आणि स्वतंत्र निर्णय प्रक्रियेत अडथळा आहेत. म्हणून ते जोखडसुद्धा झुगारून देण्यासाठी युरोपने शस्त्र, सुरक्षा यांना प्राथमिकता द्यायला पाहिजे. म्हणजेच ज्या आत्मविश्वासाने त्या बोलल्या, त्यावरून इतर सदस्यांचं सुद्धा त्याबाबतीत तसंच मत असू शकेल. म्हणजे अमेरिकन दादागिरी आणि चिनी कर्जाचा विळखा यात अडकलेल्या युरोपियन देशांना त्यातून बाहेर पडण्याची इच्छा निर्माण झाली आहे. त्यासाठी भारतासारखी मजबूत आणि जगात सर्वात वेगाने विकसित होणारी बाजारपेठ ऋीशश ढीरवश -सीशशाशपीीं पश्चात युरोपियन व्यापार्यांना प्राप्त होणार आहे. त्यामुळे त्या युरोपियन राष्ट्रांतर्फे भारताकडे आशेने बघत आहेत. ठशरवळपस लशींुशशप ेंहश श्रळपशी, मोदींच्या भू राजकीय भूमिकेत आणि जगाला नवीन नेतृत्व व्यवस्थेकडे नेण्याच्या प्रामाणिक प्रयत्नात, जुनी आणि कालबाह्य नेतृत्व व्यवस्था बंद व्हावी, हे युरोपचं सुद्धा मत असावं हेच यातून स्पष्ट होतं.

बरं भारत हा फक्त आर्थिक बाबतीतच नाही तर शस्त्रास्त्र उत्पादन, तेल शुद्धीकरण, इत्यादी अनेक बाबतीत आज आपल्या क्षमता विस्तारत आहे आणि भारतात प्रचंड वेगाने वाढणारा मध्यम वर्ग, हे पुढील पन्नास वर्षांसाठी खूप मोठी बाजारपेठ आहे. या सर्व कारणामुळे आणि सर्वात महत्वाचं म्हणजे भारत हा सर्वात भरवशाचा आणि विश्वासू भागीदार आहे, यासाठी युरोपसह संपूर्ण जग आज मोदींकडे आशेने बघत आहे. विशेषतः ट्रम्प सारख्या विक्षिप्त आणि तर्हेवाईक राष्ट्राध्यक्षाच्या प्रतिमेसमोर, मोदींची, स्वच्छ, प्रामाणिक, स्वतंत्र, जबाबदार, उजळ प्रतिमा आज जगातील अनेक देशांना आकर्षित करत आहे.

मोदींच्या फक्त भेटीसाठी, अनेक राष्ट्राध्यक्ष भारतात येण्यासाठी, आतुर आहेत. म्हणूनच युरोपला भारतात त्यांचं, स्वतंत्र, सुरक्षित आणि हिताचं भविष्य दिसत असेल, तर त्यातून, त्यांचं अमेरिकेवर अवलंबित्व हळूहळू कमी होईल. त्यातूनच नवीन जागतिक बहुगामी नेतृत्व व्यवस्था उदयाला येईल. तीच व्यवस्था सध्याच्या नेतृत्वाला आव्हान देत आहे. त्यामध्ये युरोप स्वतःच्या मर्जीने भारताच्या बाजूने उभा राहू इच्छितो. याचा खूप मोठा दबाव अमेरिकेवर पडेल आणि त्याचे परिणाम, आज ना उद्या, आपला हेका आणि हट्ट यापायी युरोप सह संपूर्ण जगाला वेठीस धरणार्या, ट्रम्पला सुद्धा भोगावे लागणार आहेत. म्हणूनच २७ जानेवारीचा करार, नवीन जगातील उभरत्या नेतृत्वाच्या भारताला अर्थपूर्ण, ठरेलच. पण भारताला वेगाने ५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेवरून १० ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे पुढील फक्त १० वर्षात घेऊन जाईल. एकूणच जागतिक राजकीय, सामरीक, आर्थिक अशा सर्वच दृष्टीने भारतासाठी सुवर्णकाळ ठरेल.

(पान ६ वर)

# मृत्युंजयाय रुद्राय नीलकंठाय शंभवे...

संत
प्रकाश एदलाबादकर

आपल्या या विराट हिंदू समाजात अनेक देवदेवतांची पूजा होते. अगदी लहान आणि तामस प्रकृतीच्या देवतांपासून सात्त्विक देवतांपर्यंत! शिवाय भिन्न भिन्न समाजांची भिन्न अशी कुलदैवते आहेत. अनेक प्रकारचे पूजासंप्रदाय हिंदू धर्मात आहेत. इथे प्राणिसृष्टी आणि वनस्पतीसृष्टीही भक्तिभावाने पूजिली जाते. हिंदू धर्माचे हे वैशिष्ट्यच आहे. आपल्या एकूण देवता तेहेत्तीस कोटी आहेत, असे सांगितले जाते. त्याचा आपण अर्थ घेतो तो संख्यात्मक असतो. देव हे संख्येने तेहेत्तीस कोटी म्हणजे, ३३,००,००,००० इतके नाहीत. ते तेहेत्तीस कोटी नाहीत तर तेहेत्तीस 'कोटीं'चे आहेत. येथे 'कोटी' या शब्दाचा अर्थ 'प्रकार' किंवा 'ग्रेड' असा आहे. ११ रुद्र, १२ आदित्य, ८ वसू आणि २ अश्विनीकुमार!

आपली प्रत्येक देवता यापैकी कोणत्या ना कोणत्या कोटीत असते. त्यांच्या पूजेचे, साधनेचे अनेक मार्ग आहेत. उपासनेचे अनेक मार्ग आहेत. परंतु सरतेशेवटी हे सर्व कर्म अर्पण केले जाते ते, त्या परमेश्वराला. 'सर्व देव नमस्कारः केशवं प्रतिगच्छति' ही भावना प्रत्येकाच्या मनात सर्वोपरी असते. पुराणातील कथांनुसार आणि वैदिक विचारांनुसार ब्रह्मदेवाने सृष्टीची निर्मिती केली असे मानले जाते. भगवान विष्णू हे सृष्टीचे पालनकर्ते आणि आदिनाथ महादेव हे संहारकर्ता आहेत अशीही आपली मान्यता आहे. शंकराला 'शिव' असेही नामाभिधान आहे. शिव म्हणजे पवित्र! शिव ही जरी देवता असली तरी ते मानवी जीवनाचे अत्यंत गूढ आणि पवित्र असे 'शिवतत्त्व' आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. आपले जगणे हे अंततोगत्वा 'शिवस्वरूप'असायला हवे. आपल्या हिंदू धर्मात साधारणतः सौर संप्रदाय, गाणपत्य संप्रदाय, वैष्णव संप्रदाय, शाक्त संप्रदाय आणि शैव संप्रदाय असे पाच प्रमुख संप्रदाय मानले जातात. परंतु शिव ही देवता सर्व संप्रदायांचे कुंपण ओलांडून प्रत्येकाच्या मनात संस्थापित झाली आहे. आपल्या देशातील प्रत्येक गावात, अन्य देवतांची मंदिरे कदाचित नसतीलही, परंतु शिवशंकर आणि महाबली हनुमंत यांची मंदिरे असतातच असतात. आपल्या व्यावहारिक जीवनाचे प्रमुख अंग असलेल्या या शिवतत्त्वाचे मूर्त स्वरूप म्हणजे शिवलिंग.

या शिवतत्त्वाचा महोत्सव म्हणजे महाशिवरात्र. हा माघ महिना म्हणजे शिवतत्त्वाचा महिना. ईशान संहितेमध्ये शिवरात्री संबंधाने लिहिलेले आहे... **माघ कृष्णचतुर्दश्यामादिदेवो महानिशी। शिवलिंगतयोद्भूतः कोटिसूर्यसमप्रभः। तत्कालव्यापिनी ग्राह्या शिवरात्रीव्रते तिथिः।।** माघ महिन्याच्या कृष्णचतुर्दशीच्या रात्री आदिनाथ महादेव कोटी सूर्यांच्या प्रभेसह, अत्यंत दीप्तीमान अशा शिवलिंग स्वरूपात अवतीर्ण झाले. महाशिवरात्रीच्या एका व्रतकथेत असे सांगितले आहे की, भगवती पार्वतीने प्रत्यक्ष शंकराला विचारले. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चारही पुरुषार्थांच्या मुळाशी आपणच आहात. यांच्या सिद्धीसाठी कोणते व्रत केले पाहिजे? आपण कोणत्या व्रताने संतुष्ट होता? ती विचारते...

**कर्मणा केन भगवन व्रतेन तपसापि वा। धमर्थिकाममोक्षाणां हेतुस्त्वं परितुष्यति।।** या प्रश्नाच्या उत्तरात मात्र फाल्गुन कृष्ण चतुर्दशीचा उल्लेख आहे. पार्वतीमातेने विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात महादेव जे म्हणतात ते अत्यंत महत्त्वाचे आहे. **फाल्गुने कृष्णपक्षस्य या तिथिः स्याच्चतुर्दशी। तस्यां या तामसी रात्रिः सोच्यते शिवरात्रिका।। तत्रोपवासं कुर्वाणः प्रसादयति मां ध्रुवं। न स्नानेन न वस्त्रेण न धूपेन न चार्चया।। तुष्यामि न तथा पुष्पेर्यथा तत्रोपवासतः।** कोणत्याही प्रकारचे उपचार महादेवाच्या दृष्टीने महत्त्वाचे नाहीत तर महत्त्वाचा आहे 'उपवास'! आता या ठिकाणी आपण उपवास या शब् ाचा सर्वसामान्यपणे जो अर्थ लावतो तो मुळीच अपेक्षित नाही. साधारणपणे निराहार राहणे याला उपवास म्हणतात. परंतु 'उपवास' या शब्दाचा मूलार्थ आहे 'कुणाच्या तरी समीप असणे'! 'वास' म्हणजे राहाणे आणि उपवास म्हणजे परमेश्वराच्या पायाशी वसणे! स्थूल आहाराचा त्याग करून महादेवाच्या चरणाशी लीन होणे. या उपवासासाठी आवश्यक आहे इंद्रियनिग्रह आणि मन-बुद्धीची एकाग्रता. ही साधना आहे. असा उपवास हेच शिवतत्त्वाला प्रसन्न करून घेण्याचे अमोघ साधन आहे. उपासाचे दिवशी भरपूर फराळ करणे म्हणजे उपवास नाही. शिवचिंतनात शांतपणे काळ व्यतीत करणे हा उपवास! अन्य कोणत्याही उपचाराची अपेक्षा न बाळगता केवळ अशा प्रकारच्या उपवासाने तो प्रसन्न होतो. थोडेसेच केले तरी संतोष पावतो म्हणून तो 'आशुतोष'!! परंतु हे थोडेसेच त्याला अत्यंत समर्पणशीलतेने द्यावे लागते. ही समर्पणभावना शिवाराधनेतूनच येते.



छत्रपती शिवरायांनी स्वराज्यस्थापनेची प्रतिज्ञा रोहिडेश्वर शंकरासमोरच केली होती, हे आपण विसरता कामा नये. या समर्पणशीलतेतूनच 'हर हर महादेव' हा युद्धघोष निर्माण झाला. शिवशंकर हा रुद्र आहे. रणांगणामध्ये त्याचे जे रूप प्रकट होते तेच रुद्ररूप! कारण हाच रुद्र मृत्युंजय आहे. **मृत्युंजयाय रुद्राय नीलकंठाय शंभवे अमृतेशाय शर्वाय महादेवायते नमः** आपल्या प्राचीन साहित्यात शिवशंकराच्या रूपाची अनेक वर्णने आढळतात. शंकराचे निवासस्थान स्मशानभूमी आहे, असेही वर्णन आहे.

शंकराच्या वस्त्रांचे आणि अंगावर धारण केलेल्या अलंकारांचेही वर्णन येते. मानवी कवट्यांची माळ, गजचर्म, सर्पांचा सहवास ही कशाची प्रतीके आहेत? ही अपरिग्रही जीवनाची प्रतीके आहेत. भस्म हा त्याचा अंगराग आहे. ते वैराग्याचे प्रतीक आहे. उज्जैनच्या महाकालेश्वर मंदिरात असलेल्या शिवलिंगाची आजही भस्मार्चन पूजा होते. त्यासाठी स्मशानातील चितेवरची राख आणली जाते असे म्हणतात. त्याचा डमरू हा अनाहत नादाचा उदगम आहे, तसाच भाषेतील वर्णाक्षरे त्या डमरूच्या निनादातूनच निर्माण झाली असल्याची आपली श्रद्धा आहे. शिवाचा तिसरा नेत्र हा जसा संहारक मानला जातो तसाच तो विवेकबुद्धीचाही निदर्शक आहे. सर्व जगताचे कल्याण व्हावे यासाठी, समुद्रमंथनातून निघालेले हलाहल त्यानेच प्राशन केले. जगाचे कल्याण व्हावे, सर्व मानवमात्र सुखी आणि संपन्न व्हावा, प्रत्येकाची आत्मिक उन्नती व्हावी, अशी चिंता करणाऱ्या अनेक मनीषी आणि विचारवंतांना उपेक्षा, अपमान, आरोपप्रत्यारोपांचे हलाहल पचवावेच लागते. कारण ही सर्व व्यक्तिमत्त्वे शिवस्वरूपच असतात. याला इतिहास साक्षी आहे. भगवान महादेव केवळ शांत- विरागी रूपात आणि रणरुद्र रूपातच असतात असे नाही तर, सर्व ललितकलांचे अधिष्ठान म्हणून नटेश्वराच्या रूपातही आविर्भूत होतात. श्रीनटराज हे कलावंतांचे आराध्य दैवतच आहे. नाटक सादर करण्यापूर्वी रंगपीठावर नटराज शंकराचे पूजन होते. 'पंचतुंड नररुंडमालधर पार्वतीश आधी नमितो' ही नांदी प्रसिद्धच आहे. नृत्य- नाट्यकलेचे नटेश्वर हे प्रवर्तक मानले जातात. शंकराचे तांडवनृत्य प्रसिद्ध आहे. त्रिपुरासुराचा वध केल्यानंतर शंकराने उल्हासनर्तन केले होते. हेच तांडवनृत्याचे मूळ आहे असे मानले जाते. या उल्हासतांडवामुळे पृथ्वी भयकंपित झाली. सर्व सृष्टी क्षुब्ध झाली. शंभूनाथाला शांत करणे आवश्यक होते. त्यासाठी भगवती पार्वतीने लास्य नृत्य केले. याच तांडव-लास्यांचे परस्पर विसर्जन म्हणजे हा सृष्टीचा प्रपंच! शंकराच्या तांडवातील 'त' आणि पार्वतीच्या लास्यातील 'ल यातूनच 'ताल' हा शब्द निर्माण झाला, असे अभ्यासक सांगतात. आनंदताण्डव, संध्याताण्डव, कालिकाताण्डव, त्रिपुरताण्डव, गौरीताण्डव, संहारताण्डव आणि उमाताण्डव असे तांडवाचे सात प्रकार शैवागमात सांगितलेले आहेत. तामिळनाडूतील चिदंबरम क्षेत्रात शंकराने पृथ्वीवर प्रथमतः तांडव केले असे मानले जाते. तीच प्रसिद्ध आणि पवित्र अशी संध्या तांडवातील नाटेश्वराची मूर्ती तिथे स्थापित आहे. लंकाधिपती रावणाने रचलेले 'शिवताण्डवस्तोत्र' प्रसिद्ध आहे. हे स्तोत्र जो कंठस्थ करेल त्याची वाणी शुद्ध, स्वच्छ आणि स्पष्ट राहील. 'मेघदूत' या काव्यात महाकवी कालिदासाने पूर्वमेघात या सांध्यनृत्याचे वर्णन केले आहे. **कुर्वन संध्याबलिपटहतां शूलिनः श्लाघनीयाम्। नृत्यारंभे हरपशुपतेरार्द्रनागाजिनेच्छाम।।** भगवान शंकर जेव्हा नटराज रूपात नृत्य करतात तेव्हा आपला डावा पाय अतिभंग मुद्रेत उचलतात. आपल्या जटा बांधतात. सर्व अलंकार परिधान करतात. काही जटा मोकळ्या सोडतात. त्या हवेने उडतात. सर्पहार, नररुंडांची माळ, जटेतील गंगा, डोक्यावरचा चंद्र त्यांच्या वैचित्र्यपूर्ण शृंगाराची शोभा वाढवतात.

(पान ६ वर)

# एक संवाद वृक्षांशी



उगवतीचे रंग
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

माणूस आणि निसर्ग याचं एक अतूट नातं आहे. खरं म्हणजे माणूस निसर्गाचाच एक भाग आहे किंवा होता असे आपण म्हणू या. होता असं दुर्दैवाने म्हणावं लागतं कारण माणूस आज निसर्गापासून दूर गेलाय. निसर्गाने त्याला दूर केलं नाही. या निसर्गापासून दूर जाण्याचे दुष्परिणामआपण भोगतोय मंडळी... मानवी जीवनात निर्माण झालेले ताणतणाव, विविध प्रकारचे आजार, वाढते प्रदूषण या सगळ्या गोष्टी निसर्गापासून किंवा नैसर्गिक जगण्यापासून आपण जे लांब चाललो आहोत, त्याचे परिणाम आहेत.

झालं असं की, मागच्या आठवड्यात मी काही कारणानिमित्त एका गावाला गेलो होतो. तेव्हा तेथे असलेल्या माझ्या नातेवाईकांकडे मुक्कामकेला. त्यांचे घर चौथ्या मजल्यावर होते. दिवसभरच्या प्रवासाच्या थकव्याने अंथरुणावर पडल्याबरोबर झोप लागली. सकाळी प्रसन्न होतो. सकाळही प्रसन्न होती. मंडळी आपण जेव्हा प्रसन्न असतो तेव्हा भोवतालचे जगही आपल्याला प्रसन्न भासते. मी सूर्यदर्शन घ्यावे म्हणून बाहेरच्या व्हरांड्यात आलो.

बाहेर पाहिले तो सुर्यनारायण बरेच वर आले होते. सूर्याची सोनेरी किरणे आसमंतात पसरली होती. त्या इमारतीच्या समोरच्या बाजूला चार गगनचुंबी वृक्ष होते. ते वृक्ष सूर्यप्रकाशात न्हाऊन निघाले होते. त्या उंचच उंच वृक्षांकडे मी बराच वेळ भान हरपून पहात राहिलो. त्यांनी माझे मन आकर्षून घेतले होते. मोठी सुंदर दिसत होती ती झाडे. वसंतात त्यांना नुकतीच नवीन पालवी फुटली होती. तो हिरवाकंच पर्णसंभार त्यांच्या अंगावर मोठा खुलून दिसत होता. त्यांच्याकडे बघता बघता माझी जणू समाधी लागली. ती झाडे सजीव होऊन माझ्याशी बोलू लागली, अरे, बघतोस काय असा आमच्याकडे? ही आमची सुंदर नवी हिरवीगार पाने आवडली ना तुला! पण ही अशीच नाही आली रे. आम्ही किती ऊन, पाऊस, वारा वादळे झेलली आमच्या अंगावर.

कधी कधी अंगावर झालेले कुर्हाडीचे घावही सोसले. म्हणून उंच वाढलो आम्ही. घाव सोसल्याशिवाय जीवनात शहाणपण आणि परिपक्वता येत नाही. आणि हो, आम्ही ज्या जागी उभे आहोत तेथेच घट्ट पाय रोवून उभे राहिलो.घाबरलो नाही. हललो नाही. बुद्धाशी, ज्ञानेश्वरांशी अशीच बोलली असतील का ही झाडे? त्यांनाही वृक्षाच्या सान्निध्यातच साक्षात्कार झाला. तुकोबांनी म्हणूनच म्हटले असावे, वृक्ष वल्ली आम्हा सोयरे वनचरे. त्या वृक्षांमधील एक झाड बरेच जुने होते. त्याच्या खोडावरून त्याचे वय लक्षात येत होते. पण त्यानेही नवी पालवी धारण केली होती. ही नवी पालवी आशेची प्रतिक होती. तुमचे वय कितीही असू देत, जोपर्यंत तुमच्या मनात आशा आहे, जगण्याची उर्मी आहे,तोपर्यंत तुम्ही तरुणच राहाल. ही आशा, जगण्याची उर्मी संपली की तुम्ही तरुण असलात तरी, वृद्धत्वाकडे वाटचाल कराल.

# एआयची निर्जीवता

प्रबंधांची बीजे
श्रीरंग हिर्लेकर

तंत्रज्ञानाने एआय म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेला जन्म दिला आणि आतापर्यंच्या सर्व यांत्रिकीकरणात एक फार मोठे क्रांतिकारी पाऊल पडले. चार्ली चॅप्लीनच्या मॉडर्न टाईम्स या चित्रपटातील कल्पना आता कालबाह्य झाल्या. संगणक फक्त सांगकाम्या नोकर होता, एआय स्वत: विचार करू शकतो. त्यामुळे अशी भीती व्यक्त केली जाते की एआय सर्वच क्षेत्रातून मानवाचे उच्चाटन करून स्वत:च सर्वसत्ताधीश होईल की काय? चॅट जीपीटीच्या लीला तर निराळ्याच. यावेळेसचे हे प्रकरण जरा जास्तच गंभीर आहे. तरीही अस्सल आणि नक्कल हा फरक कायमच राहील अशी आशा करूया. एखादे उदाहरण बघून आपण ठरवू.



**चित्रकला:** मानवाने काढलेल्या चित्रात निरीक्षण, हेतू, सांस्कृतिक संदर्भ, रेषांतील मोकळीक, प्रतीकात्मकता, साधेपणा आढळतात. त्यातील चुका हे सुद्धा त्यांचे सामर्थ्य आहे. एआय निर्मित चित्रामागे प्रचंड डेटाधारित संयोग, सौंदर्यदृष्ट्या रेखीवता पण अनुभवहीन निर्मिती आढळते. एआय हे साधन आहे. वेगवेगळ्या ठिकाणांहून माहिती गोळा करीत, विश्लेषण करीत ते शिकत असते. मात्र तेथे स्वत:ची नैसर्गिक सृजनता आणि सर्जनता नाही. मानवी विचारांची बैठक नाही. दोघांच्या चित्रातील फरक शब्दात विशद करावयाचा तर

**१) हेतू :** मानवी चित्रात काय सांगायचे आहे हा हेतू आधी ठरतो आणि त्यानुसार रेषा ही पुढची पायरी ठरते. यांत्रिक चित्रात हेतू हा बाहेरून कोणीतरी ठरवतो आणि चित्र हे त्यानंतरच्या अनेक शक्यतांपैकी एक असते. एआयनिर्मित चित्र अधिक परिपूर्ण वाटले तरी त्यात वैचारिक दिशेची उणीव आढळते.

**२) अपूर्णता :** मानवी रेषा म्हणजे कंपित मनातील आंदोलनांचा परिपाक, त्यातील चुका हा दोष नसून ती एकप्रकारे मानवाची स्वाक्षरीच असते तर एआयची प्रत्येक रेष ही मोजून मापून आणि म्हणून कृत्रिम, निरपेक्ष किंवा निर्जीव दिसते.

**३) काल :** मानवी चित्र तयार होताना त्यात काल साठतो. ती साठवण म्हणजे चित्रकाराच्या अंतरंगातील विचारांची आंदालने असतात. याउलट यांत्रिक चित्रे क्षणात तयार होतात, निरीक्षकाला त्यात कालाच्या ठशाचा अभाव आढळतो कारण निरीक्षक हा वाहनावर आरूढ होऊन जीवन जगत असतो.

> १९८० च्या दशकात संगणक सामान्यांच्या आवाक्यात आला आणि तेव्हा त्याच्या विविध क्षेत्रांतील असामान्य कर्तृत्वाने बेकारी वाढेल, कलाकार नष्ट होतील वगैरे शंकांमुळे त्याविरुद्ध भरपूर प्रचार झाला. संगणकाने मात्र सर्वांना पुरून उरत आपले राज्य पसरवले. डेस्कटॉप तर लॅपटॉप होऊन मांडीवरील ध्रुवबाळच झाला. मदतीला इंटरनेट आले आणि आता तर एकेकाळी या अहिरावण महिरावणांशिवाय आपण राहू शकत होतो हे खरे वाटत नाही.

**४) निवड आणि गणना :** मनुष्य रेषा इथे हवी, तिथे हवी असे ठरवतो, नाकारतो, पुसून पुन्हा काढतो. एआय निवड न करता फक्त गणन करतो. निवडीत चित्रकाराचे व्यक्तिमत्त्व उतरते तर एआयच्या गणनेत सांख्यिकी संभाव्यता.

**५) स्मृती आणि अनुभव:** चित्रकाराच्या कृतीतून त्याची स्मृती, दु:ख, आनंद, थकवा, भावना, संस्कार हे सर्व उत्कटतेने पाझरतात. एआयच्या कृतीत अनुभवशून्य, त्रयस्थपणा आणि कोरडी स्मृती असल्याने कृत्रिमपणाच प्रतीत होतो.

**६) संवेदना :** चित्रकार आणि दर्शक हे दोघेही मनुष्य असल्याने त्यांची तार कोठेतरी जुळून तादात्म्यता होते, मधुर स्वरांच्या धारा बरसतात. काटेकोर आणि स्थितप्रज्ञ एआयला मनच नसल्याने मानवी दर्शकाशी त्याचा संवाद होण्याचा प्रश्नच नाही. मानवी कृतीत कोणीतरी आहे हे दिसते तर यांत्रिक चित्रात काही तरी आहे इतकेच प्रतीत होते. मानवी चित्रात कलाकार आणि दर्शकाचा संवाद असतो. एआयकडून रसनिष्पत्ती होणे कठीण असते. एआयचा काटेकोरपणा भावशून्य वाटतो कारण तेथे हृदय नसून प्रक्रिया आहे. गृहिणीच्या हातचा स्वयंपाक आणि हॉटेलमधील स्वयंपाक यातील चव आणि गुण यात जो फरक असावा तोच येथे आहे. भावना म्हणजे थरथर, अडखळणे, विचारांची आंदालने, असमतोल, अनपेक्षित स्फुरण. हे स्फुरण म्हणजे धक्कातंत्र नसेल रसोत्पत्ती होत नाही. एआय कधीच अडखळत नाही म्हणून उठतही नाही. म्हणूनच ते मानवाला संवेद्यही नाही. सजीव अपूर्णच असतो.

एआय निर्जीव असल्याने अचूक आणि एकदाच आहे. परंतु अपूर्णतेतच नवनवे भाव निर्माण होऊ शकतात. मानवनिर्मित एकच चित्र अनेकांशी अनेक मार्गांनी बोलते. पाब्लो पिकासोच्या मोनालिसाचे हास्य किंवा राजा रविवर्म्याच्या चित्रांचे सौंदर्य दरक्षणी नवे भासते कारण ते दोघेही आस्वादकाच्या भावभावनांशी सात्म्य होतात कारण तेथे प्रतिभा असते. अपूर्ववस्तुनिर्माणक्षमा प्रज्ञा म्हणजे प्रतिभा अशी अभिनवगुप्तांनी प्रतिभेची व्याख्या केली आहे. म्हणजे नावीन्याचे सृजन. प्रतिभा ही नवनवोन्मेषशालिनी असते. नवीन उन्मेषांचे अंकुर प्रकटवणारी प्रज्ञा म्हणजे प्रतिभा. ही मानवाजवळ असू शकते, एआयजवळ नाही. ते फक्त ज्ञात गोष्टी-अनुभव यांचीच गोळाबेरीज करून सादरीकरण करू शकते. तृष्णा आणि भय या दोन तीरांमधून मानवी षड्विकारांचे प्रवाह वाहतात. तृष्णेच्या काठावर काम, लोभ आणि मोह असून त्यासाठी धाव घेण्याचे स्फुरण आहे. भयाच्या तीरावर आहे ते गमावण्याची काळजी असते. त्यातून मद, मत्सर आणि क्रोध वाहतात. हे सर्व मानवी कृतीत उमटतात. एआयजवळ तृष्णाही नाही आणि भयही नाही कारण त्याला स्व ची जाणीवच नाही. अस्तित्व टिकवण्याची चिंता नाही म्हणून त्याच्याजवळ करुणाही नाही आणि शौर्यही नाही. सारांश म्हणजे एआय कला निर्माण करेल पण रस नाही.

**मोक्ष म्हणजे :** तृष्णा आणि भय हे दोनही नसणे. हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तः किंवा उदासिनो गतव्यथः। हर्ष, मर्ष, भय आणि उद्वेग नसणे, जे गमावले त्याचे दु:ख नाही, काही मिळाले नाही या व्यथेविषयी उदासीन असणे. मग मानव आणि एआय यांच्यात फरक तो काय? भागवतातील पूर्वजन्मातील स्मृती आणि चुका यांची जाणीव जागृत असल्यामुळे मुद्दाम जडत्व धारण केलेल्या भरत राजाचे वागणे निराळे आणि मुळातच भावशून्य एआयचे वागणे निराळे. कृती आणि हालचाल यात अंतर आहे. कृती म्हणजे प्रसंगी काही गमावू हे दिसत असूनही जबाबदारी स्वीकारून धोका पत्करणे. मानव हे करेल एआय करणार नाही. एखाद्या अतिहुशार व्यक्तीला बुद्धिबळ खेळ शिकवला तरी तो जिंकेलच असे सांगता येत नाही. कारण त्याच्याकडून अतिविचारामुळे कोणतीच चाल होणार नाही. आपल्या चालीवर प्रतिस्पर्ध्याच्या ध्यानातही येणार नाही अशी संभाव्य चाल स्वत:च्याच लक्षात आल्याने हरण्याच्या भीतीने हा स्वत: निष्क्रियच राहील.



थोडक्यात धाडस नाही म्हणून कृतीच नाही. सर्वसाधारण मानव स्वत:ची मर्यादा ओळखून कधी धाडसही करतो. कधी अंगाशी येते तर कधी यशही मिळते. नेहमीच गणन किंवा सांख्यिकीच्या आवर्तात गटांगळ्या खाणे योग्य नव्हे. थोडक्यात म्हणजे ज्याला सर्वकाही दिसते त्याच्या हातून काही घडणे शक्य नाही. गीतेने कर्म-विकर्मावर भाष्य करताना हेच सांगितले. झेल घेतला जाईल या कल्पनेने एआय कधी सिक्सर मारणारच नाही. पण हा झेल सोडलाही जाऊ शकतो हे लक्षात घेऊन त्रिशतकाच्या उंबरठ्यावर वीरेंद्र सेहवाग धाडस करतो. **हतो वा प्राप्यसि स्वर्गं जत्वा वा भोक्ष्यसे महिम् किंवा कर्मण्ये वाधिकारस्ते माफलेषु कदाचन।** धोका माहीत आहे, तरीही उडी मारणे ही खरी कृती. झेल घेतला जाण्याची शक्यता आणि सोडण्याची शक्यता ही गणिते एआय करेल. मानव आशेवर खेळतो, एआय गणितावर खेळते हाच तो त्या दोघांमधील फरक. आणि म्हणूनच एआयची कृती ही रेखीव, अचूक असूनही नीरस आणि निर्जीव वाटते. अजून एक उदाहरण- तान्हे बाळ स्तनपान करताना हे आईचे की दाईचे हे बरोबर ओळखून प्रतिक्रिया देते. कारण ते आणि त्याची आई यांच्यात अनेक भावबंध निर्माण होत असतात नव्हे ते निसर्गत:च असतात.

आईच्या मनात बाळाचे पोषण नीट व्हावे ही तृष्णा आणि ते कदाचित होणार नाही हे भय असते. त्यामुळे तिच्या स्तन्याची गुणवत्ता क्षणोक्षणी बदलते आणि बाळ तेच ओळखून तिला बिलगते.

एआयजवळ सहृदयत्व नसल्याने त्याच्या कृतीत फक्त निर्जीव सादरीकरण असेल. चित्रकलेचे हे उदाहरण सर्वच विषयांना लागू आहे. एआयच्या भावशून्यतेचा, त्रयस्थपणाचा, अचूकता आणि वेगाचा फायदा सर्वच क्षेत्रांत होईल हे तितकेच खरे. पण तरी थोडक्यात सांगावयाचे तर एआय सर्व जगावर राज्य करेल ही भीती निरर्थक आहे. त्याची भावशून्यता हाच त्याचा मर्मबिंदू आहे. विवेकानेच या संकटाचा सामना करता येईल. मानवाच्या हजारो वर्षांच्या इतिहासात असे अनेक भस्मासुर निर्माण झाले आहेत, आपापल्या काळी त्यांनी सर्वांना घाबरवले होते हेही खरे. ३१ डिसेंबर १९९९ च्या रात्री १२ वाजता वाय-२-केचे संभाव्य संकट कसे निष्क्रिय करण्यात आले होते ते अनेकांना आठवत असेलच. पायातील वहाण पायात ठेवायची की आपल्याच डोक्यावर घ्यायची हा विवेक मानवाजवळ आहे, एआयजवळ नाही.

# ग्रहसंकेत

**(रविवार, १ फेब्रुवारी ते शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, १ फेब्रुवारी-** माघ स्नान समाप्ती, अन्वाधान, रथयात्रा भंगेशी, श्री संत रोहिदास जयंती, माघ पौर्णिमा, कुलधर्म, श्री खंडोबा शिखर काठीयात्रा जेजुरी, रेणुका यात्रा सौंदत्ती, राष्टीय तटरक्षक दिन, श्री नवरात्रोत्सव समाप्ती ✻ **सोमवार, २ फेब्रुवारी-** गुरुप्रतिपदा, गाणगापूर यात्रा ८ दिवस, गुरुदेव शैल्य यात्रा गमन, जान्हवीदेवी यात्रा एरंडोली (ता. मिरज), भैरवनाथ बगाड यात्रा केसे (ता. कराड), श्री संत निवृत्तीनाथ जयंती, श्री अंबाबाई किरणोत्सव समाप्त कोल्हापूर, श्री प्रभाकर महाराज पुण्यतिथी सोलापूर, निरंजननाम सप्ताह शिंपेवाडी (खानापूर) ✻ **मंगळवार, ३ फेब्रुवारी-** श्री कालभैरव यात्रा, गडहिंग्लज व रिळे (जि. सांगली), भैरवनाथ यात्रा नुने (जि. सातारा), नरवीर उमाजी नाईक पुण्यदिन भिवरी (ता. पुरंदर), ज्योतिर्लिंग यात्रा जळव (ता.पाटण), चन्नबसवेश्वर रथोत्सव उळवी, विठ्ठलाईदेवी जागर सरवडे ✻ **बुधवार, ४ फेब्रुवारी-** संत नरहरी सोनारमहाराज पुण्यतिथी, नरवीर तानाजी मालुसरे पुण्यदिन, खळनाथ यात्रा चंदगड, जागतिक कर्करोग दिन ✻ **गुरुवार, ५ फेब्रुवारी-** संकष्ट चतुर्थी (चंद्रोदय- मंबई- २१: ४४, अहिल्यानगर- २१: ४०, कलबुर्गी-२१: ३१, कोल्हापूर-२१: ४१, जालना-२१: ३५, धाराशिव-२१: ३४, नांदेड-२१: २९, पंढरपूर-२१: ३७, परभणी-२१: ३१, पुणे-२१: ४३, बीड-२१: ३५, बीदर-२१: २८, लातूर-२१: ३२, विजापूर-२१: ३५, छत्रपती संभाजीनगर-२१: ३८, सांगली-२१: ४०, सातारा-२१: ४२, सोलापूर-२१:३४), श्री मायाक्का यात्रा चिंचली (ता. रायबाग), गोदड महाराज पुण्यतिथी कर्जत, आईसाहेब महाराज पायी दिंडी किरकसाल (ता. माण) ✻ **शुक्रवार, ६ फेब्रुवारी-** औदुंबर पंचमी, श्रीकृष्ण सरस्वती महाराज जयंती कोल्हापूर, औदुंबर, नृसिंहवाडी यात्रा, चन्नवीर गुरू होटगी पुण्यतिथी होटगी, श्रीनाथ मसोबा यात्रा कावडवाडी, श्रीमहालक्ष्मी

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** ३, ५, ६, ७ फेब्रुवारी ✻ **डोहाळ जेवण-** १ फेब्रुवारी (१७ नंतर), ६ फेब्रुवारी ✻ **बारसे-** १ फेब्रुवारी (१७ नंतर), ६ फेब्रुवारी ✻ **जावळ-** ६ फेब्रुवारी ✻ **गृहप्रवेश-** ६, ७ फेब्रुवारी

### मेष :- मनासारखे होत जाईल
जे नशिबात आहे, ते येईल, जे नशीब जे नाही ते येऊनही पुन्हा जाईल. चंद्राचा गुरूशी होणारा लाभ व केंद्रयोग आपणास शुभ फलदायी आहे. सर्व काही मनासारखे होत जाईल. कसलीच चिंता करू नका. बुध, शुक्र ही युती लाभस्थानी होत आहे. नव्या संधी लाभतील. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. शुभ ता. १, ५, ७

### वृषभः- आर्थिक प्रगती
आयुष्यात कधीच निराश होऊ नका, जिथे दु:खाची गर्दी असते, तिथेच सुख थांबून वाट पाहत असते. धनस्थ गुरुचा चंद्राशी होणारा लाभ व केंद्रयोग आपली आर्थिक प्रगती करणारा आहे. नव्या विचारांना चालना मिळेल. यांत्रिक क्षेत्रात, गुढ विद्येत प्रगती होईल. खर्च विचाराने करावेत. शुभ ता.१, ३, ५,

### मिथुन:- कलागुणांना संधी
शांत बसून निरीक्षण करावे, प्रत्येक गोष्टीला प्रतिक्रिया टाळावी. त्रास होईल. राशीतील गुरुचा चंद्राशी होणारा लाभ, केंद्रयोग शुभ फलदायी आहे. सौख्याच्या घटना घडतील. फार दगदग करू नका. देणे-घेण्याचे व्यवहार विचाराने करावेत. कलागुणांना चांगल्या संधी लाभतील. अडचणींवर मात कराल. चिकाटीने रहावे, प्रगती होत जाईल. शुभ ता. १, ६, ७

### कर्क:- ऐहिक सौख्य लाभेल
काहीचं कामाचा नसलेला विचार किती करणार? कशासाठी? द्या सोडून अति विचार करणं...राशीसमोरील रवि- मंगळ अविचाराने निर्णय घ्यायला लावतील. त्यामुळे अविचार नकोच. सर्वच बाबतीत जपून असावे. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. नव्या कामाला गती देता येईल. अपेक्षित घटना घडतील. ऐहिक सौख्य लाभेल. शुभ ता. १, २, ६

### सिंह:- अविचार झटकून टाका
एखादी योग्य व्यक्ती आपल्या आयुष्यात येणं ही सुद्धा एक लॉटरीच असते. लाभातील गुरु- चंद्राशी लाभ, केंद्रयोग करणारा आहे. त्यामुळे अपेक्षित फलदायी हा सप्ताह आहे. स्पर्धांमध्ये यश मिळेल. गृहसौख्य लाभेल. कोणताही अविचार वेळीच मनातून झटकून टाकावा. प्रकृतीच्या तक्रारींकडेही दुर्लक्ष नको. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. शुभ ता. १, ७

### कन्या:- संततीशी समजून घ्या
आयुष्यभर कोणी जगण्याचं कारण विचारत नाही, नंतर मात्र... कर्मस्थ गुरुचा चंद्राशी होणारा शुभ योग कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती करणारा आहे. संततीच्या विचाराशी थोडे तरी जमवून घ्या. ज्ञानदान, बँक, विमा अशा क्षेत्रात अनुकूलता राहील. केलेला संघर्ष आता शुभ फलदायी ठरेल. अपेक्षित प्रगती होईल. शुभ ता. १, ५, ७

### तुला:- धावपळ करू नका
फुंकर घालून दिवा मालविता येतो, पण उदबत्ती नाही. ज्यांचं कर्तुत्व दरवळत त्यांना कोणी मोडू शकत नाही. भाग्यातील गुरुचा चंद्राची होणारा लाभ, केंद्रयोग लाभदायक आहे. विनाकारण फार धावपळ करू नका. अस्वास्थ्य ओढवून घ्याल. कला-गुणांमध्ये प्रगती घडेल. प्रतिकूलतेवर मात कराल. शिक्षणात मंद गतीने प्रगती घडेल. शुभ ता. १, ५, ७

### वृश्चिक:- सामंजस्याने रहावे
सकारात्मक विचार चुंबळीसारखे असतात, ते संकटाला तोंड देण्याची ताकद देतात. भाग्येश चंद्र गुरुशी लाभयोग करणार आहे, त्यामुळे अनुकूलता राहील. सौख्याच्या घटना घडतील. उत्साह, धडाडीने विविध कामे मार्गी लावू शकाल. अडचणींची चिंता नको. मार्ग निघत जाईल. अपेक्षित संधी लाभतील. सामंजस्याने रहावे. शुभ ता. १, ५

### धनु:- वादविवाद नकोत
प्रत्येक संधीमध्ये अडचणी दिसतील पण सकारात्मक विचाराने प्रत्येक अडचणीमध्ये संधी दिसेल. राशी स्वामी गुरुचा चंद्राशी होणारा शुभयोग कौटुंबिक जीवनात सौख्यदायी घटना घडविणार आहे. अनावश्यक खर्चाचे प्रसंग टाळावेत. गुंतवणूक ही विचाराने करावी. वादविवादही नको. फार तिखट, तामसी पदार्थ खाऊ नका, त्रास संभवतो. शुभ ता. १, ३, ५

### मकर:- पोटाच्या तक्रारी
जैसे ज्याचे कर्म, तैसे फळ देतो रे ईश्वर.. राशीत मंगळ, रवि त्यामुळे आपले मन सैरभैर होऊ देऊ नका. आर्थिक कामे मनासारखी झाल्याने समाधान लाभेल. आहार, विहाराकडे अधिक लक्ष द्यावे. पोटाच्या तक्रारी संभवतात. मुलांच्या वागण्याकडे दुर्लक्ष होऊ देऊ नका. फार धावपळ ही टाळावी. कार्य सिद्धी होत जाईल. शुभ ता. १,३

### कुंभ:- तणाव ठेवू नका
जोपर्यंत आपल्या खिशात लक्ष्मीकांत आहे, तोपर्यंत आपण सर्वांसाठी प्यारेलाल असतो. धनात शनि तर व्ययात रवि, मंगळ त्यामुळे प्यारेलाल होण्याच्या नादाला लागू नका. आर्थिक बाबतीत विशेष जागरूक रहावे. नव्या कामांना अधिक वेळ द्यावा लागेल. मनात कोणताही तणाव ठेवू नका. वेळेत योग्य मार्ग निघत जाईल. शुभ ता. १, ५

### मीन:- अपेक्षित कामे होतील
मनात कृतज्ञता असेल, तर प्रत्येक दिवस सणासारखा वाटतो. राशी स्वामी गुरुशी चंद्राचा होणारा लाभ व केंद्रयोग शुभ फलदायी ठरेल. अनुभवातून योग्य ते मार्गक्रमण करीत रहाल. नव्या योजना साकार करता येतील. अपेक्षित कामे होतील. हौस व मौज मजेसाठी वाटेल तसा खर्च करणे टाळावे लागेल. शुभ ता. १, ३, ७

!! शुभ भवतु !!

# दि केरला सुसाईड



समाजभान

योगिता सर्वज्ञ- कुलकर्णी

ती बाई काळ म्हणूनच आली, त्या माणसाच्या आयुष्यात. कधी कोणाच आयुष्य कोणाकडून संपेल काही सांगता येत नाही. नुकतीच केरळमधे घडलेली ताजी घटना. सोशल मीडियावर खूप व्हायरल झाली, झाली म्हणजे तिने व्हायरल केली. स्वतः चीच इज्जत स्वतः च सार्वजनिक करणे यांच्यासारखा मूर्खपणा नाही. हा मूर्खपणा त्या बाईने केला. तो पुरुष आणि ती बाई त्या बसमध्ये कशाप्रकारे उभे होते ते व्यवस्थित कळत होत. पण त्याला अश्यापद्धतीने तो व्हिडिओ एडिट केला की, त्या साळसूद माणसाच्या जिव्हारी लागला आणि तो माणूस हकनाक आत्महत्येचा बळी ठरला.

मन अतिशय सुन्न झालं हे बघून. खूप आपल्यासारखाच सर्वसामान्य घरातला असावा तो गृहस्थ. साध्या सार्वजनिक वाहतूकमधून गर्दीत प्रवास करत होता.पण या त्याचा सर्वनाश करण्यासाठी त्याचा काळ बनून आलेली ती बाई तिने त्याचा तिला धक्का लागतो आहे असा व्हिडिओ करून सोशल मीडियावर पोस्ट केला. काही वेळातच तो सगळीकडे व्हायरल झाला. त्याच्यापर्यंत हे सगळ पोहचलं, तेव्हा त्याला ही बदनामी सहनच झाली नसावी बहुतेक आणि त्यातूनच त्याने हे टोकाचे पाऊल उचलले, आत्महत्या केली बिचार्याने. किती खेळाव एखाद्याच्या आयुष्याशी इतक्या घाणेरड्या पातळीवर? का तर तुम्हाला काही व्हिव्ज आणि लाइक्स मिळवण्यासाठी? ह्या अश्या स्त्रियांमुळे संपूर्ण स्त्री जात बदनाम होते आहे. कोणाच्या आयुष्याच त्यांना काही पडली नाहीये. यासगळ्याचा त्या गृहस्थावर त्याच्या कुटुंबावर काय परिणाम होणार आहे याची साधी जाणीव, फिकीर नाही यांना. त्याचे वयोवृद्ध आईवडील अचानक आलेल्या या प्रसंगात आक्रोश करून रडत होते, काय झाल असेल त्याचं? त्याची बायको, मुलं ते काय परिस्थितीस तोंड देत असतील हे सगळ विचार करून वाटत एकाच्या चुकीची शिक्षा कोणी भोगली. त्या बाईला अटक झाली. जी काय शिक्षा व्हायची ती होईल पण तो गृहस्थ आणि त्याच कुटुंब यांचं कधीही न भरून येणार मोठ नुकसान झालं आहे. फक्त एका बाईमुळे आणि तिने केलेले चुकीचे आरोप. अशाप्रसंगावेळी खूप वाटत मात्र की स्त्रियांना शिक्षणाने खूप प्रगत केलं स्वातंत्र्य मिळालं पण याचा उपयोग जर प्रगती न करता ते जर अधोगतीला नेत असेल आणि या मिळालेल्या स्वातंत्र्याचा उपयोग आपण स्वतः ला विकसित करायचं की स्वतः ला अधोगतीकडे न्यायचं हे आता तपासून बघायची वेळ आलेली आहे असं मनापासून वाटत.

पान ३ वरून

## EU FT करार एक नवा अध्याय - २

युरोपीय यूरोच्या माध्यमातून डॉलरच्या साम्राज्यालासुद्धा अजून मोठे धक्के सुद्धा यातून देता येतील. EU bhairerron उर्सुला यांनी १९ ला दावोस ला केलेल्या भाषणातून, युरोपला अमेरिकन जोखडातून मुक्त व्हायचं आहे, हा स्पष्ट संदेश आणि संकेत मिळतो. त्यासाठी भारत हा आशेचा खूप मोठा किरण आहे. मोदी या संधीचं सोनं करतील हे नक्की.

दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

# संतोषगड-महिमानगड



महाराष्ट्रातील सातारा परिसरात सह्याद्रीचे वनसौंदर्य अप्रतिम आहे. कोयनेच्या जलाशयातील अफाट पाणी, घाटमाथ्यावरील तुफान पाऊस, वन्यजीवनाने समृद्ध घनदाट जंगल यामुळे हा परिसर दुर्गम झाला आहे. प्रसिद्ध पर्यटनस्थळ महाबळेश्वर, विविध रंगांनी नटलेले कांस पठार तसेच गडकिल्ल्यांनी सजलेला हा परिसर पर्यटनदृष्ट्या लोकप्रिय आहे. येथे उसाची शेती असल्याने हा परिसर सधन असून रस्ते, वीज, दूरध्वनी या सुविधा येथील ग्रामीण परिसरातही पोहोचल्या आहेत. या परिसरात सह्याद्रीची मुख्य डोंगररांग प्रतापगडापासून शंभूमहादेव डोंगररांग, बामणोली रांग आणि म्हसोबा रांग अशा तीन भागांत विभागली गेली आहे.

म्हसोबा डोंगररांगेवरील वर्धनगड, वारुगड, संतोषगड आणि महिमानगड ही दुर्ग चौकडी प्रसिद्ध आहे. संतोषगड संतोषगड म्हसोबा डोंगररांगेत वसलेला, माण तालुक्यातील प्रसिद्ध किल्ला असून त्याला ताथवड्याचा किल्ला असेही म्हणतात.

संतोषगडाची उंची साधारण ३००० फूट आहे, किल्ल्यावर जाण्यास सातारा आणि फलटण येथूनही रस्ता आहे. ताथवडे हे किल्ल्याच्या पायथ्याचे गाव आहे, फलटण ते ताथवडे हे साधारण १९ ते २० किलोमीटर अंतर आहे. साताऱ्यावरून पुसेगाव वाटेने देखील ताथवडे गावाला पोहोचता येते. ताथवडे गावात श्री बाळसिद्धनाथांचे मंदिर आहे, १७६२ मधे मंदिराचा जीर्णोद्धार झाला असून मंदिर परिसर प्रशस्त आहे. श्री बाळसिद्धनाथ म्हणजे महादेव, अष्टभैरवापैकी एक. त्यांची मूर्ती शैवपंथीयांच्या संकेतानुसार केली आहे. दरवर्षी येथे चैत्र वद्य अष्टमीला यात्रा असते. दर्शन झाल्यावर किल्ल्याकडे निघावे. या वाटेवर एका मठात वाल्मीकि ऋषींची मूर्ती आहे. मठाच्या बाजूला एक गुहा असून त्यात थंडगार पाण्याचा साठा आहे. संतोषगड तीन टप्प्यांत विभागला गेला आहे. प्रथम किल्ल्याची संरक्षक तटबंदी, त्यानंतर माची आणि शेवटी बालेकिल्ला आहे. मठाच्या बाजूने तटबंदीला चिकटून एक वाट पुढे जाते, वाटेत एक छोटे मंदिर आहे. किल्ल्याचा पहिला दरवाजा आता फक्त अवशेषरूपात उरला आहे. दरवाजात पहारेकऱ्यांच्या देवड्या आहेत. किल्ल्याची संरक्षक तटबंदी आणि बुरुज आजही किल्ल्याची मजबुती दर्शवीत बुलंद उभे आहेत. दरवाजातून आत गेल्यावर समोर हनुमान टाके आहे. टाक्याच्या मागील बाजूस वाड्याचे अवशेष दिसतात.

किल्ल्यावर धान्याचा मुबलक साठा करता यावा म्हणून मोठाली धान्य कोठारे बांधत. येथेही धान्यकोठारांचे अवशेष आहेत. किल्ल्यावर कातळकोरीव पायऱ्या केलेले विहीरसदृश पाण्याचे मोठे टाके आहे. पायऱ्या उतरून आत गेल्यावर तेथे महादेवाचे मंदिर आहे. संपूर्ण किल्ला फिरण्यास साधारण दोन अडीच तास पुरेसे आहेत. किल्ल्याच्या पश्चिम बाजूस मोळघाट आहे. दक्षिण-पूर्व पसरलेल्या या डोंगररांगेवर सीताबाईच्या डोंगर आणि वारुगड आहे. विजापुरवरून येणाऱ्या स्वाऱ्यांना पायबंद बसविण्यासाठी, स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी संतोषगड आणि वारुगड या दोन किल्ल्यांची योजना केली. या दोन्ही किल्ल्यांवरून आजूबाजूच्या प्रदेशावर लक्ष ठेवणे सोपे होते. संतोषगडावरून खाली येताना वाटेतील तातोबा महादेवाच्या मंदिरात दर्शनास नक्की जावे. या मंदिराची एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. तातोबा नावाचे साधू या डोंगरावर राहत होते. त्यांच्या दर्शनास रोज भक्तांची खूप गर्दी होत असे. त्यामुळे त्यांना ध्यानसाधना करण्यास वेळ मिळत नव्हता. त्यांनी यावर उपाय म्हणून डोंगरावर एक विहीर बांधली आणि त्यात ते निर्विघ्न साधना करता यावी म्हणून वास्तव्यास गेले. अचानक साधुबाबा कुठे गेले हे भक्तांना समजलेच नाही. एके दिवशी एक गुराखी डोंगरावर आला. त्याला खूप तहान लागली होती, परंतु पाणी कुठे मिळेना. त्याच्यासमोर अचानक एक साधुबाबा प्रकट झाले. त्याला आपल्या कमंडलूमधील पाणी पिण्यास देऊन अंतर्धान पावले. गुराख्याला आश्चर्य वाटले. त्याने साधुबाबांना शोधणे प्रारंभ केले. खूप शोधल्यावर त्याला गडावर एक पायऱ्यांची विहीर दिसली. त्याने आत उतरून पाहिले तर त्याला विहिरीत एक शिवमंदिर दिसले. मंदिरात साधुबाबा ध्यानस्थ बसले होते. त्याने हे भक्तांना सांगितले. सत्य समजल्यावर भक्तांनी एक मंदिर गडावर बांधले आणि साधुबाबांचे नाव पायथ्याच्या गावाला दिले. महिमानगड महिमानगड हा देखील सातारा जिल्ह्यातील एक महत्त्वाचा गिरीदुर्ग आहे. महिमानगडाची उंची साधारण ३२०० फूट आहे. या परिसरातील किल्ले सह्याद्रीच्या मुख्य डोंगररांगेपासून विलग झालेल्या डोंगरांवर वसलेले आहेत. महिमानगड गाव हे पंढरपूर रस्त्यावर आहे. गावाच्या मागे अशाच एका विलग झालेल्या डोंगरावर महिमानगड आपल्या ताशीव कातळकड्यांमुळे लक्ष वेधून घेतो.

सातारा- पंढरपूर रस्त्यावर पुसेगावच्या पुढे साधारण दहा किलोमीटर अंतरावर महिमानगड फाटा लागतो. तेथून जवळच असलेले महिमानगड गाव गाठावे. तेथून गडाच्या दिशेने चालत गेल्यावर गडाचे पहिले प्रवेशद्वार दिसते. या रस्त्याने गडावर जाताना शेवटच्या टप्प्यात दगडात कोरलेल्या पायऱ्या लागतात. दहीवडी मार्गाने गडावर जाताना शिंदी बद्रुक गावात पोहोचावे. गावातून एक पायवाट गडाला वळसा घालून तटबंदी खालून महिमानगड गावातून येणाऱ्या वाटेला जाऊन मिळते. महिमानगड गावाच्या जिल्हा परिषद कार्यालयासमोरील वाडीत असलेल्या मंदिराच्या जवळून एक पायवाट किल्ल्यावर जाते. मंदिराच्या शेजारी जुन्या वाड्याचे अवशेष दिसतात. या वळणा वळणाच्या वाटेने गड चढायला सुरुवात केल्यावर दोन भक्कम बुरुज दृष्टीस पडतात. या वाटेने गडावर जाताना डावीकडे तटबंदीच्या खाली कपारीत तीन पाण्याची टाकी कोरलेली आहेत. दोन टाकी झाडी आणि गाळ यामुळे उपयोगी नाहीत. मात्र तिसऱ्या टाक्यात स्वच्छ पाण्याचा झरा आहे. टाकी पाहून झाल्यावर गडाच्या शेवटच्या टप्प्यात दगडात खोदलेल्या पायऱ्यांनी चढून वर जावे. येथील तटबंदीला एक झाड आडवे पसरलेले आहे. येथून गडाच्या उत्तरेकडून येणारा वळणदार मार्ग दिसतो. आपल्याला प्रवेशद्वाराच्या बाहेरील बुरुजांचे प्रथम दर्शन होते आणि त्यानंतर समोर गेल्यावर प्रवेशद्वार दिसते. दरवाजाच्या समोर वळणदार भिंत आणि पुढे बुरुज बांधून त्याच्या मध्ये बांधलेले भक्कम प्रवेशद्वार, अशी गोमुखी पद्धतीची बांधणी शिवकालीन बांधकामाचे वैशिष्ट्य आहे. गडाच्या पहिल्या पूर्वाभिमुख गोमुखी प्रवेशद्वारातून गडप्रवेश झाल्यावर समोरच हनुमान मंदिर आहे. प्रवेशद्वार आता सुस्थितीत नाही. प्रवेशद्वाराची कमान ढासळली आहे. मात्र कमानीच्या बाजूचे खांब अजून तग धरून आहेत. प्रवेशद्वाराच्या सुबक घडीव खांबाच्या खालच्या चौकटीतील हत्तीचे शिल्प लक्षवेधी आहे. प्रवेशद्वाराच्या आसपासच्या तटबंदीने अजून तग धरला आहे. मंदिराच्या समोरील बुरुजावर जाण्यासाठी पायऱ्या केल्या आहेत. बुरुजावर चढलात तर संपूर्ण गडाची तटबंदी दृष्टीस पडते. थोडे पुढे गेल्यावर गडावरील दोन तलाव आहेत. तलाव खोल असल्याने तलावाला बारा महिने पाणी असते. तलावाच्या बाजूला वाड्याचे भग्नावशेष आढळतात. येथून पुढे जाणारी वाट गडाच्या ईशान्य दिशेस असणाऱ्या सोंडेकडे जाते. या सोंडेवर तटबंदी आहे. त्यात एक चोर दरवाजा आहे. चोर दरवाजाच्या पलीकडे गेल्यावर आपल्याला लांबवर पसरलेली सोंड दिसते. संपूर्ण गड फिरून परत आल्यावर दरवाजाच्या बाजूला असलेल्या तटबंदीवर निवांत उभे राहून गडावरील अवखळ वारा अनुभवावा. आदिलशाहीच्या काळात विजापूर राजधानी होती. तेथून कोकणातील बंदरात जाणारा व्यापारी मार्ग विजापूर, पंढरपूर, सातारा, वाई, महाड असा जात असे. या व्यापारी मार्गाचे रक्षण करण्यासाठी येथील किल्ले महत्त्वाचे होते. शिवरायांनी किल्ल्याच्या रक्षणासाठी महार रामोशी आणि अधिकचे सत्तर पंचाहत्तर सैनिक नेमले. शिवकालीन वैभवाचे साक्षीदार असलेले संतोषगड आणि महिमानगड हे दोन्ही किल्ले आणि आसपासचा परिसर पाहण्यास दोन दिवस पुरेसे आहेत. सह्याद्रीतील किल्ल्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची चरणधूळ आपल्या मस्तकी धारण केली आहे म्हणून ही दुर्गभटकंती निश्चितच प्रेरणादायी आहे.

पान २ वरून

## आयसीयूच्या बाहेरचा बेंच

विसाव्या दिवशी तिच्या पतीला दवाखान्यातून सुटी मिळाली. त्याला घरी नेण्यासाठी तिचा दीर खास गाडी घेऊन आला. काही मित्र मंडळी आले. सर्वांनी तिच्या पतीचे एक फायटर म्हणून कौतुक केले. मृत्यूच्या दाढेतून परत आला होता. सासूबाईंचेही मित्र मंडळींनी कौतुक केले, घरचे सगळे त्यांनी सांभाळल्यामुळे वहिनींना इकडे पूर्ण लक्ष देता आले वगैरे. दिराने तिच्या पतीला हाताला धरून लिफ्टमधून नेतो असे सांगितले. हिने मात्र सर्वांना पुढे जायला सांगितले व मी येतेच मागून असे म्हणून ती मागे थांबली. सारे काही शांत झाल्यागत परत एकदा त्या आयसीयू समोरच्या बेंचवर विसावली. डोके मागे टेकले. गेल्या वीस दिवसाचा त्या बेंचचा सहवास व तो प्रवास तिला आठवून गेला. अचानक आवाज आला. घे पोरी चहा घे! यावेळी तिने आजोबांचा आवाज ओळखला. गेले वीस दिवस रोजच सकाळी ते तिला हातात चहाचा कप आणून देत असत. खूप केलेस पोरी. तू जे केलंस त्याला तोड नाही. परंतु हा आयसीयूसमोरचा बेंच तसा दुर्दैवीच असतो. पेशंट बरा झाला तर त्याला फायटर म्हणून गौरविले जाते, घरी राहणाऱ्यांचे घर चांगले सांभाळले म्हणून कौतुक करण्यात येतं, परंतु या बेंचवर बसणाऱ्याकडे मात्र सारेच दुर्लक्ष करतात. काहीच न बोलता तिने आजोबांना नमस्कार केला नि एकदाच केवळ, काही क्षण त्या गेल्या वीस दिवसांतील तिचा सोबती असलेल्या त्या बेंचकडे बघितले नि डोळ्यातील आसवे पुसत व हातात उरलेली औषधे परत करण्यासाठी ती परत चार जिने उतरू लागली.

पान ४ वरून

## उपाय ‘डीपफेक’च्या काळातील आत्मरक्षणाचे...

**सकारात्मक बाजू -** तंत्रज्ञानाचा विधायक वापर

**जयंतराव :** आदित्य, या तंत्रज्ञानाचे काही चांगले उपयोग आहेत की, हे फक्त त्रास देण्यासाठी बनवलंय?

**आदित्य:** नाही आजोबा, प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. ‘डीपफेक’च्या मुळाशी असलेलं तंत्रज्ञान चांगल्या कामांसाठी वापरलं जातं.

**मनोरंजन :** ऐतिहासिक व्यक्तींना पडद्यावर जिवंत करण्यासाठी किंवा कलाकार आजारी असताना त्याचं काम पूर्ण करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर होतो.

**शिक्षण :** महान शास्त्रज्ञ किंवा ऐतिहासिक व्यक्ती प्रत्यक्ष आपल्याला धडा शिकवत आहेत, असा अनुभवही याच तंत्रज्ञानाच्या साहाय्याने घेता येईल.

**आरोग्य :** ज्यांचे आवाज अपघातामुळे किंवा आजारामुळे गेले आहेत, त्यांना त्यांचा आवाज परत मिळवून देण्यासाठी ‘व्हॉईस लोनिंग’ वरदान ठरत आहे.

**निष्कर्ष :** पाहावे डोळ्यांनी, तपासावे बुद्धीने! चर्चेच्या शेवटी जयंतरावांचा चेहरा आता गंभीर; पण माहितीपूर्ण झाला होता. त्यांना जाणवलं की, भविष्यात केवळ साक्षर असणं पुरेसं नाही, तर ‘डिजिटल साक्षर’ असणं ही काळाची गरज आहे.

**जयंतराव :** म्हणजे आदित्य, आता डोळ्यांवर आणि कानांवर विश्वास ठेवण्यापूर्वी बुद्धीची चाळणी लावणं गरजेचं झालं आहे. माहितीच्या या महापुरात आपण फक्त वाचक न राहता ‘तपासनीस’ बनलं पाहिजे.

**आदित्य :** अगदीच बरोबर आजोबा! सायबर सुरक्षेची गुरुकिल्ली म्हणजेच सतर्कता. आपण फक्त अखंड सावध राहायचं आहे. आजोबा, पुढच्या वेळी आपण एका सकारात्मक आणि अभिमानास्पद विषयावर बोलूया.

**‘एआय’ आणि भारतीय भाषा :** ‘भाषिणी’ प्रकल्प ग्रामीण भारताचे नशीब कसे बदलणार आणि मराठी भाषेला ‘एआय’च्या युगात नवीन उंची कशी मिळणार आहे, यावर आपण चर्चा करू.

पान ५ वरून

## मृत्युंजयाय रुद्राय नीलकंठाय शंभवे...

डाव्या कानात पुरुष कर्णभूषण आणि उजव्या कानात स्त्री कर्णभूषण असते. गळ्यात हार आणि यज्ञोपवीत, कमरेला मेखला, बोटात अंगठ्या! कमरेचे वस्त्र फडफडते आहे.

पहिल्या उजव्या हातात डमरू आणि दुसरा उजवा हात अभयमुद्रेत. पहिल्या डाव्या हातात अग्निपात्र आणि दुसरा डावा हात संकेतमुद्रेत. उजव्या पायाखाली अपस्मार! हा अपस्मार पद्मपीठावर असतो त्याच्या हाती कृष्णसर्प आहे. या वैश्विक नृत्याची प्रेक्षक आहे पार्वती. नटेश्वराची ही मूर्ती प्रत्येक कलासाधकाच्या मनातील चिदंबरम क्षेत्रात नृत्यमग्न असते. नटराज शंकराच्या नृत्यरूपाचे असे वर्णन नाट्यशास्त्रापासून संस्कृत साहित्यात अनेक ठिकाणी आलेले आहे. असे हे शिवतत्त्व संपूर्ण जगात अनेक स्वरूपात विखुरलेले आहे. तो चिदानंद स्वरूप शिव म्हणजे हिंदू तत्त्वज्ञानाचा, कलाविश्वाचा आणि मूलतः जगण्याचा आधार आहे. आपल्यातील शिवतत्त्व फक्त ओळखायला हवे. मग आपलेही जीवन ‘चिदानंदरूपम शिवोऽहं शिवोऽहं’ असेच होईल.

# ‘कैसा हराया’ ते ‘कैसी माफी मांगी’; पण हा शेवट नाही...!



पडसाद

योगिता साळवी

**शां**अल्लहमदुल्लीलाह येणाऱ्या पाच वर्षांत पूर्ण मुंब्रा हिरवा करून दाखवू, असे म्हणणाऱ्या, ‘एमआयएम’ नगरसेविका सहर युनूस शेखने शेवटी माफी मागितली आहे. तिचे म्हणणे तिला कुणाच्याही भावना दुखवायच्या नव्हत्या. ती असेही म्हणाली की, मुंब्रा हिरव्या रंगाने रंगवणे म्हणजे ती तिच्या झेंड्याचा रंग म्हणाली. जर तिचा झेंडा भगव्या रंगाचा असता, तरी ती म्हणाली असती की, मुंब्रा भगवा करून दाखवू. सहरच्या विधानावरून गेले काही दिवस गदारोळ उठला आहे; पण सहर जे म्हणाली यात नवीन काय आहे? तिच्या विधानाचा अर्थ तर फक्त ‘गजवा-ए-मुंब्रा’ व्हावा, असाच काढला जातो. सत्य तर हे आहे की, इथे गल्लीत पंक्चर काढणाऱ्या छोटछोट्या बालकांनाही हे स्वप्न पडते आहे. इस्लाम वाढवण्यासाठी साम, दाम, दंड, भेद काय वाट्टेल तो मार्ग अवलंबायचा, हेच सर्वांचे काम आहे, अशी मानसिकता असणारेही आहेतच. सहर त्यापासून वेगळी कशी असेल?

एक मुस्लीम म्हणून तिला जे संस्कार दिले गेलेत, ती त्याला जागणारच. तिच्या मानसिकतेचा विचार केला तर एक ठाम दिसते की, एक कट्टर मुस्लीम म्हणून तिची जडणघडण करण्यात तिचे माता-पिता, तिचा समाज यशस्वी झाला. नव्हे...नव्हे, जगभरातले मुस्लीम पालक यामध्ये यशस्वीच असतात. का? याचा विचार गांभीर्याने होणे आवश्यक आहे. तर सहरच्या भाषणातून तिला मिळालेले संस्कार अगदी भरभरून वाहत होते. ‘कैसा हराया’ म्हणत असतानाचा तिचा आनंद तर केवळ अवर्णनीयच. पण, सहर हे जे म्हणाली, ते काय केवळ सहरचे एकटीचे म्हणणे असेल का? तिच्या माफीने काय साध्य होणार? कारण ‘एमआयएम’ पक्षाच्या इम्तियाज जलीलने म्हटले आहे की, फक्त मुंब्राच नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रात हिरवा रंग पसरवणार आहे. या सहर प्रकरणावरून एवढेच वाटते की, आता निवडणुकीमध्ये हजारो हिंदू नगरसेवकपदी निवडून आले आहेत. जिंकल्यावर त्यांची प्रतिक्रिया काय होती? त्यांच्यापैकी एकानेही म्हटलेले आढळले का की, ‘येत्या पाच वर्षांत हा अमुक-अमुक भाग मी भगवा करेन.’ आता यावर काही लोक म्हणतील, हिंदू सहिष्णू आहेत, ते धर्मांध नाहीत. इथपर्यंत ठीकच आहे की, हिंदू सहिष्णू आहेत वगैरे. पण, पैजेवार आपण म्हणू शकतो, यातील आपलेच असे हजारो नगरसेवक असतील, जे सत्तेत आल्या-आल्या गणित मांडतील की, आपल्याला मुस्लिमांची मते मिळाली नाहीत. पाच वर्षांत ते कसे आपल्याकडे येतील, याचे प्रयत्न करायचे. त्यासाठी हिंदूंकडे दुर्लक्ष झाले तरी चालेल, हिंदूंचे काय ते तर आपलेच आहेत, असे मानणारे बहुसंख्य हिंदू नगरसेवक आहेतच.

हिंदू- मुस्लीम भेद करायचा नाही; पण सहर ही पहिल्यांदा नगरसेविका झालेली मुस्लीम तरुणी आहे. तिला मुंब्रा हिरवा करणार हे बोलण्याचे धाडस आणि कळकळ आहे. (या विधानामुळे भाजप नेता किरीट सोमय्या यांनी तिच्याबद्दल तक्रार केली होती). पण, या पार्श्वभूमीवर वर्षानुवर्षे नगरसेविका असणार्या किंवा त्यांचे पती किंवा वडील, भाऊ पक्षात नेते आहेत, अशा किती हिंदू नगरसेविका बेधडकपणे म्हणू शकतात की, मी माझ्या वॉर्डात ‘लव्ह जिहाद’, ‘लॅण्ड जिहाद’, ‘ड्रग्ज जिहाद’ आणि त्याद्वारे होणारा ‘व्होट जिहाद’ निर्माण होऊनच देणार नाही!

**‘कैसा हराया’ म्हणणाऱ्या सहर किंवा तिच्या पित्याला युनूस शेखला सत्तेची स्वप्ने दाखवणारे जन्माने हिंदू; पण कर्माने गैरहिंदू वाटणारा जितेंद्र आव्हाडच होते. युनूसच्या म्हणण्याप्रमाणे ’जेजे’ म्हणजे ‘झुटा जितेंद्र’ युनूसचा जिगरीदोस्त होता. ‘तुतारी’ला ‘मुतारी’ वगैरे वगैरे बोलत युनूस शेखने, त्याच्या मुलीला जिंकवले. (आव्हाड किंवा तुतारी नेत्यांबद्दल अजिबात सहानुभूती नाही) पुढे, सहरच्या वादग्रस्त विधानामुळे गदारोळ उठला. आता तिच्या नेत्याने इम्तियाज जलीलने म्हटले आहे की, मुंब्राच नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रातच हिरवा रंग पसरवणार. सहरने माफी मागून सगळे संपले का? याचा घेतलेला मागोवा...**

अर्थात, अशी तळमळ असणार्या खूपच कमी असतील. सहर ज्या मुंब्र्याबद्दल बोलली, त्या मुंब्र्याचे वास्तव जगजाहीर आहे. लोकशाही शरियाविरोधात आहे. ‘गजवा-ए-हिंद’ झालेच पाहिजे, असे म्हणत, मुस्लीम तरुणांना फितवणाऱ्या पुण्याच्या सॉफ्टवेअर इंजिनिअर जुबैर हंगरगेकर याला ‘एटीएस’ने काही महिन्यांपूर्वी पकडले. त्याच्या चौकशीत तो म्हणाला की, त्याची बैठक मुंब्र्याच्या इम्रान आबिदीच्या घरी झाली होती.

इम्रान हा मुंब्र्याला राहायचा आणि कुर्ल्याला एका मशिदीमध्ये मुलांना शिकवायला जायचा. पुढे इम्रानलाही पोलिसांनी पकडले. तसे पाहायला गेले, तर मुंब्रा-कौसा परिसरातून गेल्या अनेक वर्षांत ‘सिमी’, ‘लष्करए तोयबा‘, ‘हिझबुल मुझाहिद्दीन’, ‘इसिस’ अशा विविध अतिरेकी संघटनांचे हस्तक ‘एनआयए’, ‘एटीएस’ गुन्हे शाखेने गजाआड केले आहेत. दहशतवादी कारवाईमध्ये सहभागी असलेल्या लोकांचा उद्देश होता, तो म्हणजे ‘भारत देश हिंदू काफिरांचा आहे, म्हणजे गैरमुस्लिमांचा आहे. इथे शरियाचे राज्य आले पाहिजे. देशविघातक कृत्य कशासाठी तर भारतात गैरमुस्लीम हिंदू बहुसंख्य आहेत म्हणून. त्याच मुंब्र्यामध्ये ‘एमआयएम’ला बहुमत मिळणे, हा योगायोग आहे असे म्हणावे का? तसेही, देशभराचा मागोवा घेतल्यास ‘लव्ह जिहाद’, ‘लॅण्ड जिहाद’ आणि ‘ड्रग्ज जिहाद’च्या माध्यमातून, हिंदू लोकवस्तीला चिरडून तिथे कौमवाल्यांना वसवायचे, हे अनेक वर्षांपासून चालले आहे. उत्तर प्रदेशच्या बलरामपूरचा छांगूरबाबा हे याचे उत्तम उदाहरण. गेल्या लोकसभेच्या निवडणुकीपासून ‘व्होट जिहाद’ही सुरू झाला. दक्षिण मुंबई आणि उत्तर- पूर्व मुंबईत मुस्लिमबहुल भागातून, भाजप-महायुतीविरोधात एकगठ्ठा मतदान झाल्याचे उघडकीस आले. आता नगरसेवक निवडणुकीमध्येही तोच पॅटर्न आहे. त्यामुळेच सहरच काय, मुंबईत ‘एमआयएम’च्या ज्या आठ जागा निवडून येण्यामागे हेच कारण आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून मुस्लीम राजकीयदृष्ट्या जागृतच आहेत. स्वतंत्र भारतात हिंदू बहुसंख्य होते. एकत्र राहिलो तर पंतप्रधान आणि इतर सत्तेची पदे हिंदूंनाच भूषवता येतील, असे तत्कालीन मुस्लिमांना वाटले. त्यामुळेच पाकिस्तानची मागणी झाली हे सत्य आहे; पण पाकिस्तान निर्माण झाला, आता भारतात गुण्यागोविंदाने मिळून- मिसळून राहू, असे इथल्या सगळ्याच लोकांना वाटते का? आम्ही जिथे राहतो, तिथेही वरचढच राहणार आणि सगळ्या परिसरावर कब्जा करणार, असे मत त्यांचे नसते का? त्यामुळे सहरने माफी मागितली आहे पण, तिला जे सांगायचे होते, ते तिचे व्यवस्थित सांगून झाले. ती ज्या पक्षाची नगरसेवक आहे, तो तोच पक्ष आहे; ज्या पक्षाने म्यानमार देशाच्या रोहिंग्यांसाठी मुंबईत शहीदस्तंभाला लाथा मारल्या होत्या, महिला पोलिसाचा विनयभंग केला होता, मुंबई वेठीस धरली होती. तो तोच पक्ष आहे, ज्यांच्या नेत्याने ओवेसीने म्हटले होते की, फक्त १५ मिनिटे पोलीस हटवा, मग आम्ही काय करतो ते बघा... आम्ही काहीही करू शकतो आणि हिंदू तर आमच्यासमोर अजिबात टिकूच शकत नाहीत, ही मानसिकता. या पार्श्वभूमीवर सहरला माफी मागावी लागली आहे. असो, जागतिक घडामोडी पाहिल्या, तर जगभरात यामुळेच ‘इस्लामफोबिया’ निर्माण झाला आहे. जगाचे सोडा, आपल्या मुंबईतही मालवणी, भायखळा, विक्रोळी, गोवंडी, मानखुर्द, जोगेश्वरी, वांद्रे वगैरे परिसरात अनेक वॉर्ड अचानक मुस्लिमबहुल झालेले दिसतात, याचे कारण काय आहे? काही भ्रष्ट प्रशासक आणि सर्वकाही डोळ्यादेखत घडत असतानाही दुर्लक्ष करणारे काही भ्रष्ट पोलीस, निवडणुकीत मतांसाठी कामाला येतील म्हणत, अवैधरित्या वसणाऱ्यांना मदत करणारे ते काही नेते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, बाजूला दहशतवादी जरी राहायला आला, तरी जोपर्यंत माझ्या घरात काही परिणाम होत नाही ना, मग मला काय करायचे? असे मानसिकता असलेले हिंदू. हेच याला जबाबदार आहेत. ‘कैसा हराया’ ते ‘कैसी माफी मांगी’ इथपर्यंतचा प्रवास हा हिंदू एकतेचा आहे पण, तरीही निवडणुकीच्या आयामात हा प्रवास उपयोगाचा आहे का? राजकीयदृष्ट्या सजग असणाऱ्या कौमपुढे, मीठ-पिठामध्ये एक- दोन रुपायांची वाढ झाली म्हणून मतदान न करणाऱ्या हिंदूंचे अस्तित्व भविष्यात काय असेल, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. मुंब्र्यांचा रंग तर केव्हाच बदलला आहे. १९८०च्या दशकापर्यंत आगरी-कोळ्यांचे गाव असलेले मुंब्रा. १९९१ मध्ये इथली लोकसंख्या ४४ हजार होती. १९९२ च्या दंगलीनंतर अनेक मुस्लीम, मुंबई सोडून मुंब्रा येथे स्थायिक झाले. मुस्लिमांच्या पुनर्वसनासाठी राज्य सरकारने ‘राज्य वक्फ बोर्डा’च्या ताब्यात, दहा चौरस मैल जमीन दिली. आज याच मुंब्र्यात आगरी-कोळी समाज नावाला आढळतो, तर मुस्लिमांची संख्या पाच लाख आहे. हा भारतातील सर्वात मोठा मुस्लीम परिसर आहे, जो भारतातील सर्वात मोठी मुस्लीम वस्ती म्हणून ओळखला जातो.

# मुलखावेगळी ‘जेन-झी’



**शेअर बाजाराला आग लागली असताना अन्य काही अर्थक्षेत्रांमध्ये मात्र बरकतीच्या बातम्या आहेत. अशीच एक महत्त्वाची बातमी म्हणजे देशातील किरकोळ बाजाराची उलाढाल १९० लाख कोटींवर जाण्याची शक्यता आहे. दुसरी लक्षवेधी बातमी म्हणजे जीएसटीमधून दररोज सरासरी पाच ते सहा लाख कोटी रुपयांची कमाई होत आहे तर तिसरी बातमी म्हणजे ग्रामीण भागाने देशाच्या जीडीपीची लाज राखली आहे.**

विशेष

मुकुल आव्हाड

**‘टो**निक वल्डवाईड’ या संस्थेच्या माध्यमातून, ‘इनसाईट २०२६’ हा रिपोर्ट नुकताच प्रकाशित करण्यात आला आहे. स्थळ- काळानुसार ग्राहकांच्या पसंतीमध्ये झालेले बदल आणि त्याचे सांस्कृतिक पैलू टिपणाऱ्या या अहवालातून, आपल्या समाजात होणाऱ्या बदलांची माहिती मिळते. सदर अहवालामध्ये मानवी बुद्धिमत्ता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या मिश्रणाचा वापर करून ग्राहकांची वर्तणूक, सवयी आणि दृष्टिकोनातील बदलांचे परीक्षण करण्यात आले. यातून समोर आलेल्या माहितीनुसार असे आढळले की, २०२५ साली अनेकांनी निरोगी जीवनशैलीची निवड करणाऱ्या गोष्टींना अधिक प्राधान्य दिले आहे.

उदाहरणार्थ, ‘ब्रेकफास्ट लब’सारख्या ठिकाणांचा शोध घेत लोकांना प्रत्यक्षात भेटणं, सामाजिक व्यवहारात भाग घेणं याला जास्त पसंती दिल्याचे दिसून येते. काही महिन्यांपूर्वी ऑस्ट्रेलियातील ‘फ्लिडंर्स विद्यापीठा’च्या संशोधनातून असे समोर आले होते की, मागच्या पिढीच्या तुलनेत ‘जेन-झी’ने मद्यपानाकडे पाठ वळवण्यास सुरुवात केली आहे. काहींच्या मते याचा अर्थ, ही पिढी निरोगी जीवनशैलीला प्राथमिकता देत आहेच; मात्र त्याचबरोबर, तणाव, अपयश, नैराश्य याचा सामना करण्यासाठी थेट दारूचा अवलंब न करता, डोळसपणे वेगवेगळ्या मार्गांचा विचार ते करत आहेत.

‘जेन-झी’कडे पालकत्वाची जबाबदारी येण्याचा हा काळ आहे. अशातच, या अहवालातून एक महत्त्वपूर्ण माहिती समोर आली आहे. भारतीय ‘जेन-झी’ पालकांपैकी ५२ टक्के पालक वेगवेगळ्या गोष्टींसाठी आता पारंपरिक सर्च इंजिनचा वापर न करता, ‘एआय’चा वापर करतात.

एखादा सल्ला हवा असेल किंवा कुठलाही महत्त्वाचा निर्णय घ्यायचा असेल, तर त्यासाठी या पालकांकडून ‘एआय’चा वापर केला जातो. गुगल, फेसबुक यांच्या आगमनानंतर भारतासहित अनेक आशियाई देशांमध्ये, आमूलाग्र परिवर्तन घडून आले. या विकसनशील देशांची विकसित होण्यासाठीची वाटचाल सोपी झाली. दुसऱ्या बाजूला लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर जगातील सर्वांत मोठी बाजारपेठ याच परिसरामध्ये अनेकांना उपलब्ध झाली. कृत्रिम बुद्धिमत्तेचे वर्चस्व असलेल्या आजच्या या जगामध्ये, अशा संशोधनाकडे व त्यातून निष्पन्न होणाऱ्या अहवालाकडे लक्षपूर्वक बघण्याची आवश्यकता आहे.

मागच्या काही काळापासून भारतासहित अनेक विकसनशील देशांमध्ये, उद्योजगतेचा विचार तरुण पिढी मोठ्या प्रमाणात करीत आहे. मात्र, त्याचबरोबर ‘डिलोईट’ने एका त्यांच्या अहवालामध्ये असे म्हटले आहे की, ५० टक्क्यांहून अधिक ‘जेन-झी’ शिक्षणाबरोबरच नोकरी करण्यासाठी तयार आहेत, किंबहुना त्यांच्या पहिल्या नोकरीमध्ये रुजू होताना, कामासाठी आवश्यक कौशल्य पूर्णपणे तयार व्हायच्या आतच त्यांनी कामात उडी घेतली आहे. अर्थात अद्यापही यावर संशोधन, मतमतांतरं सुरू आहेत. मागच्या वर्षी नेपाळमध्ये झालेल्या सत्तांतरापासून ते आता इराणमध्ये सुरू असलेल्या संघर्षापर्यंत, ‘जेन-झी’ ही अनेक ठिकाणी केंद्रबिंदू राहिली आहे. काहींच्या मते ही पिढी आळशी आणि बेजबाबदार आहे, तर काहींच्या मते समजूतदार. एखाद्या माणसाकडे बघण्याचा दृष्टिकोन ज्या प्रकारे वेगवेगळा असू शकतो, त्याचप्रकारे एखाद्या पिढीला समजून घेण्यासाठीसुद्धा विविध मार्गांनी प्रवास करावा लागेल. त्या पिढीशी समरस होऊन, त्यांना समजून घेऊनच पुढे जावे लागेल. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळात समजूतदारपणाचा हाच मानवी स्पर्श आपल्याला तारू शकेल, यामध्ये शंका नाही.



# गाझा शांती परिषद आणि...

वेधक

योगिता साळवी

**मी हुकूमशाह आहे. कधी- कधी जगाच्या चांगल्यासाठी हुकूमशाह बनणे गरजेचे आहे, असे नुकतेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले. ट्रम्प यांनी गाझामध्ये युद्धविरोधात शांती निर्माण व्हावी म्हणून गाझासाठी ‘शांती समिती’ स्थापित केली. जगाने साथ द्यावी म्हणून साम, दाम, दंड, भेद वापरले. ६० देशांना यासाठी निमंत्रित केले; पण तरीही युरोपमधील अग्रणी देश आणि चीनने या समितीकडे पाठ फिरवली; तर भारताने अभ्यास करून निर्णय घेणार, असा संदेश दिला.**

**शां**ती समिती’ला इस्रायलचे मतही अनुकूल नाहीच. इस्रायलचे म्हणणे आहे की, अशी समिती निर्माण करण्याआधी अमेरिकेने इस्रायलशी कोणतीही चर्चा केली नाही. तसेच, गाझाबाबतीतला प्रत्येक निर्णय हा इस्रायलला माहिती असणे आणि इस्रायलचा त्यामध्ये सहभाग असणे आवश्यक.

दुसरीकडे चीनने स्पष्ट केले की, आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्य करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ आहे. त्यामुळे ‘बोर्ड ऑफ पीस’ समिती जर संयुक्त राष्ट्रसंघाच्या अंतर्गत असेल, तर त्याचे समर्थन करणार. ‘संयुक्त राष्ट्र समिती’चे सामर्थ्य महत्त्वाचे. या अनुषंगाने पाहिले तर ट्रम्प यांनी संयुक्त राष्ट्रसंघाचे महत्त्व मागेच कमी करण्याचा प्रयत्न केला होता. दुसरीकडे ट्रम्प यांच्याकडून आमंत्रण मिळायची खोटी, पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी लगेच ‘शांती समिती’मध्ये सदस्य होण्यास मंजुरी दिली. यावरून पाकिस्तानमध्ये नेहमीप्रमाणे अभूतपूर्व गोंधळ, वाद, गदारोळ सुरू आहेच.

पाकिस्तानच्या विरोधी पक्षाने प्रश्न उपस्थित केले आहेत की, अमेरिकेच्या योजनेमध्ये सहभागी व्हायचेच होते, तर त्याआधी देशातल्या जबाबदार शासन प्रतिनिधींशी चर्चा करायची होती. कुणालाच विश्वासात न घेता, कुणालाही थांगपत्ता लागू न देता, पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी वैयक्तिकरित्या ट्रम्प यांना पाठिंबा का दिला? तसेच पाकिस्तानी कट्टरतावाद्यांचे म्हणणे आहे की, गाझाच्या इस्लामी जनतेचे रक्षण गाझाच्याच इस्लामी जनतेने केले पाहिजे. त्यांचे संरक्षण आणि विकास करण्यासाठी बाहेरचे देश का? या लोकांनी प्रश्न उपस्थित केला की, या समितीद्वारे पुन्हा गाझाच्या मुस्लिमांवर गुलामी लादली जाणार. ट्रम्प जे बोलतील, तेच इथे होणार. मग, गाझाचे लोक स्वतंत्र आहेत, असे कसे म्हणायचे? थोडक्यात, पाकिस्तानी पंतप्रधान, त्यांचे सरकार अमेरिकेचा शब्द झेलायला तयार असतात. अमेरिकेने ‘छू’ म्हटले की, त्यानुसार पाकिस्तान कृती करते. पाकिस्तानमध्ये मोठ्या प्रमाणात होणारा हा विरोध कुणाच्या सांगण्यावरून होत असेल? तर अर्थातच, पाकिस्तानमध्ये चीनने घट्ट पाय रोवले आहेत. चीनच जर या ‘शांती समिती’त नसेल, तर मग चीनच्या मांडलिक असलेल्या पाकिस्तानने कसे काय या समितीचे सदस्य व्हायचे, हा प्रश्न चीन समर्थक पाकिस्तान्यांना पडूच शकतो. कारण, आजवर भारताविरोधी कटकारस्थान करताना पाकिस्तानच्या भारतद्वेष्ट्यांनी चीनचे प्रभुत्व मान्य केले होते.

चीनला पाकिस्तानात नुसता आसराच नाही, तर वर्चस्व प्रस्थापित करण्याचा हक्क दिला होता. या परिक्षेपात चीनच्या विपरीत भूमिका पाकिस्तानने का घेतली? असा हा त्यांचा प्रश्न. याच पाकिस्तानमध्ये असाही कट्टरतावादी गट आहे, ज्यांना पाश्चात्त्य संस्कृती, लोक म्हणजे ‘अस्तगफिरूल्लाह’ वाटतात. ‘महजबी कौम’ला टिकवायचे, तर पाश्चात्त्य संस्कृतीची सावलीही नको, त्यांचा संबंधच नको, असे यांचे म्हणणे. ‘रिपब्लिकन ऑफ पाकिस्तान’ची मुस्लीम अवाम म्हणजे अर्थातच, जनता अमेरिकेच्या ट्रम्पना काफिरच मानत असणार.

ट्रम्प असेल मोठा; पण तो मुस्लीमआहे का? असेही त्यांना वाटूच शकते. त्यामुळेच की काय, पाकिस्तानमध्ये सध्या वादविवाद जोरात आहेत. अमेरिकेच्या ‘शांती समिती’मध्ये सामील झाले, तर चीन नाराज आणि समितीमध्ये सामील झाले नाही, तर अमेरिका नाराज, अशी पाकची स्थिती. निमंत्रित ६० देशांपैकी या ‘शांती समिती’मध्ये जगभरातून केवळ आठ देशच सहभागी झाले. तेही प्रामुख्याने तुर्कीये, इजिप्त, जॉर्डन, इंडोनेशिया, पाकिस्तान, सौदी अरब, संयुक्त अरब अमिराती हे मुस्लीम देश. त्यामुळे ‘गाझा शांती समिती’चे भवितव्य काय असेल? ट्रम्प यांनी स्वतःला हुकूमशाह मानले, तरीसुद्धा त्यांची हुकूमशाही जगभरातले देश मानणार नाहीत, हे सत्य!

परराष्ट्रकारण

सचिन करमरकर

# दोलायमान इराण




सप्टेंबर २०२२ मधील कोण्या एका दिवशी इराण देशाची राजधानी तेहरानमध्ये एका रस्त्यावरून जाणाऱ्या तरुण स्त्रीला पोलीस अटक करतात. कारण तिने तेथील इस्लामी कायद्यानुसार हिजाब घातलेला नसतो. तिने याचा विरोध करताच, तिला मारझोड करीत गाडीमधून नेले जाते. इराणमध्ये 'गस्त ए इर्शाद' नावाने ओळखले जाणारे पोलीसदल आहे. इराणमधील सर्वसामान्य जनता इस्लामिक कायद्यानुसार वागते की, नाही यावर लक्ष ठेवणे, हेच या पोलीसदलाचे काम. या दलाने अटक केलेल्या तरुणीचे नाव होते मेहसा यामिनी. या तरुणीचा पोलिसांच्या ताब्यात असतानाच मृत्यू झाला. कोणालाही प्रक्षुब्ध करणारीच ही घटना. तिच्या अंत्यविधीला प्रचंड जनसमुदाय जमला आणि त्या समुदायातूनच सरकारविरोधी नारेबाजीची उत्स्फूर्तपणे सुरुवात झाली. बघता- बघता ही घटना वाऱ्यासारखी सगळीकडे पसरली. मेहसा यामिनी अचानकपणे खाली कोसळल्याची घटना एका 'सीसीटीव्ही' कॅमेऱ्यामध्ये चित्रित झाली होती. ती चित्रफीत समाजमाध्यमातून सगळीकडे फिरवली जाऊ लागली.

मेहसा यामिनीला श्रद्धांजली वाहण्यासाठी अनेक ठिकाणी मोर्चे निघू लागले. स्त्रियांचाही या मोर्चातील सहभाग अगदी लक्षणीयच होता. आपली नाराजी व्यक्त करण्यासाठी अनेक स्त्रिया हिजाब त्यागून मोर्चामध्ये सामील झाल्या. हिजाब, बुरखा या वरवर दिसणाऱ्या/ इ गोष्टी असल्या, तरी इराणी स्त्रीचे आयुष्य शिक्षण, लग्न, मुलेबाळ, नोकरी, घरातले आणि समाजातील स्त्रीचे दुय्यम स्थान यामुळे प्रचंड ग्रासलेले आहे. मेहसा यामिनीच्या निमित्ताने स्त्रियांची ही घुसमट बाहेर पडू लागली. समाजमाध्यमांवर हिजाब फेकून देऊन केस मोकळे सोडलेली स्वतः ची छायाचित्रे, चित्रफिती स्त्रियांनी प्रसिद्ध केल्या. मोर्चामध्ये एखाद्या ठिकाणी शेकोटी पेटवलेली असे आणि एक-एक स्त्री नाचत- नाचत येऊन त्यामध्ये आपला हिजाब टाकून आनंदाने परत जात आहे, अशा गोष्टीही इराणमध्ये सर्रास दिसू लागल्या. जोखडातून मुक्तीचा आनंदच त्या जणू व्यक्त करीत होत्या. 'वुमेन, लाईफ, फ्रीडम' या घोषणांनी त्याकाळात इराण व्यापले. इराणमधील सरकार हे इस्लामिक कट्टरवादी विचारांचे असल्याने या सरकारला हा सर्व प्रकार निश्चितच खटकला. सरकारने हे आंदोलन दाबून टाकायचा प्रयत्न सुरू केला खरा; पण त्याचा परिणाम उलटाच झाला.

सरकारच्या दडपशाहीमुळे इराणमधील शाळा-महाविद्यालयांमधून बुरखाविरोधी आंदोलनांनी उचल घेतली. या आंदोलनांमध्ये तरुण पुरुष वर्गदेखील सहभागी झाल्याने सरकारी दडपशाहीविरोधात अनेक ठिकाणी आंदोलनाला हिंसक वळण लागले. मुल्ला-मौलवींविरुद्ध तरुणाईचा, स्त्रियांचा संताप वाढतच होता. मौलवी लोक रस्त्यावरून जात असताना त्यांची टोपी उडवून द्यायची आणि पळून जायचे, असे प्रकार तरुणवर्गाने इराणमध्ये दिवसाढवळ्या सुरू केले. 'डेथ टू द डिक्टेटर' (हुकूमशहाचा अंत) अशा घोषणांनी इराणमध्ये जोर धरला. इराणमधील नागरिकांचे आंदोलन आणि सरकारची दडपशाही यांच्या बातम्या आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचल्याने इराण सरकारवर जबर टीकादेखील होऊ लागली. पण, त्याकडे दुर्लक्ष करून इराणी राजवटीने प्रचंड प्रमाणात नागरिकांची धरपकड सुरू केली.

दरम्यान, एकतर्फी सुनावणी घेऊन काहीजणांना फासावर लटकवण्यात आले, तर अनेक इराणी नागरिक आजही तुरुंगात खितपत पडलेले आहेत. आंदोलन दडपण्यासाठी केलेल्या पोलिसी गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्यांची अथवा जबर जखमी झालेल्यांची संख्यादेखील लक्षणीय होती. बळाचा वापर करून सरकारने आंदोलन चिरडले खरे; पण त्यामुळे समाजातील अस्वस्थता मात्र कमी झाली नाही.

आता तीनच वर्षांनी या आंदोलनापेक्षाही अधिक तीव्र आंदोलन इराणमध्ये सुरू झाले आहे. दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी इराणमधील व्यापाऱ्यांनी सरकारविरोधी नव्या आंदोलनाची सुरुवात केली. तसे पाहता, हा व्यापारीवर्ग आजवर हुकूमशाही सत्तेच्या पाठीशी असलेला; पण गगनाला भिडणारी महागाई आणि इराणी चलनाचे अवमूल्यन यामुळे आज व्यापाऱ्यांपुढे मोठाच प्रश्न उभा राहिलेला आहे. आजमितीला इराणमधील महागाईचा दर सुमारे ४२ टक्के आहे. 'रियाल' या इराणी चलनाचे अवमूल्यन तर इतके झाले आहे की, एका अमेरिकन डॉलरसाठी साडेचौदा लाख इराणी रियाल मोजावे लागत आहेत. रोजच्या जगण्याच्या प्रश्न असल्याने यावेळी व्यापाऱ्यांच्या या आंदोलनाला सर्वसामान्य जनतेचीही साथ मिळत आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांनी सुरू केलेल्या या आंदोलनाचे लोण इराणच्या सर्वच्या सर्व ३१ प्रांतांत झपाट्याने पसरत गेले. एकेका शहरातील मोर्चामधून, लाखोंचा जनसागर उसळलेला दिसून येऊ लागला.

पुन्हा एकदा इराण आंतरराष्ट्रीय माध्यमांच्या प्रकाशझोतात आला होता. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी इराणी जनतेची कड घेत, त्यांच्या बाजूने वक्तव्ये करण्यास सुरुवात केली. इराण सरकारने हिंसक पद्धतीने आंदोलन संपवण्याचा प्रयत्न केल्यास, अमेरिका सैन्य कारवाई करेल, अशी धमकीदेखील ट्रम्प यांनी इराणला दिली. तोपर्यंत आंदोलनांनी हिंसक वळणे घ्यायला सुरुवात झाली होती. सरकारी मालमत्तांवरील हल्ले, गाड्या जाळणे अशा हिंसक आंदोलनांनी एव्हाना इराणमध्ये जोर धरला होता. काही ठिकाणी मशिदी जाळण्यात आल्याच्या बातम्यादेखील येऊ लागल्या.

सुरुवातीला सरकारने आंदोलकांवर कडक कारवाई करण्याचे टाळले असले, तरी आंदोलन जसजसे पुढे सरकत गेले, तसा सरकारचा धीर सुटू लागला. त्यातच ट्रम्प यांच्या धमक्यांनीही भर घातली असावी. अगोदरच्या अनुभवानुसार, सरकारकडून आंदोलन चिरडण्याचे पुन्हा प्रयत्न सुरू झाले. हे आंदोलन अमेरिका, इस्रायलसारख्या बाह्यशक्तींनी फूस लावल्यामुळे सुरू झाले असून, हे आंदोलन सरकार विरुद्धचा कट असल्याचा दावा करण्यासही इराण सरकारने सुरुवात केली. परंतु, यावेळी जनतेला ते पटण्यासारखे नव्हते. इराणी अध्यक्षांनी एकीकडे जनतेला होणाऱ्या त्रासाची सरकार दखल घेत आहे, सरकारला याबाबत सहानुभूती आहे, असा सूर लावला होता. तर दुसरीकडे सरकारमधील इतर उच्चपदस्थ अधिकारी आंदोलकांना धमकीवजा इशारे देत होते. एकीकडे परकीय आक्रमणाचा (विशेषतः अमेरिकेचा) धोका आणि दुसरीकडे हाताबाहेर चाललेले देशांतर्गत आंदोलन, अशा परिस्थितीत सरकारकडून इराणमधील वीज आणि इंटरनेट सेवा बंद करण्यात आली. सरकारने आंदोलन मोडून काढण्याची कारवाईदेखील सुरू केली. त्यातूनच पोलीस अधिकार्‍यांच्या मृत्यूच्या बातम्यांबरोबरच अनेक

**डिसेंबर २०२५ पासून इराणमधील शहरांमधून सरकारविरोधी सुरू झालेल्या आंदोलनांनी चांगलाच जोर पकडला असून, या आंदोलनांची सांगता कशी होईल, हे सांगणे कठीणच आहे. इराणचा आजवरचा इतिहास पाहता, राजकीय आणि सामाजिक स्थित्यंतरे घडवणारी अशी आंदोलने इराणी जनमानसाला नवीन नाहीत; पण इराणी जनतेला आजवर तरी त्यातून भविष्याचा निश्चित मार्ग सापडलेला नाही, असेच चित्र आहे. इस्लाम की, सामाजिक समानता; हुकूमशाही की, लोकशाही अशा अनेक द्वंद्वात अडकलेले इराणी समाजमन यास कदाचित कारणीभूत असावे. इराणमधील आंदोलने आणि जनमानसाची मानसिकता यांच्या आधारे इराणमधील सद्यस्थितीचा घेतलेला मागोवा...**

आंदोलकांच्या मृत्यूच्या, जखमी झाल्याच्या बातम्यादेखील येऊ लागल्या. इराणमध्ये सद्यस्थितीमध्ये मृत व्यक्तींचा आकडा दोन हजारांपासून १६ हजारांपर्यंत सांगितला जातो आहे. जखमींचा आकडा तर लाखोंच्या घरामध्ये असल्याचेही सांगितले जाते आहे. मात्र, यातील खरे- खोटे निश्चित कोणीच सांगू शकत नाही. कारण संपर्क करण्याची साधने सरकारने बंदच केली आहेत. एलॉन मस्क यांच्या 'स्टारलिंक' उपग्रह संपर्क यंत्रणेचा वापर जनतेने अनेक ठिकाणी केला; पण इराण सरकारने ही यंत्रणादेखील बंद पाडण्यात यश मिळवले. इतके सगळे होत असताना अनेक ठिकाणी सरकारच्या बाजूने लोक रस्त्यावर उतरलेलेही दिसू लागले. अर्थातच, हे मोर्चे सरकार पुरस्कृत होते की, लोकांनी स्वतःहून काढलेले होते, हे सांगणे कठीणच आहे.

सध्या एकीकडे इराण सरकारने लेबनॉन किंवा इराकमधून आंदोलकांना जीवे मारण्यासाठी दहशतवादी आणले असल्याचा प्रचार इराणमध्ये केला जातो आहे, तर दुसरीकडे अमेरिका आणि इस्रायल यांनी प्रशिक्षित केलेले समाजकंटक सरकारी मालमत्तेचे नुकसान करीत आहेत, आंदोलकांचा जीव घेत आहेत, असा आरोप इराण सरकार करत आहे. कुर्द आणि बलोच दहशतवाद्यांना हाताशी धरून इराणमध्ये शस्त्रास्त्रे पाठवण्यात आल्याची शक्यताही वर्तवली जात आहे.आंदोलन सुरू झाल्यानंतर चार-पाच दिवसांनीच इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खोमेनी हे रशियाला पळून गेल्याची अफवादेखील पसरवण्यात आली होती. खऱ्या-खोट्या घटनांची सरमिसळ करून बातम्या पेरणे, अफवा पसरवणे हे प्रकार दोन्ही बाजूंकडून आजही सर्रास सुरू आहेत. अमेरिका इराणवर लष्करी कारवाई करणार की, नाही याबाबतही सातत्याने उलटसुलट वक्तव्ये येत आहेत. किंबहुना, अमेरिकेने लष्करी कारवाई करण्याचा प्रयत्न केला आणि त्यात अमेरिकेची दोन 'एफ १६' जातीची विमाने इराणकडून पाडली गेल्यानंतर अचानक अमेरिकेकडून कारवाई थांबवली गेल्याच्याही चर्चा आहेत. सुरुवातीच्या काही दिवसांमधील आंदोलनाची धार मात्र आता हळूहळू कमी होत चालली आहे.

पोलीस, इराणी लष्कर, निमलष्करी दले यांनी अजूनतरी इराणी सरकारची साथ सोडलेली दिसत नाही. अर्थात, इराणची देशांतर्गत परिस्थिती आणि अमेरिकन लष्कराची तयारी याबाबत संबंधित राज्यकर्त्यांशिवाय इतर कोणालाच निश्चित माहिती नाही. इराणमधील आंदोलने केवळ बिकट आर्थिक परिस्थितीमुळे सुरू झाली आहेत की, कट्टरतावादी इस्लामी राजवटदेखील इराणी जनतेला नकोशी झाली आहे? अमेरिका, इस्रायल यांसारख्या बाह्यशक्तींनी इराणच्या अंतर्गत बाबतीत ढवळाढवळ केल्याचे इराणी जनतेला पसंत पडेल का? सत्तांतर झाल्यास इराणी जनता लोकशाहीकडे जाईल की, राजेशाही स्वीकारेल? इराण मुस्लीम राष्ट्र बनूनच राहील की, एक निधर्मी राष्ट्र होईल? असे अनेक प्रश्न इराणच्या या आंदोलनांमधून उपस्थित झाले आहेत. त्यांची उत्तरे इराणी जनता, तेथील नेते अथवा तज्ज्ञदेखील निश्चितपणे देऊ शकणार नाहीत. याचे कारण म्हणजे गेल्या चौदाशे वर्षांच्या इतिहासात इराणी जनतेची सातत्याने दिसलेली दोलायमान मानसिक स्थिती. इसवी सनापूर्वीपासून हजार वर्षांचा पर्शियन संस्कृतीचा वारसा इराणला लाभलेला आहे.

एकेकाळी जगातील एक महासत्ता असलेले पर्शियन साम्राज्य, अरबांच्या इस्लामी आक्रमणानंतर अवघ्या १५-२० वर्षांतच कोलमडले. आपली संस्कृती सोडून पूर्णतः इस्लामिक संस्कृतीचा स्वीकार केला गेला खरा; पण त्या पर्शियन साम्राज्याच्या, संस्कृतीच्या स्मृती इराणीमनात अजूनही टिकून आहेत. फार मागे न जाता गेल्या शंभर-सव्वाशे वर्षांचा इतिहास पाहिला, तरी इराणमध्ये आंदोलने आणि त्यायोगे राजकीय आणि सामाजिक उलथापालथ होणे नवीन नाही.

राजेशाही आणि धार्मिक कट्टरतेला मागे टाकणारी लोकशाहीवादी चळवळ सन १९०६ मध्ये तिथे सुरू झाली. पुढे १९२५ मध्ये पुन्हा राजेशाहीचे महत्त्व वाढवणारे स्थित्यंतरही झाले आणि रेझा शहा पेहेलवी यांची सत्ता आली. या पहेलवी घराण्याला जुन्या पर्शियन साम्राज्याचे फार आकर्षण. त्यांच्या काळातील इराणच्या राष्ट्रीय ध्वजावरील 'सिंह' आणि 'सूर्य' ही चिन्हे पर्शियन काळातूनच घेतलेली. १९७३ मध्ये पर्शियन साम्राज्य स्थापनेला पंचवीसशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने, अत्यंत देदीप्यमान असा समारोहदेखील इराणमध्ये झाला होता. जुन्या साम्राज्याचा अभिमान बाळगणारे शहा मात्र, कायमच ब्रिटिश आणि अमेरिकन सत्तांच्या हातचे बाहुलेच बनून राहिले. या शहांच्या काळातच सन १९६३ पासून शैक्षणिक, औद्योगिक आणि सामाजिक सुधारणा यावर भर देणारी 'धवलक्रांती' इराणमध्ये सुरू झाली.

शहांच्या राजवटीत अनेक धार्मिक कट्टरतावादी लोकांना राजाश्रय मिळणे बंद झाले. अयातुल्ला खोमेनी यांसारख्या धर्मगुरूंवरही देश सोडण्याची पाळी आली होती. विरोधाभास असा की, इस्लामला दुय्यम स्थान देणारे शहा १९६५ आणि १९७१च्या भारत-पाक युद्धामध्ये मात्र पाकिस्तानच्या बाजूने उभे राहिलेले दिसले. त्यावेळी अचानकपणे त्यांना इस्लाम धर्म आठवला. इस्लामी पाकिस्तान हा इराणचा बंधूच असल्याने युद्धकाळी इराणने पाकिस्तानची मदत केली पाहिजे, अशीच शहांची त्यावेळी भूमिका होती. कालांतराने आर्थिक सुधारणा बहुतांश लोकांपर्यंत न पोहोचणे आणि पाश्चात्त्यांच्या कच्छपी लागलेल्या शहांच्या राजवटीविषयी इराणी जनतेच्या मनात असंतोष निर्माण झाला. त्यावेळी शहांना आणि त्यांच्या पाश्चात्त्य संस्कृतीला विरोध करणारा मोठाच वर्ग इराणमध्ये तयार होत होता. सरकारबद्दलचा आपला असंतोष व्यक्त करण्यासाठी अनेक महिला मुद्दामहून हिजाब आणि बुरखा घालून बाहेर पडत असत. यातूनच पुढे १९७९ मध्ये इराणमध्ये 'इस्लामिक- क्रांती'झाली आणि खोमेनी यांच्यासारख्या कट्टरतावादी लोकांच्या हाती इराणी सत्ता आली. आज ४६ वर्षांनंतर अमेरिकेचे बाहुले असलेली शहांची पुढची पिढी तोच 'सिंह' आणि 'सूर्य' असलेला ध्वज घेऊन इराणी जनतेचे नेतृत्व करण्यासाठी पुढे सरसावते आहे.

इराणमधील स्त्रिया इस्लामिक जोखडातून बाहेर पडण्यासाठी हिजाब जाळत आहेत. आजघडीला पर्शियन, इस्लामिक वा पाश्चिमात्य अशा कोणत्याच संस्कृतीशी इराणी जनतेची नाळ पूर्णपणे जोडली गेलेली दिसत नाही. हुकूमशाही अथवा लोकशाही यातील नेमके काय पाहिजे, हेदेखील निश्चितपणे इराणी जनता ठरवू शकलेली नाही. अशा गोंधळलेल्या समाजाची ससेहोलपट होणे स्वाभाविकच म्हणावे लागेल. इराणपेक्षा अधिक प्राचीन संस्कृतीचा वारसा भारताला लाभला असून, शेकडो वर्षांच्या परकीय आक्रमणानंतरही ती संस्कृती टिकून आहे. असे असतानाही आज भारतीय समाजमन गोंधळलेलेच आहे. उज्ज्वल भविष्यासाठी समाजाला 'स्व'ची जाणीव लवकरात लवकर होणे आवश्यक आहे. अन्यथा, इराणचे उदाहरण आपल्यासमोर आहेच.

गौरव

अजय तिवारी

# 'जेन झी' कडे भाजपचे नेतृत्व

**बिहारमधील राजकीय घडामोडींची खडान्खडा माहिती असणाऱ्या नितीन नवीन यांच्यावर राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. जगातील सर्वाधिक सदस्य असलेल्या भाजपला आता दक्षिणायन करून तामिळनाडू, केरळ, पुद्दुचेरी आणि प. बंगाल पादाक्रांत करायचा आहे. अर्थात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या छत्रछायेखाली कारभार चालणार असल्यामुळे त्यांना ताण घेण्याचे काहीच कारण नाही.**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारविरोधात जेन झीने आवाज उठवण्याचे आवाहन केले होते. जगभर आता जेन झी क्रांतीची मशाल हाती घेत असताना भारतातही तसे व्हावे, अशी राहुल यांची इच्छा असली, तरी त्यांच्या पक्षाची धुरा अजूनही ज्येष्ठांच्या हातात आहे. निवडणूक जिंकून द्यायला युवक आणि पदे मात्र ज्येष्ठांना, यामुळे तर काँग्रेसला मध्यप्रदेश, राजस्थान आदी राज्यां ध्ये फटका बसला. याउलट, सत्तेतील महत्त्वाची पदे भाजपची ज्येष्ठ मंडळी भूषवत असली, तरी संघटनात्मक तसेच अन्य पदांवर युवक आणि मध्यमवयीन नेत्यांची निवड करून भाजपने संतुलन साधले आहे. आता मोदी हेही जेन झीला आकर्षित करत आहेत.

पश्चिम बंगालमधील त्यांचे भाषण ऐकल्यास त्यात त्यांनी युवकांच्या भावनांना हात घातलेला दिसतो. दिल्लीत मोदी यांच्याविषयी आयोजित पुस्तक प्रदर्शनामागेही जेन झीच्या भावनांचा उद्रेक न होता ते आपल्याबरोबर कसे राहतील, ही व्यूहनीती होती. आता त्याचे पुढचे पाऊल म्हणून जगातील सर्वांत मोठ्या राजकीय पक्षाची धुरा ४५ वर्षांच्या नितीन नवीन यांच्या खांद्यावर देण्यात आली आहे. त्यांच्यासाठी ही स्वप्नवत घडामोड आहे. त्यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी झालेली बढती भाजपमध्ये एका पिढीतील बदलाचे संकेत देते. नवीन यांना नवे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्याचा भाजप पक्षश्रेष्ठींचा निर्णय केवळ एक महत्त्वाचा संघटनात्मक निर्णय नाही, तर राष्ट्रीय राजकारणाला एक स्पष्ट संदेशदेखील देतो. भाजपमध्ये नेतृत्वाचा मार्ग वय किंवा वंशावळीने नव्हे, तर कठोर परिश्रम, ऊर्जा आणि संघटनात्मक क्षमतेने ठरवला जातो, हा या निवडीमागील संदेश आहे. केवळ ४५ वर्षांच्या नवीन यांच्याकडे ही जबाबदारी सोपवून पक्षाने सिद्ध केले आहे की भाजप भविष्यातील राजकारणावर लक्ष ठेवून तरुण नेतृत्व जोपासते.

दुसरीकडे, काँग्रेसचे नेतृत्व ८३ वर्षीय मल्लिकार्जुन खडगे यांच्या खांद्यावर आहे. नवीन यांची नियुक्ती ही केवळ एक नियुक्ती नाही, तर पक्षामध्ये पिढ्यान्‌पिढ्या होणाऱ्या बदलांचे प्रतीक आहे. १९८० मध्ये स्थापनेपासून, पक्षाने अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुरलीमनोहर जोशी आणि कुशाभाऊ ठाकरे यांसारख्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली आपला वैचारिक आणि संघटनात्मक पाया मजबूत केला. त्यांच्या पाठोपाठ, नरेंद्र मोदी, राजनाथसिंह, व्यंकय्या नायडू, अरुण जेटली, सुषमा स्वराज, नितीन गडकरी, जे. पी. नड्डा आणि अमित शाह यांच्यासह दुसऱ्या पिढीने, तर धर्मेंद्र प्रधान, भूपेंद्र यादव, देवेंद्र फडणवीस, योगी आदित्यनाथ, प्रल्हाद जोशी आणि अनुराग ठाकूर यांच्यासह तिसऱ्या पिढीने पक्षाच्या संघटनात्मक रचनेचा विस्तार केला आणि पक्षाला सत्तेत आणले. आता चौथी पिढी म्हणून भाजपने नवीन यांची निवड केली आहे. नवीन हे भाजपचे सर्वांत तरुण राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. यापूर्वी अमित शाह यांनी ४९ व्या वर्षी पक्षाची सूत्रे हाती घेतली होती. त्यांच्यापूर्वी नितीन गडकरी ५२ व्या वर्षी अध्यक्ष झाले होते. ऐतिहासिकदृष्ट्या भारतीय जनसंघाच्या काळात अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणी हे कमी वयात अध्यक्ष झाले होते. ताज्या निवडीने भाजपने तरुणांना थेट संदेश दिला आहे की वय हा पक्षात अडथळा नाही. नवीन हे कायस्थ समुदायातून येतात. त्यांची संख्या निवडणुकीच्या राजकारणात निर्णायक मानली जात नाही. असे असूनही, त्यांना पक्षाच्या सर्वोच्च पदावर नियुक्त केल्याने दिसून येते, की भाजप नेतृत्व निवडीमध्ये जातीच्या अंकगणितापेक्षा संघटनात्मक क्षमता आणि राजकीय समजुतीला प्राधान्य देत आहे.



प्रादेशिक संतुलनाच्या दृष्टिकोनातून नवीन यांची निवड महत्त्वाची आहे. ते बिहारचे आहेत आणि भाजपचे पूर्व भारतातून येणारे पहिले राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. यावरून स्पष्ट होते, की पक्षाचे लक्ष हिंदी पट्ट्यापुरते किंवा पश्चिम भारतापुरते मर्यादित नाही. भाजप बिहार, बंगाल, ओडिशा, आसाम आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये आपली पकड मजबूत करू इच्छित आहे आणि नवीन यांच्याकडे नेतृत्व सोपवून पक्ष ही रणनीती मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहे. तरुण असले, तरी नवीन कमी अनुभवी नाहीत. २००६ मध्ये त्यांची राजकीय कारकीर्द सुरू झाली. तेव्हा त्यांनी पाटणा पश्चिम विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक जिंकली आणि पहिल्यांदाच आमदार झाले. तेव्हापासून त्यांनी सलग पाच वेळा ही जागा जिंकली आहे. राज्य सरकारमध्ये मंत्री म्हणून त्यांनी रस्ते बांधकाम, शहरी विकास आणि गृहनिर्माण आणि कायदा अशी महत्त्वाची खाती सांभाळली. त्यांनी भारतीय जनता युवा मोर्चा (भाजप) चे राष्ट्रीय सरचिटणीस आणि बिहारचे प्रदेशाध्यक्ष म्हणूनही काम केले. त्यांनी अनेक राज्यांमध्ये संघटना प्रभारी म्हणून काम केले. सिक्कीम आणि छत्तीसगडसारख्या राज्यांमध्ये संघटना प्रभारी म्हणून तसेच निवडणूक रणनीती आखण्यात त्यांची भूमिका पक्षाच्या सर्वोच्च नेतृत्वाने गांभीर्याने घेतली. लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून देशाला संबोधित करताना मोदी यांनी एक लाख नवीन तरुणांना राष्ट्रीय राजकारणात आणण्याचे आश्वासन दिले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत आणि संघाचे इतर पदाधिकारी वारंवार सार्वजनिक व्यासपीठावरून तरुणांना नेतृत्व देण्याबद्दल बोलले आहेत. पक्षाध्यक्ष म्हणून नवीन यांची नियुक्ती हे त्याचेच लक्षण आहे. नवीन यांचा अध्यक्षपदाचा कार्यकाळ तीन वर्षांचा आहे, परंतु २०२९ च्या लोकसभा निवडणुका त्यांच्या नेतृत्वाखाली लढवल्या जातील हे निश्चित आहे. त्यांच्या आधी पक्षाने लोकसभा निवडणुका लक्षात घेऊन शाह आणि नंतर नड्डा यांचा अध्यक्षपदाचा कार्यकाळ वाढवला होता. म्हणूनच त्यांची टीम तरुण आणि अनुभवी नेत्यांमध्ये संतुलन राखत असल्याचे म्हटले जाते. पक्षसंघटनेत महिलांसाठी ३३ टक्के प्रतिनिधित्वाची तरतूद असून नवीन टीममध्ये महिला आणि तरुण चेहऱ्यांना आघाडीवर आणण्याची योजना आहे. मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या नेतृत्वाखालील 'एनडीए' सरकार बारा वर्षांपासून सत्तेत असताना नवीन यांनी पक्षाचे नेतृत्व स्वीकारले आहे. आसाम आणि पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुका मार्च-एप्रिलमध्ये होणार आहेत. भाजप आसाममध्ये दहा वर्षांपासून सत्तेत आहे. सर्वानंद सोनोवाल यांच्यानंतर पक्ष हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली हॅट्ट्रिकसाठी प्रयत्न करेल. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुका याच वर्षी होणार आहेत. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेस बंगालमध्ये १५ वर्षांपासून सत्तेत आहे. बिहार आणि ओडिशानंतर, भाजपचे पूर्वेकडील सर्वांत मोठे आव्हान म्हणजे बंगालमध्ये कमळ फुलवणे. तामिळनाडू, केरळ आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुका याच वर्षी होणार आहेत. भाजप केरळमध्ये वीस टक्के मते मिळवत आहे.

तिरुवनंतपुरममध्ये भाजपने महापौरपदाची निवडणूक जिंकली आहे. पक्ष तिसरी शक्ती बनण्याच्या प्रयत्नात आहे. तामिळनाडू विधानसभेच्या निवडणुकाही लवकरच होणार आहेत. तिथे द्रमुक- काँग्रेस युती दहा वर्षांपासून सत्तेत आहे. अण्णाद्रमुक आणि इतर पक्षांशी युती करून पक्ष पुन्हा सत्तेत येण्याचा प्रयत्न करत आहे. पुद्दुचेरीमध्ये सत्ता टिकवून ठेवणेदेखील आव्हानात्मक आहे. देशातील ६५ टक्के लोकसंख्या सध्या ३५ वर्षांपेक्षा कमी वयाची आहे. भाजप अध्यक्ष म्हणून नवीन यांच्यावर भाजपचा पाठिंबा राखण्याची महत्त्वाची जबाबदारी असेल. उत्तर प्रदेश विधानसभेच्या निवडणुका २०२७ च्या सुरुवातीला होणार आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर अडीच वर्षांनी झालेल्या उत्तर प्रदेशच्या निवडणुका नेहमीच उपांत्य फेरीच्या मानल्या जातात. दहा वर्षे सत्तेत राहिल्यानंतर, पक्ष योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखाली तिसऱ्यांदा जनादेश मिळवण्याचा प्रयत्न करेल. नवीन यांची नियुक्ती तळागाळातून सुरू झालेल्या आणि राष्ट्रीय पातळीपर्यंत पोहोचलेल्या व्यापक अंतर्गत निवड प्रक्रियेचा परिणाम आहे. ही नियुक्ती भाजपच्या संघटनात्मक ताकदीचे आणि आगामी निवडणुकांपूर्वी बदलावर भर देण्याचे लक्षण म्हणून पाहिली जाते. नवीन यांना राजकीयदृष्ट्या हुशार आणि पक्षप्रिय मानसिकतेचे म्हणून ओळखले जाते. कायस्थ समुदायाशी संबंधित असलेली जातीय ओळखदेखील त्यांच्या बाजूने मानली जाते, कारण हा समुदाय राजकीयदृष्ट्या तटस्थ मानला जातो आणि इतर गटांशी संघर्ष करत नाही. त्यांनी बिहारमधील पक्षाच्या युवा संघटनेपासून सुरुवात केली आणि निवडणुकीच्या जबाबदाऱ्या स्वीकारत उच्च पदांवर पोहोचले. यातील एक महत्त्वाची कामगिरी म्हणजे छत्तीसगड तसेच दिल्लीमध्ये भाजपला पुन्हा सत्तेत आणण्यामध्ये नवीन यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.